CMYK

सोलापूर **तरुण भारत** SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

धाराशिव | रविवार, ४ जानेवारी २०२५ | वर्ष ३ रे अंक ३०५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



नि अन्य देशांतील धर्मसंस्थापकांनी देवदूतास पाहिले, सैतानाला पाहिले पण त्यांनी परमेश्वराला कधीच पाहिले नाही. परमेश्वराचे दर्शन करणारे तर केवळ याच देशात होऊन गेले. आपल्या ऋषिमुनींनी मोठ्या विश्वासाने म्हटले, ''आत्मा वा अरे द्रष्टव्य:'' आत्मा ही बघण्याची बाब आहे.


**कुप्प. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# अमेरिकेचा व्हेनेझुएलावर हल्ला

## राष्ट्रपती मादुरो, त्यांच्या पत्नीला अटक ● डेल्टा फोर्सची कारवाई

**काराकास, ३ जानेवारी**

अमेरिकेच्या वर्चस्वाला सातत्याने आव्हान देणाऱ्या दक्षिण अमेरिका खंडातील व्हेनेझुएला या देशावर शनिवारी पहाटे अमेरिकेने जोरदार हल्ला चढविला. अमेरिकेच्या डेल्टा फोर्सच्या जवानांनी थेट कारवाई करीत राष्ट्रपती निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला अटक केली. या दोघांना देशाबाहेर पाठविण्यात आले आहे, अशी घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाज माध्यमावर केली. या हल्ल्यामुळे नवीन वर्षात आणखी एका संघर्षाला सुरुवात झाली आहे. जगात शांतता स्थापनेसाठी शांतता नोबेल पुरस्काराची सतत मागणी करणारे ट्रम्प यांनीच हे युद्ध छेडले आहे.



शनिवारी पहाटे नागरिक झोपेत असताना अमेरिकेच्या हवाई दलाची विमाने आणि हेलिकॉप्टर्सने अतिशय कमी उंचीवरून जवळपास सात ठिकाणी बॉम्ब हल्ला केला. येथे अनेक स्फोट झाले. अमेरिकेने नागरी आणि लष्करी ठिकाणांवर हल्ले केल्याचा आरोप त्यानंतर मादुरो सरकारने केला होता. हा साम्राज्यवादी हल्ला असून, नागरिकांनी रस्त्यावर उतरावे, असे आवाहन व्हेनेझुएला सरकारने केले होते. नवीन वर्षाच्या तिसऱ्या दिवशी पहाटे व्हेनेझुएलाची राजधानी काराकासमध्ये किमान सात स्फोट झाल्यानंतर लोक घाबरून रस्त्यांवर सैरावैरा धावत सुटले. काहींनी याची माहिती समाज माध्यमावर टाकली. या हल्ल्यात जीवितहानी झाली का, हे मात्र स्पष्ट झाले नाही. (वृत्तसंस्था)



### आंतरराष्ट्रीय पातळीवर पडसाद

अमेरिकेने केलेल्या कारवाईचे आंतरराष्ट्रीय पडसाद उमटले आहेत. रशियाने हल्ल्याचा तीव्र निषेध केला असून, मादुरो यांच्या अटकेची कृती एका स्वतंत्र देशाच्या सार्वभौमत्वाचे अस्वीकारार्ह उल्लंघन असल्याचे म्हटले. युनोच्या दहशतवादविरोधी आणि मानवाधिकारविषयक सर्वोच्च तज्ज्ञांनी शनिवारी व्हेनेझुएलावरील अमेरिकी हल्ल्याचा निषेध करीत हे अवैध आक्रमण असल्याचे म्हटले. या हल्ल्यात आपली भूमिका नाही, असे ब्रिटनने म्हटले. उत्तर कोरियाचे राष्ट्राध्यक्ष किम जोंग उन यांनी अमेरिकेला इशारा देत जग महायुद्धाकडे जात असल्याचे म्हटले.

### उपराष्ट्रपतींनी स्वीकारली सूत्रे



मादुरो यांना अटक झाल्यानंतर अंतरिम राष्ट्रपती म्हणून उपराष्ट्रपती डेल्सी रॉड्रिग्ज यांनी सूत्रे हाती घेतली. मादुरो आणि त्यांच्या पत्नी सीलिया यांच्यावर न्यू यार्क येथील न्यायालयात खटला चालविण्यात येणार असल्याची माहिती अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रूबिया यांनी दिली आहे. मादुरो यांना नेमके कुठे ठेवण्यात आले, याची माहितीही मिळाली नव्हती. ते जिवंत आहेत का, याचे पुरावे आम्ही मागत आहोत, असे डेल्सी रॉड्रिग्ज यांनी सरकारी वाहिनीवर सांगितले.

### मादक पदार्थ ठरले कारण

व्हेनेझुएलाचे मादुरो सरकार अमेरिकेत मादक पदार्थांची तस्करी करते, असा अमेरिकी प्रशासनाचा आरोप आहे. ही एक राष्ट्रीय आपत्ती मानत अमेरिकेने व्हेनेझुएलावर हल्ला केला. मादुरो यांच्या सत्ताकाळात व्हेनेझुएलाच्या लाखो नागरिकांना अमेरिकेत यावे लागले. यामुळे अमेरिकेवर दबाव वाढला.

# २९ महापालिकांसाठी १५,९३१ उमेदवार रिंगणात

**मुंबई, ३ जानेवारी**




राज्यातील २९ महापालिकांसाठी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नामनिर्देशन प्रक्रिया पूर्ण झाली असून, अंतिम उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. या निवडणुकांमध्ये एकूण ८९३ प्रभागांमधून २,८६९ नगरसेवक पदांसाठी तब्बल १५,९३१ उमेदवार अंतिम रिंगणात आहेत.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, या महापालिका निवडणुकांसाठी एकूण ३३,४२७ नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यात आली होती. छाननीनंतर २४,७७१ नामनिर्देशनपत्रे वैध ठरली, तर उमेदवारी मागे घेण्याच्या प्रक्रियेत ८,८४० उमेदवारांनी माघार घेतली. त्यानंतर अंतिम टप्प्यात १५,९३१ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेत सर्वाधिक चुरस पाहायला मिळत असून, येथे २२७ प्रभागांसाठी १,७०० उमेदवार अंतिम रिंगणात आहेत. पुणे महापालिकेत ४१ प्रभागांमधून १,१६६ उमेदवार, तर नागपूरमध्ये ३८ प्रभागांसाठी ९९३ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. कल्याण-डोंबिवली महापालिकेत ३१ प्रभागांसाठी ४८९ उमेदवार, ठाण्यात ३३ प्रभागांसाठी ६५६ उमेदवार, तर नवी मुंबईत ४९९ उमेदवार अंतिम टप्प्यात आहेत. (तभा वृत्तसेवा)

**राज्याची एकूण आकडेवारी**

| | |
|---|---|
| प्रभाग | ८९३ |
| सदस्य | २,८६९ |
| प्राप्त नामनिर्देशन पत्रे | ३३,४२७ |
| वैध उमेदवार | २४,७७१ |
| उमेदवारी मागे घेतलेले | ८,८४० |
| एकूण उमेदवार | १५,९३१ |



महाराष्ट्राचे पोलिस महासंचालक म्हणून शनिवारी सदानंद दाते यांनी रश्मी शुक्ला यांच्याकडून पदभार स्वीकारला. राज्याच्या पहिल्या डीजीपी झालेल्या शुक्ला सेवानिवृत्त झाल्या आहेत

## महत्त्वाचे

### चीनने घातली चांदीच्या निर्यातीवर बंदी

**बीजिंग** : चीनने चांदीच्या बाबतीत जगातं त्यांच्यावर असलेले मोठे अवलंबत्व पाहून त्याचा फायद उचलला आहे. त्यांनी चांदीबाबत एक मोठी खेळी खेळली आहे. चीनने १ जानेवारी २०२६ पासून चांदीचे नियंत्रण करण्याबाबत नियम लागू केले आहेत. या नियमानुसार आता सरकारी लायसन्स असलेली कोणतीही कंपनी चीनच्या बाहेर चांदी निर्यात करू शकणार नाही. चीनच्या या निर्णयामुळे संपूर्ण जग हैराण झाले आहे. चीनने चांदीचा समावेश दुर्मिळ खनिजांमध्ये केला आहे. चीनेच्या या नव्या नियमामुळे चांदीच्या दरात झपाट्याने वाढ होण्याची शक्यता आहे.

### देशातील पहिली हायड्रोजन ट्रेन २० जानेवारीला धावणार

**जिंद** : देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनचा मुहूर्त ठरला असून, २० जानेवारी रोजी हरयाणाच्या जिंद ते सोनिपत मार्गावर २५०० प्रवाशांना घेऊन ही ट्रेन धावणार आहे. ताशी १४० किमी वेगाने ब्रॉडगेज रुळावर धावणारी जगातील ही सर्वांत लांब ट्रेन आहे. ट्रेन आणि हायड्रोजन प्रकल्पाची चाचणी घेण्यासाठी रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन अर्थात् आरडीएसओ संस्थेचे पथक शनिवारी जिंदमध्ये पोहोचले. १५ जानेवारीपर्यंत पथक ट्रेनची चाचणी घेणार आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील. २४०० किलोवॅटचे शक्तिशाली इंजिन असलेली १० डब्यांची ट्रेन पूर्णपणे भारतातच विकसित करण्यात आली आहे. ३६० किलोग्रॅम हायड्रोजन वापरून १८० किलोमीटर अंतर पार करू शकते. विशेष असे की एक किमीच्या प्रवासासाठी दोन किलो हायड्रोजनची आवश्यकता असेल, तर डिझेल ट्रेन साडेचार लिटर वापरून एक किलोमीटर प्रवास करते. या ट्रेनचे डबे चेन्नईतील इंटिग्रल कोच कारखान्यात तयार करण्यात आले.

### सोलापुरातील बाळासाहेब सरवदे हत्या प्रकरण

# भाजप उमेदवाराला २ दिवसांची तर इतर तीन आरोपींना ४ दिवसांची पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत झालेल्या भीषण हत्याकांडाने संपूर्ण शहर हादरले आहे. मनसे विद्यार्थी सेनेचे युवक अध्यक्ष बाळासाहेब सरवदे यांच्या हत्येप्रकरणी भाजपच्या उमेदवार शालन शिंदे यांना दोन तर इतर आरोपींना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.



महापालिका निवडणुकीच्या इतिहासात एखाद्या अधिकृत उमेदवाराला हत्येच्या गुन्ह्यात पोलिस कोठडी मिळण्याची ही पहिलीच वेळ असल्याने राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. सोलापुरातील जोशी गल्ली येथे शुक्रवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कारणावरून भाजपच्या दोन गटांत जोरदार वाद झाला. भाजपच्या अधिकृत उमेदवार शालन शिंदे आणि बंडखोर उमेदवार रेखा सरवदे यांच्या कुटुंबात हा संघर्ष झाला. या वादाचे पर्यावसान हत्येत झाले असून, यात मनसेचे बाळासाहेब सरवदे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी अटकेत असलेल्या भाजप उमेदवार शालन शिंदे यांना २ दिवसांची, तर आतिश शिंदे, अमर शिंदे आणि तानाजी शिंदे या तीन आरोपींना ४ दिवसांची पोलिस कोठडी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती एम. पी. मर्ढेकर यांनी सुनावली आहे.

**डोळ्यात चटणी टाकून केले वार** : मयत बाळासाहेब यांचे बंधू बाजीराव सरवदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ही घटना अत्यंत क्रूरपणे घडवण्यात आली. तक्रारीत नमूद केल्यानुसार, भाजप उमेदवार शालन शिंदे यांनी बाळासाहेब यांच्या डोळ्यात चटणी टाकली आणि त्यानंतर इतर आरोपींनी त्यांच्यावर धारदार शस्त्राने भीषण वार केले. या हत्याकांडाचे पडसाद राजकीय स्तरावर उमटले असून, मनसे आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. मनसे नेते प्रशांत इंगळे आणि माकपचे माजी आमदार नरसय्या आडम यांनी या प्रकरणाचा सूत्रधार भाजप आमदार विजयकुमार देशमुख आणि त्यांचे चिरंजीव डॉ. किरण देशमुख असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. यामुळे सोलापुरातील भाजपपुढील अडचणीत मोठी वाढ झाली आहे.

## 'सहा पोलिस जखमी'

कोलकाता : पश्चिम बंगालमधील २४ परगणा जिल्ह्यातील संदेशखली येथील तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्याला अटक करण्यासाठी आलेल्या पोलिसांवर जमावाने हल्ला केला. यात दोन पोलिस निरीक्षक, तीन पोलिस उपनिरीक्षकांसह सहा कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. तृणमूलच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांचे वाहन जाळले, दगडफेक केली. तृणमूलचा कार्यकर्ताला अटक करण्यासाठी बोयारमारी गावात गेले होते.

## 'त्या' बांगलादेशी खेळाडूला हटविले

**गुवाहाटी** : दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांमधील वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) कोलकाता नाइट रायडर्सला आयपीएल २०२६ च्या हंगामापूर्वी बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला आपल्या संघातून मुक्त करण्यास सांगितले आहे. गत महिन्यात झालेल्या खेळाडूंच्या लिलावात चेन्नई सुपर किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्ससोबत तीव्र बोली युद्धानंतर, केकेआरने बांगलादेशच्या ३० वर्षीय डावखुरा गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला २ कोटी रुपयांच्या मूळ किमतीवरून ९.२० कोटी रुपयांना आपल्या संघात सहभागी केले होते. केकेआरला बदली खेळाडू निवडण्याची परवानगी दिली जाईल, असे बीसीसीआयने सांगितले.



### साहित्य संमेलनाला गालबोट

# कार्याध्यक्षांच्या तोंडाला काळे फासले

**सातारा, ३ जानेवारी**

साताऱ्यात सुरू असलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला शनिवारी एका अनुचित घटनेमुळे गालबोट लागले. एका व्यक्तीने संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला काळे फासल्याची घटना घडली. या प्रकरणी संबंधित व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून, हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. २ जानेवारी रोजी सकाळी साहित्यिक डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत या साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाले होते. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी विविध कार्यक्रम सुरू असतानाच संदीप जाधव नावाच्या व्यक्तीने अचानक व्यासपीठाकडे जाणाऱ्या पायऱ्यांजवळ विनोद कुलकर्णी यांच्यावर हल्ला केला आणि त्यांच्या तोंडाला काळे फासले.

सोलापूर तरुण भारत SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

'सोलापूर तरुण भारतची दिनदर्शिका सांगे भविष्याची दिशा'

- नव्या वर्षाची नवी कोरी दिनदर्शिका
- वर्षभर संग्रही राहील अशा वाचनीय मजकुरासह २४ पानांची रंगीत दिनदर्शिका
- प्रत्येक तारखेचा बारीक-सारिक तपशील
- तिथी वार, नक्षत्र, बारा राशींचे भविष्य
- संकष्टी चतुर्थी, गावोगावचे चंद्रोदय
- आरोग्य विषय व बारा ज्योतिर्लिंग माहितीसह भरगच्च मजकूर

आजच आपल्या दिनदर्शिकेची अंक वितरकाकडे नोंदणी करा.







नोंदणीसाठी संपर्क : 8888847267


लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर
अखंड गतीतून सार्थकता
प्रधान कार्यालय : १२८ मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर । फोन : (०२१७) २७३५५०३/६६

नववर्ष समृद्धी ठेव योजना

ठेवीवर आकर्षक व्याजदर ९*%
* नियम अटी लागू

ग्राहकांचा विश्वास हाच आमचा श्वास

३६५ दिवस अविरत सेवा





लॉकर सुविधा उपलब्ध

लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर

अध्यक्ष व उपाध्यक्ष (लोकमंगल को.ऑप. बँक, लि.सोलापूर) | समस्त संचालक मंडळ (लोकमंगल को.ऑप. बँक, लि.सोलापूर) | श्री. राजेशसिंह बायस (मुख्य कार्यकारी अधिकारी, लोकमंगल बँक)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### शस्त्रे, दारूगोळा जप्त, दोघांना अटक

**इम्फाळ** : मणिपूरच्या इम्फाळ पूर्व जिल्ह्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन जणांना अटक करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला आहे, असे पोलिसांनी शनिवारी सांगितले. थौदम रंजन सिंगला गुरुवारी लैमाखोंग मापाल मामांग लैकाई येथील त्याच्या निवासस्थानावरून अटक करण्यात आली. त्याच्या ताब्यातून नऊ ९ मिमी काडतुसे जप्त करण्यात आली, असे पोलिसांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सुरक्षा दलांनी शुक्रवारी करम मणी मैतेई यांना थोंगजू पार्ट-२, पिचू लम्पाक निंगोम्बम लैरक येथील त्याच्या निवासस्थानावरून अटक केली आणि मॅगझिनसह ९ मिमी पिस्तूल जप्त केले, असे त्यात म्हटले आहे.

### हेलिकॉप्टर कोसळून चौघांचा मृत्यू

**वॉशिंग्टन** : ॲरिझोनाच्या पर्वतांमध्ये हेलिकॉप्टर कोसळून चार जणांचा मृत्यू झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. पिनल काउंटी शेरिफ ऑफिसने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे की, शुक्रवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास फिनिक्सच्या पूर्वेला सुमारे १०३ किलोमीटर अंतरावर असलेल्या टेलिग्राफ कॅन्यनजवळ हा अपघात झाला. हे विमान जवळच्या क्वीन क्रीक शहरातील विमानतळावरून उड्डाण घेत होते. शेरिफ ऑफिसनुसार, हेलिकॉप्टरमधील चारही जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये पायलट, आणि तीन महिलांचा समावेश आहे. फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन (एफएए) आणि नॅशनल टान्सपोर्टेशन सेफ्टी बोर्ड (एनटीएसबी) अपघाताची चौकशी करत आहेत. आमच्या प्रार्थना पीडितांसोबत आणि त्यांच्या कुटुंबियांसोबत आहेत, असे शेरिफ ऑफिसने म्हटले आहे.

### २.७५ कोटींचे ड्रग्ज, दारू जप्त

**ठाणे** : नागरी निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून ठाणे शहरात अंमलबजावणी यंत्रणांनी २.७५ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची अवैध दारू, अंमली पदार्थ, शस्त्रे आणि रोकड जप्त केली असल्याची माहिती एका अधिकाऱ्याने शनिवारी दिली. आतापर्यंत ९.५४ लाख रुपयांच्या बेहिशेबी रोख रकमेसह एकूण २.७५ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थ विभागाने २.२८ कोटी रुपये किमतीचे ५७,९३७ किलो अंमली पदार्थ जप्त केले. सुरक्षा दलांनी ५९ अवैध शस्त्रे जप्त केली आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ६१९ प्रतिबंधात्मक कारवाई केल्या, असे एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने १७ दिवसांत २६.८ लाख रुपयांची दारू जप्त केली आणि संबंधित प्रकरणांमध्ये ५३ जणांना अटक केली.

### राष्ट्रविरोधी गाणी लावल्याने एकाला अटक

**पालघर** : पालघर जिल्ह्यात मीरा भाईंदर वसई विरार पोलिसांनी एका केशकर्तनालिका चालकाला त्याच्या केशकर्तनालयामध्ये राष्ट्रविरोधी गाणी वाजवल्याच्या आरोपावरून अटक केली आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली. आरोपीची ओळख अब्दुल रहमान शाह अशी असून तो मूळचा उत्तर प्रदेशातील आझमगढचा आहे. तो मागील अनेक वर्षांपासून नायगावमध्ये केशकर्तनालय चालवत आहे. पोलिसांकडे तक्रार करणाऱ्या स्थानिक रहिवाशांनुसार, त्याने पूर्वीच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष करून चिथावणीखोर मजकूर वाजवला. शाहला वसई तालुक्यातील चिंचोटी परिसरातून त्याला अटक करण्यात आली.

### शस्त्र तस्कराला अटक; दोन पिस्तूल जप्त

**नवी दिल्ली** : पोलिसांनी ईशान्य दिल्लीतील शास्त्री पार्क परिसरातून बेकायदेशीर अग्निशस्त्रांच्या एका कथित पुरवठादाराला अटक केली. त्याच्या ताब्यातून दोन अत्याधुनिक पिस्तूल आणि सहा जिवंत काडतुसे जप्त केली आहेत, अशी माहिती एका अधिकाऱ्याने शनिवारी दिली. आरोपीची ओळख अंकित उर्फ मुन्ना, अशी पटली असून तो गाझियाबाद, उत्तर प्रदेशचा रहिवासी आहे.




### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,३४,००० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,३०,२०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३०.८ | १९.५ |
| अमरावती | ३०.८ | १४.९ |
| भंडारा | २७.० | १२.० |
| बुलडाणा | २८.५ | १६.५ |
| चंद्रपूर | २९.० | १७.० |
| गडचिरोली | २९.४ | १२.६ |
| गोंदिया | २८.३ | १२.८ |
| नागपूर | २८.६ | १४.५ |
| वर्धा | २९.५ | १५.६ |
| वाशीम | ३०.० | १३.८ |
| यवतमाळ | ३०.० | १५.० |

# भारताचा व्यापार अडचणीत

## व्हेनेझुएलातील संकटः विविध वस्तूंची निर्यातही होणार प्रभावित ● दरदिवशी सहा लाख बॅरल कच्च्या तेलाच्या आयातीला फटका

◆ **नवी दिल्ली, ३ जानेवारी**

अमेरिकेच्या हल्ल्याने व्हेनेझुएलात अस्थिरतेची परिस्थिती निर्माण झाल्याने भारतासोबच्या वार्षिक १.८ अब्ज डॉलर्सच्या द्विपक्षीय व्यापाराला याचा फटका बसण्याची शक्यता आहे. व्हेनेझुएलातून भारताची सरकारी कंपनी ओएनजीसी आणि खाजगी रिलायंस कंपनी दररोज अंदाजे सहा लाख बॅरल कच्चे तेल खरेदी करते, मात्र २४ तासातील घडामोडीमुळे तेलाच्या आयातीसह भारतातून होणाऱ्या विविध वस्तूंच्या निर्यातीला मोठा फटका बसण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

अमेरिकेच्या निर्बंधानंतरही भारत व्हेनेझुएलाकडून कच्च्या तेलाची खरेदी करून त्यावर प्रक्रिया करतो आणि त्याची विदेशात विक्री करतो. यात रिलायंस आणि ओएनजीसी दिवसाला सहा लाख बॅरल तेल खरेदी करते. नुकत्याच झालेल्या हल्ल्यामुळे व्हेनेझुएलातून होणाऱ्या तेलाची विक्री तात्पुरती बंद करण्यात आली. तसेच समुद्रमार्गे वाहतूकदेखील विस्कळीत झाल्याने व्यापारात अडथळा आला. भारत व्हेनेझुएलात औषधी, लस, यंत्रसामग्री, कापड, रसायने आणि इलेक्ट्रॉनिक्स सामानांची मोठ्या प्रमाणात निर्यात करतो, तर कच्चे तेल, पेट्रोलियम कोक, लोखंड, तांबे, ॲल्युमिनियम आणि काही सेंद्रिय रसायनांची आयात भारतात होते. मागील आर्थिक वर्षात भारताने व्हेनेझुएला येथून ४३.४ कोटी डॉलर्सचे लोखंड आणि ३६.२० कोटी डॉलर्सचे ॲल्युमिनियम आयात केले. याशिवाय ओएनजीसीने व्हेनेझुएला येथे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. मात्र अस्थिरतेच्या परिस्थितीमुळे व्यापार आणि गुंतवणूक अडचणीत आली आहे. (वृत्तसंस्था)



### अमेरिकेचा हस्तक्षेप वाढणार

भारताची व्हेनेझुएलाला होणारी औषध आणि कपड्यांची निर्यात अमेरिकेच्या निर्बंधामुळे कमी झाली आहे. अशातच नुकत्याच झालेल्या हल्ल्यामुळे भारत आणि व्हेनेझुएलातील निर्यात आणि आयात थांबण्याची शक्यता आहे. राजकीय अस्थिरतेमुळे व्हेनेझुएलात अंतरिम सरकारकडे सत्ता येईल आणि अमेरिकेचा हस्तक्षेप वाढेल.

### हल्ल्यामागे व्यावसायिक कारणे

- निर्बंध लागू होण्यापूर्वी अमेरिका व्हेनेझुएलातून दररोज पाच लाख बॅरल कच्चे तेल आयात करायचा
- मादुरो यांच्या सत्तेनंतर अमेरिकेची व्हेनेझुएलातील गुंतवणूक रोखण्यात आल्याने ट्रम्प हल्ल्याची तयारी सुरू केली
- तेलाचे साठे आणि खनिजांवर अमेरिकेला नियंत्रण हवे आहे, परंतु, मादुरो यांच्या सत्तेमुळे ते शक्य नव्हते
- अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या सरकारी कंपनीवर अनेक कठोर आर्थिक निर्बंध लादले. तसेच त्यांनी व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी न करण्याचे आदेश काढले
- मादुरो यांनी चीन, रशिया आणि भारताला सवलतीच्या दराने तेल विकण्याचा निर्णय घेतल्याने अमेरिका संतापला
- दोन्ही देशांमधील तणाव १९९९ मध्ये व्हेनेझुएलामध्ये डाव्या विचारसरणीचे अध्यक्ष ह्यूगो चावेझ यांचे सरकार सत्तेवर आल्यापासून वाढला.
- व्हेनेझुएलाच्या डाव्या विचारसरणीच्या सरकारने क्युबा, रशिया, चीन आणि इराणशी जवळचे संबंध जोपासले, जे अमेरिकेच्या सत्तेला थेट आव्हान म्हणून पाहिले जात होते.

# तामिळनाडूचे 'ते' रुग्णालय आता 'एसआयटी'च्या केंद्रस्थानी

## डॉ. रवींद्रपाल सिंग प्रकरणी सोमवारी सुनावणी ● किडनी विक्री प्रकरण

◆ **चंद्रपूर, ३ जानेवारी**

रोशन कुळे यांच्या किडनी विक्री प्रकरणातील चौकशीतून तामिळनाडूतील त्रिची येथील रुग्णालयातही अनेकांच्या किडनी काढल्याचे समोर आले. त्यामुळे आता या प्रकरणी गठित विशेष तपास दलाने दिल्लीतील डॉ. रवींद्रपाल सिंग आणि त्रिचीतील रुग्णालयाचा संचालक डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी यांच्याकडे रॅकेटचे मुख्य संशयित म्हणून मोर्चा वळवला होता. डॉ. सिंग यांची सोमवारी सुनावणी होणार असून, डॉ. गोविंदस्वामी मात्र अद्याप हाती लागलेला नाही.



पीडित शेतकरी रोशन कुळे यांनी दिलेल्या माहितीवरून किडनी विक्री प्रकरणातील मुख्य दलाल 'डॉ. कृष्णा' ऊर्फ रामकृष्ण सुंचू याला अटक करण्यात आली. त्यानंतर मोहालीतून हिमांशू भारद्वाजला अटक झाली आणि त्रिचीच्या रुग्णालयावर तपासाची सूई केंद्रित झाली. पोलिसांचे एक पथक अजूनही तेथे तळ ठोकून असल्याची माहिती आहे.

डॉ. सिंगला अटक केल्यानंतर दिल्ली येथील न्यायालयात हजर केले असता २ जानेवारीपर्यंत चंद्रपूरच्या मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांकडे उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार १ जानेवारीला डॉ. सिंग उपस्थित झाल्यानंतर त्याला तात्पुरता जामीन देण्यात आला असून, या प्रकरणी आता ५ जानेवारीला सुनावणी होणार आहे. तर, डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी अजूनही पोलिसांच्या हाती लागला नाही. या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटीची दोन पथके देशातील इतर राज्यांत गेली आहेत. त्यामुळे आणखी काही संशयित पोलिसांच्या रडारवर असल्याची माहिती आहे. कोलकाता येथील पॅथॉलॉजीमध्ये रोशन कुळे याला सोबत घेऊन दोन दिवस चौकशी करण्यात आली असून, त्या ठिकाणीहून काही माहिती मिळाल्याचे सांगितले जात आहे. (तभा वृत्तसेवा)

### अन्य एका पीडिताची त्रिचीत शस्त्रक्रिया

या प्रकरणाच्या तपासादरम्यान आरोपी हिमांशू भारद्वाज याची शस्त्रक्रिया डॉ. राजरत्नम गोविंदस्वामी यांच्या रुग्णालयात झाल्याचे समोर आले आहे. या रुग्णालयात इतरांचीही किडनी काढली गेली असावी, असा संशय 'एसआयटी'ला आल्यामुळे अधिक चौकशी करण्यात आली. त्यातून उत्तरप्रदेशातील आणखी एक पीडित समोर आला असल्याची माहिती आहे.

# दोन लाखांपर्यंतच्या पीक कर्जावर मुद्रांक शुल्क माफ

## शेतकऱ्यांना मोठा दिलासा ● महायुती सरकारचा निर्णय



◆ **मुंबई, ३ जानेवारी**

फडणवीस सरकारने शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेतला असून, दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्ज व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ केले आहे. हा निर्णय १ जानेवारी २०२६ पासून संपूर्ण राज्यात लागू झाला असून, यासंदर्भात महसूल विभागाने अधिकृत शासनादेश जारी केला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांवरील कर्ज प्रक्रियेतील आर्थिक ओझे कमी होणार असून, विशेषतः अल्पभूधारक आणि मध्यम शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

गेल्या दीड वर्षांपासून ही सवलत लागू होती. मात्र, दीड लाखांपर्यंत कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मर्यादित असल्याने अपेक्षित लाभ मिळत नव्हता. आता ही मर्यादा दोन लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आल्याने अधिकाधिक शेतकऱ्यांना या सवलतीचा लाभ मिळणार आहे.

महाराष्ट्र मुद्रांक कायदा, १९५८ मध्ये करण्यात आलेल्या दुरुस्तीच्या आधारे ही सवलत देण्यात आली आहे. महसूल व वन विभागाचे सहसचिव सत्यनारायण बजाज यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, दोन लाख रुपयांपर्यंतच्या शेती किंवा पीक कर्जाशी संबंधित अभिस्वीकृती, करारनामे, तारणपत्रे, हक्कविलेख निक्षेपपत्र तसेच इतर संबंधित दस्तऐवजांवर आकारले जाणारे मुद्रांक शुल्क १ जानेवारी २०२६ पासून पूर्णतः माफ राहणार आहे.

ही १०० टक्के मुद्रांक शुल्क माफी केवळ मूलभूत कर्ज करारांपुरती मर्यादित नसून, तारण, गहाणखत, हमीपत्र, प्रतिभूती बंधपत्र, घोषणापत्र तसेच त्यास संलग्न असलेल्या सर्व कायदेशीर कागदपत्रांनाही लागू राहणार आहे. यापूर्वी पीक कर्जावर प्रत्येक एक लाख रुपयांमागे ०.३ टक्के मुद्रांक शुल्क आकारले जात होते. त्यामुळे दोन लाख रुपयांच्या कर्जासाठी शेतकऱ्यांना सुमारे ६०० रुपये मुद्रांक शुल्क भरावे लागत होते. आता हे शुल्क पूर्णतः माफ झाल्याने प्रत्येक कर्ज व्यवहारामागे शेतकऱ्यांची थेट ६०० रुपयांची बचत होणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### कर्ज प्रक्रिया होणार सुलभ

हा निर्णय राज्यातील सर्व बँका, सहकारी संस्था तसेच कर्जवाटप करणाऱ्या सर्व यंत्रणांसाठी बंधनकारक राहणार आहे. पीक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्काचा बोजा कमी झाल्याने कर्ज प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. शेती उत्पादन खर्च, बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीचे वाढते दर लक्षात घेता, हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत दिलासादायक ठरणार आहे.

मनपा निवडणूक रणधुमाळी

# 'नोटा' असताना बिनविरोध कसे?

## 'त्या' उमेदवारांचे भवितव्य कोर्टात ठरणार ● मनसे आणि सामाजिक कार्यकर्ते न्यायालयात जाणार

◆ **मुंबई, ३ जानेवारी**

ईव्हीएम मशीनवर 'नोटा'चा पर्याय उपलब्ध असताना, उमेदवार बिनविरोध कसे निवडून येऊ शकतात? असा तांत्रिक प्रश्न उपस्थित करत, आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आणि सामाजिक कार्यकर्ते या बिनविरोध निवडींविरोधात उच्च न्यायालयात धाव घेण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे मनपा निवडणुकीतील बिनविरोध उमेदवारांचे भवितव्य कोर्टात ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, दुसऱ्या दिवशी मतमोजणी करून निकाल जाहीर केला जाणार आहे. मात्र, मतदानापूर्वीच ६६ नगरसेवक बिनविरोध निवडून आल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या ६६ उमेदवारांपैकी ४४ उमेदवार भाजपचे असून, त्यातील अर्ध्याहून अधिक उमेदवार कल्याण-डोंबिवली महापालिकेतील आहेत.




या पृष्ठभूमीवर आता या प्रक्रियेला सामाजिक कार्यकर्ते श्रीनिवास घाणेकर यांनीही कायदेशीर आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे. ईव्हीएमवर 'नोटा' हा पर्याय उपलब्ध असताना उमेदवारांना बिनविरोध कसे घोषित करता येते, असा तांत्रिक प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. घाणेकर यांच्या मते, नोटाला एखाद्या उमेदवारापेक्षा अधिक मते मिळाल्यास तो उमेदवार पराभूत ठरू शकतो. अशा परिस्थितीत मतदारांना मतदानाचा अधिकार न देता थेट बिनविरोध निवड जाहीर करणे हे लोकशाही मूल्यांच्या विरोधात आहे. मतदानापासून कोणालाही वंचित ठेवता येत नाही, असा सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ देत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. या प्रकरणात ते स्वतः आणि त्यांच्या सहकाऱ्यांसह न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. नोटाचा पर्याय असतानाही एखादा उमेदवार बिनविरोध कसा निवडून येऊ शकतो, असा प्रश्न अनेक राजकीय पक्षांनी विचारला आहे. काँग्रेससह उबाठा, राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार), समाजवादी पक्ष यांनीही आक्षेप घेतला आहे. पैसे घेऊन अर्ज माघारी घेतल्याचे आरोपही यानिमित्ताने होत आहेत. (तभा वृत्तसेवा)

### सोमवारी घेणार भेट

सोमवारी निवडणूक आयोगाची भेट घेऊन या बिनविरोध निवडींची चौकशी करण्याची मागणी करणारे निवेदन दिले जाणार असून, त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार असल्याचे मनसेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी देखील जाहीर केले आहे. या सर्व प्रकरणावर निवडणूक आयोगाकडून अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नसली, तरी आयोगाने या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहे.

# आरोप करण्यापूर्वी आत्मपरीक्षण करा

**अजित पवारांवर भाजपाचा पलटवार**

◆ **पुणे, ३ जानेवारी**

भ्रष्टाचाराचा आरोप करण्यापूर्वी आत्मपरीक्षण करा, असा पलटवार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शनिवारी केला. भाजपाची सत्ता असलेली पिंपरी-चिंचवड महापालिका भ्रष्टाचार आणि कर्जाच्या विळख्यात असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला होता.

भाजपाने आरोप सुरू केल्यास अजित पवार यांच्यासमोर अतिशय गंभीर अडचणी निर्माण होतील, असे सांगताना रवींद्र चव्हाण यांनी भ्रष्टाचाराचे कोणतेही आरोप करण्यापूर्वी आत्मपरीक्षण करा, असा सल्ला अजित पवारांना दिला. मागील नऊ वर्षांपासून महापालिकेत भ्रष्टाचार बोकाळला असून, याच काळात ती कर्जाच्या खाईत लोटली गेली, या अजित पवार यांनी केलेल्या आरोपावर रवींद्र चव्हाण उत्तर देत होते. २०१७ ते २०२२ या कालावधीत पिंपरी-चिंचवड महापालिकेवर भाजपाची सत्ता होती. त्यानंतर राज्य सरकारच्या प्रशासकाच्या ताब्यात महापालिका गेली होती. महापालिकेच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी होत आहे. राज्यात एकूण २९ महापालिका आहेत.

होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर अजित पवार यांनी उपरोक्त वक्तव्य केले आहे. कोणत्या पक्षाबद्दल वक्तव्य केले, याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले पाहिजे. त्यांचे हे वक्तव्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील पक्षाबाबत होते का, असा सवाल रवींद्र चव्हाण यांनी अजित पवारांना केला.

आम्ही आरोप करणे सुरू केले, तर अजित पवार यांच्यासमोर गंभीर समस्या निर्माण होतील, असे चव्हाण यांनी म्हटले. (वृत्तसंस्था)



अर्ज माघारी घेतल्यानंतर युती आणि आघाड्यांचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर शनिवारपासून प्रचाराचा धडाका सुरू झाला आहे. सांगली येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सभा झाली. यावेळी उपस्थित मंत्री चंद्रकांत पाटील आणि मान्यवर

### नदीतून काढला १८०० किलो कचरा

◆ **इटानगर, ३ जानेवारी**

एनर्जी पार्क परिसरातील यागामसो नदीतून शनिवारी एका स्वयंसेवी संस्थेने आयोजित केलेल्या स्वच्छता मोहिमेदरम्यान सुमारे १,८०० किलो कचरा काढण्यात आला. नदीतून गोळा केलेल्या मोठ्या प्रमाणात कचऱ्यामध्ये प्रामुख्याने घरगुती प्लॅस्टिकच्या वस्तू आणि बांधकाम साहित्याचा मलबा होता. तो शहरी जलस्रोतांवर कचऱ्याच्या अयोग्य विल्हेवाटीच्या वाढत्या परिणामावर प्रकाश टाकते, असे एका स्वयंसेवी संस्थेच्या अधिकाऱ्याने सांगितले. पर्यावरणाच्या दृष्टीने जबाबदार विल्हेवाट लावण्यासाठी, युथ मिशन फॉर क्लीन रिव्हरच्या स्वयंसेवकांनी घटनास्थळीच कचऱ्याचे वर्गीकरण केले. (वृत्तसंस्था)

# नको सुट्या पैशाची कटकट.. तिकीट काढा झटपट..!

## एसटीच्या यूपीआय पेमेंटला प्रवाशांची वाढती पसंती...

◆ **मुंबई, ३ जानेवारी**

राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बससेवेमध्ये डिजिटल व्यवहारांना प्रवाशांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून, फोन पे, गुगल पे व तत्सम यूपीआय पेमेंटच्या माध्यमातून तिकीट काढण्याच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र समोर आले आहे.

सप्टेंबर ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील आकडेवारीनुसार एसटी महामंडळामध्ये दररोज लाखोंच्या संख्येने यूपीआय व्यवहार यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहेत. सप्टेंबर २०२५ महिन्यात एकूण सुमारे ४९.७९ लाखांहून अधिक यूपीआय द्वारे तिकीट व्यवहार झाले असून त्यातून ६४.०० कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. ऑक्टोबर महिन्यात ही संख्या आणखी वाढत ७७.३२ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. तर नोव्हेंबर २०२५ मध्ये यूपीआय व्यवहारांमधून सुमारे ७८.६६ कोटी रुपयांचा महसूल मिळाल्याची नोंद आहे. डिसेंबर २०२५ मध्येही हीच वाढती प्रवृत्ती कायम राहिली असून, एकूण सुमारे ६२.५९ लाखांहून अधिक युपीआयद्वारे तिकीट व्यवहार झाले असून, त्यातून ८३.६७ कोटी रूपये महसुल जमा झाला आहे. (तभा वृत्तसेवा)



### अपहार थांबणार, पारदर्शकतेत वाढ

एसटी महामंडळाने बसस्थानकांवर, तिकीट खिडक्यांवर तसेच प्रवासादरम्यान कंडक्टरकडून यूपीआय पेमेंटची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचत असून रोख रकमेचा व सुटे पैसे ठेवण्याचा त्रास कमी झाला आहे. अर्थात, त्यामुळे सुट्या पैशावरुन वाहकांशी होणाऱ्या अनावश्यक वाद-विवादाला पूर्ण विराम मिळाला आहे. याबरोबरच काही वाहकांकडून होणारा पैशाचा अपहार रोखण्यासाठी देखील डिजिटल पेमेंट प्रक्रियेची मदत झाली आहे. त्यामुळे यूपीआय व्यवहारांमुळे पारदर्शकता वाढली असून, महसूल गळतीला आळा बसण्यास मदत होत आहे.

# ५४ जणांवर मनी लॉण्ड्रिंगचे आरोप

## शिक्षक घोटाळा ● ईडीचे न्यायालयात आरोपपत्र


◆ **नवी दिल्ली, ३ जानेवारी**

पश्चिम बंगालमधील शिक्षक घोटाळ्यातील आरोपी आमदार आणि माजी शिक्षण मंत्री पार्थ चॅटर्जी, अर्पिता मुखर्जी आणि आमदार माणिक भट्टाचार्य यांच्यासह ५४ जणांविरोधात अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने मनी लॉण्ड्रिंग कायद्यान्वये गुन्हे दाखल केले. या प्रकरणात करण्यात आलेल्या वेगवेगळ्या कारवायांमध्ये एकूण ४८६ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली. यात रोख रकमेचा समावेश असल्याची माहिती विशेष न्यायालयात दाखल केलेल्या आरोपपत्रात नमूद आहे.

आरोपपत्रात म्हटले की, मंत्री, आमदार, अधिकारी आणि इतर व्यक्तींनी शिक्षक भरतीमध्ये कोट्यवधी रुपये कमावले. घोटाळ्यात आमदार आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, वस्त्रोद्योग आणि सुधारणा प्रशासनाचे प्रभारी मंत्री चंद्रनाथ सिन्हा यांचाही सहभाग असून त्यांची ३.६५ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली. पात्र उमेदवारांना वगळून लाखो रुपये घेऊन अपात्र उमेदवारांना नोकरी देण्यात आली. प्राथमिक शिक्षकांच्या भरतीत निष्पक्षता पाळण्यात आली नाही. गुन्हेगारी कट रचून कोट्यवधी रुपयांची मालमत्ता जमवण्यात आली, ज्याच्या मदतीने आरोपींनी जंगम आणि स्थावर मालमत्ता खरेदी केल्याचे तपासात आढळून आले. भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांखाली सीबीआयने नोंदवलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीने या प्रकरणाची चौकशी करून आरोपपत्र सादर केले. (वृत्तसंस्था)

### माजी मंत्र्याच्या घरात आढळले ४९ कोटी रोख

पश्चिम बंगालचे माजी शिक्षण मंत्री पार्थ चॅटर्जी आणि त्यांची निकटवर्तीय अर्पिता मुखर्जी यांचे घर आणि कार्यालयावर टाकण्यात आलेल्या छाप्यात ४९.८० कोटी रुपये रोख आणि ५.०८ कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त केले. त्यानंतर पार्थ चॅटर्जी आणि अर्पिता मुखर्जी यांच्यासह सात जणांना अटक करण्यात आल्याचे ईडीने म्हटले आहे. घोटाळ्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये, ईडीने ४८६ कोटींची मालमत्ता जप्त केली.



नायगावमध्ये सावित्रीबाईंचे घर उभारण्यासाठी आम्हाला २५ ते ३० लाख रुपयांसाठीही सरकारी नियमांचा आणि परवानगीचा मोठा संघर्ष करावा लागला होता. पण आता दीडशे कोटी रुपयांच्या कामाचे भूमिपूजन झाले आहे.

**-छगन भूजबळ** (मंत्री)


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

रविवार, ४ जानेवारी २०२६ ३




फुले, शाहू व आंबेडकरांचे नाव घेणारे आज बोडके व आंदेकरांसारख्या गुंडांच्या कुटुंबीयांना तिकीट देतात. पवारांचे दात तोंडात नाहीत, तर पोटात आहेत. अजित पवार व शरद पवार वेगवेगळे नाहीत. ते एकच होते व आहेत.

**-लक्ष्मण हाके** (ओबीसी नेते)



प्रयागराज येथे पवित्र संगमावर माघ मेळ्याला प्रारंभ झाला असून पौष पौर्णिमेच्या दिवशी असंख्य भाविकांनी स्नान केले

# बुद्धांचे पवित्र अवशेष भारताच्या वारशाचा भाग

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, ३ जानेवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी बुद्धांशी संबंधित पवित्र प्राचीन रत्ने आणि अस्थींच्या अवशेषांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन केले आणि ते केवळ कलावस्तू नसून, भारताच्या पूजनीय वारशाचा भाग आहेत, असे प्रतिपादन केले.

पवित्र पिप्रहवा अवशेष व्हिएतनाम, थायलंड आणि रशियासारख्या मोठ्या बौद्ध लोकसंख्या असलेल्या विविध देशांमध्ये नेण्यात आले. तिथे श्रद्धा आणि भक्तीची लाट उसळली आणि लोक मोठ्या संख्येने आदरांजली वाहण्यासाठी उपस्थित राहिले, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

भगवान बुद्धांचा हा सामायिक वारसा या गोष्टींचा पुरावा आहे की, भारत केवळ राजकारण, मुत्सद्देगिरी आणि अर्थव्यवस्था यांच्याद्वारेच नव्हे, तर भावना, श्रद्धा आणि अध्यात्म यांच्यासारख्या सखोल बंधांनी जोडलेला आहे, असे नरेंद्र मोदी यांनी दक्षिण दिल्लीतील किला राय पिथोरा सांस्कृतिक संकुलात 'द लाईट अॅण्ड द लोटस : रेलिक्स ऑफ अवेकन्ड वन' या प्रदर्शनाच्या उद्घाटनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले.



### जगभरातील बौद्ध तीर्थक्षेत्रांमध्ये बोधी वृक्षाची रोपे

जगभरातील बौद्ध तीर्थक्षेत्रांमध्ये बोधी वृक्षाची रोपे घेऊन जाण्याचा कटाक्ष ठेवला आहे. अणुबॉम्बने उद्ध्वस्त झालेल्या हिरोशिमा शहराच्या वनस्पती उद्यानात जेव्हा एक बोधीवृक्ष उभा असतो, तेव्हा मानवतेसाठी असलेला त्याचा गहन संदेश कुणीही कल्पना करू शकतो, असे मोदी म्हणाले. ■

सरकार आणि गोदरेज समूहाच्या हस्तक्षेपामुळे पवित्र अवशेष १२५ वर्षांपेक्षा जास्त काळानंतर भारतात परत येत आहेत. मागील वर्षी मे महिन्यात हाँगकाँग त्यांचा लिलाव होण्यापासून रोखले होते, अशी आठवण नरेंद्र मोदी यांनी करून दिली. भारतासाठी भगवान बुद्धांचे अवशेष केवळ कलाकृती नाहीत; ते आपल्या आदरणीय वारशाचा एक भाग आहे आणि आपल्या संस्कृतीचा अविभाज्य घटक आहेत, असे मोदी यांनी बौद्ध, विद्वान, मुत्सद्दी आणि इतर पाहुण्यांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रमात सांगितले.

भारत केवळ भगवान बुद्धांच्या पवित्र अवशेषांचा संरक्षकच नाही, तर त्यांच्या परंपरेचा जिवंत वाहकही आहे. माझे जन्मस्थान असलेले गुजरातमधील वडनगर हे बौद्ध अभ्यासाचे एक प्रमुख केंद्र होते आणि वाराणसीजवळील सारनाथ, जिथे भगवान बुद्धांनी आपला पहिला उपदेश दिला होता, ती माझी कर्मभूमी आहे, असे नरेंद्र मोदी यांनी वैयक्तिक संदर्भ देताना सांगितले.

श्रीलंकेतील अनुराधापुरा येथील जया श्री महाबोधीला दिलेली भेट हा सम्राट अशोक, भिक्खू महिंद आणि संघमित्रा यांनी रुजवलेल्या परंपरेशी जोडले जाण्याचा एक अनुभव होता.

### तीर्थयात्री म्हणून बौद्धस्थळांना भेटी दिल्या

सरकारमध्ये येण्यापूर्वी तीर्थयात्री म्हणून बौद्धस्थळांना भेटी दिल्या होत्या आणि पंतप्रधान म्हणूनही जगभरातील बौद्ध तीर्थस्थळांना भेट देण्याचा बहुमान मिळाला आहे. नेपाळमधील लुंबिनी, जपानमधील तो-जी आणि किंकाकू-जी मंदिर, चीनच्या शीआनमधील जायं वाईल्ड गूज पॅगोडा आणि मंगोलियातील गांडन मठाला दिलेल्या भेटीची त्यांनी आठवण काढली. ■

थायलंडमधील वॉट फो आणि सिंगापूरमधील बुद्ध दंत अवशेष मंदिराला दिलेल्या भेटीमुळे भगवान बुद्धांच्या शिकवणीच्या प्रभावाबद्दलची समज आणखी दृढ झाली, असे नरेंद्र मोदी म्हणाले. *(वृत्तसंस्था)*

# चीन बलुचिस्तानमध्ये लष्कर तैनात करणार

### जयशंकर यांना बलोच यांचे खुले पत्र, भारताकडे मदतीची साकडे

◆ **क्वेट्टा, ३ जानेवारी**

येत्या काही महिन्यात चीनचे लष्कर पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात तैनात करणार असल्याचा दावा बलोच नेते मीर यार बलोच यांनी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांना पाठविलेल्या पत्रातून केला. त्यांनी भारताकडे मदतीची मागणी केली आहे .

बलोच यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, जयशंकर यांना पत्र पाठवून बलुचिस्तान प्रांतात चिनी सैन्याची माहिती दिली आहे. पाकिस्तान आणि चीन यांच्यातील भागीदारी शेजारी देशांसाठी धोकादायक आहे. या भागात सरकार पुरस्कृत हिंसाचार आणि मानवी हक्कांचे उल्लंघन सुरू असताना जनतेचा आवाज दाबण्यासाठी चिनी सैन्याची मदत घेतली जाणार आहे. सरकार पुरस्कृत दहशतवाद गेल्या ७९ वर्षांपासून सुरू असून, आता यांना मुळापासून उखडून टाकून आमच्या देशात शांतता प्रस्थापित करण्याची वेळ आली आहे.



पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉर प्रकल्पाला गती देण्यासाठी चीनी सैन्य बलुचिस्तानात तैनात करण्याचा निर्णय घेण्यात आला. बलुच सुरक्षा दलाची ताकद वाढली नाही तर या भागात चीनच्या लष्कराची थेट हलचाल सुरू होईल. चीन लष्कर तैनात केले तर त्याचे गंभीर परिणाम या भागाला भोगावे लागतील. *(वृत्तसंस्था)*

# लष्कराला मिळेल 'रॅमजेट' तोफगोळा

### मारक क्षमता वाढणार ● चाचणी यशस्वीरित्या पूर्ण

◆ **नवी दिल्ली, ३ जानेवारी**

भारतीय तोफखाना दलाकडे लवकरच 'रॅमजेट इंजिन' चलित तोफगोळा सुपूर्द केला जाणार आहे. हे स्वदेशी तंत्रज्ञान आयआयटी मद्रास आणि भारतीय लष्कराने संयुक्तपणे विकसित केले आहे. राजस्थानमधील पोखरण फील्ड फायरिंग रेंजमध्ये या तोफगोळ्यांच्या विकासात्मक चाचण्या अलीकडेच यशस्वीरित्या पूर्ण झाल्या.

आत्मनिर्भर भारत अभियानाकडे वाटचाल करणारे हे एक मोठे आणि महत्त्वाचे पाऊल आहे. या 'रॅमजेट इंजिन'मुळे तोफगोळ्याची मारक क्षमता ३० ते ५० टक्क्यांनी वाढणार आहे. याची यशस्वी चाचणी झाली असली तरी ही प्रणाली अजूनही अधिक उत्कृष्ट बनण्याच्या टप्प्यात आहे. एकदा पूर्णपणे विकसित झाल्यानंतर, हे




तंत्रज्ञान भारतीय सैन्याच्या सर्व तोफखाना प्रणालींना लागू होईल. यात एम ७७७ अल्ट्रा-लाइट हॉवित्झर, एटीएजीएस, धनुष, के९ वज्र आदी तोफांचा समावेश आहे. नवीन कॅलिबर किंवा प्लॅटफॉर्म विकसित करण्याची आवश्यकता नाही. ते विद्यमान १५५ मिमी तोफगोळ्यांवर रेट्रोफिट केले जाऊ शकते. रॅमजेट इंजिन हवेतून ऑक्सिजन काढून सतत वेग निर्माण करते. यामुळे प्रक्षेपणानंतरही प्रक्षेपणास्त्राचा वेग कायम राहतो. सध्याच्या क्षेपणास्त्रांची मारक क्षमता ३० ते ४० किमी आहे, परंतु या तंत्रज्ञानामुळे ती क्षमता दुप्पट होईल. प्रक्षेपण केल्यानंतर गोळा मॅक ३ किंवा ३७०४.४ किमीप्रतितास वेगाने पोहोचू शकते. यामुळे त्याची घातकता आणखी वाढेल. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### 'बॉर्डर २' चित्रपटाचे गाणे प्रदर्शित

**मुंबई :** 'बॉर्डर २' चित्रपटातील 'घर कब आओगे' या गाण्याचा प्रकाशन सोहळा लोंगेवाला-तनोट परिसरात आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा जवानांच्या उपस्थितीत पार पडला. याला अभिनेता सनी देओल, वरुण धवन, अहान शेट्टी, गायक सोनू निगम आणि चित्रपटाचे सह-निर्माते भूषण कुमार व निधी दत्ता यांच्यासह टीमचे अनेक सदस्य उपस्थित होते. 'घर कब आओगे' हे गाणे सर्वात लोकप्रिय देशभक्तीपर गीतांपैकी एक आहे. गाण्याच्या नवीन आवृत्तीमध्ये सोनू निगम आणि रूप कुमार राठोड यांच्यासह अरिजित सिंग, विशाल मिश्रा आणि दिलजीत दोसांझ यांचे आवाज आहेत. संगीत मिथुनने पुन्हा तयार केले आहे, तर गीतांमध्ये जावेद अख्तर यांच्या मूळ शब्दांसोबत मनोज मुंतशिर यांच्या ओळी जोडल्या आहेत. ■




### 'धुरंधर'च्या कमाईचा वेग मंदावला

**मुंबई :** आतापर्यंत 'धुरंधर' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर रग्गड कमाई केली आहे. चित्रपटगृहात प्रदर्शित झाल्यानंतर पाचव्या शुक्रवारी, चित्रपटाची एका दिवसाची कमाई पहिल्यांदाच १० कोटी रुपयांपेक्षा कमी झाली. भारतात सध्या 'धुरंधर' सुमारे ३,८०० स्क्रीन्सवर सुरू आहे, परंतु १ जानेवारी रोजी प्रदर्शित झालेल्या धर्मेंद्रच्या 'इक्कीस' या चित्रपटानंतर प्रदर्शनानंतर 'धुरंधर'च्या स्क्रीन्समध्ये घट होऊ लागली आहे. 'धुरंधर' आणि 'इक्कीस' या दोन्ही चित्रपटांना जिओ स्टुडिओने पाठिंबा दिला आहे. अशा स्थितीत, 'धुरंधर'च्या सुमारे ५० टक्के स्क्रीन्स अगस्त्य नंदा अभिनीत 'इक्कीस' चित्रपटाला देण्यात आल्या आहेत. या चित्रपटात अगस्त्य नंदा याच्यासह धर्मेंद्र आणि जयदीप अहलावत देखील महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत. ■



### ग्लॅमरस तारा दिसणार रहस्यमय भूमिकेत

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेत्री तारा सुतारिया सध्या तिच्या आगामी चित्रपट 'टॉक्सिक'मुळे चर्चेत आली आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या दिग्दर्शिका गीतू मोहनदास यांच्या या चित्रपटात तारा 'रिबेका' नावाच्या महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकणार आहे. नुकताच या चित्रपटातील ताराचा फर्स्ट लूक जाहीर करण्यात आला आहे. फर्स्ट लूकमध्ये तारा सुतारिया एका गंभीर आणि रहस्यमय अंदाजात दिसत आहे. आतापर्यंत ग्लॅमरस आणि रोमँटिक भूमिकांसाठी ओळखली जाणारी तारा या चित्रपटात पूर्णपणे वेगळ्या भूमिकेत दिसणार आहे. 'टॉक्सिक ए फेयरीटेल फॉर ग्रोन-अप्स' चित्रपटा त साऊथ स्टार यश, कियारा आडवाणी, हुमा कुरैशी मुख्य भूमिकेत आहेत. चित्रपट प्रदर्शनाची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. ■



# अभिनेता आशिष विद्यार्थी अपघातात जखमी

◆ **मुंबई, ३ जानेवारी**

बॉलिवूड अभिनेता आशिष विद्यार्थी आणि त्यांची पत्नी रुपाली बरुआ एका रस्ते अपघातात जखमी झाले. हा अपघात शुक्रवारी रात्री द गुवाहाटी अॅड्रेस हॉटेलसमोर घडला. पोलिसांच्या माहितीनुसार, भरधाव वेगाने येणाऱ्या एव्हेंजर बाईकने रस्ता ओलांडताना दोघांना धडक दिली. ही बाईक चांदमारीच्या दिशेने येत होती. आशिष विद्यार्थी आपल्या पत्नीसह हॉटेल अॅड्रेसमध्ये जेवायला गेले होते. जेवण झाल्यानंतर हे कपल एकत्र हॉटेलमधून बाहेर पडले. हॉटेलमधून बाहेर पडल्यानंतर दोघेही रस्ता पार करत होते. रस्ता ओलांडत असताना भरधान मोटारसायकलने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी जबर होती की, दोघेही गंभीर जखमी झाले. स्थानिकांनी तातडीने पोलिसांना कळवले. त्यांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सध्या दोघांचीही प्रकृती स्थिर आहे. *(वृत्तसंस्था)*


# इंदूरमधील दूषित पाण्यामुळे आणखी सहा जणांचा मृत्यू

### २०० हून अधिक रुग्णालयात दाखल ● महापालिका आयुक्तांची बदली ● दोन वरिष्ठ अधिकारी निलंबित

◆ **इंदूर, ३ जानेवारी**

मध्य प्रदेशातील इंदूर शहरात दूषित पिण्याच्या पाण्यामुळे अतिसाराच्या आजाराने आणखी ६ लोकांचा मृत्यू झाला असून, २०० हून अधिक जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, असे एका वरिष्ठ वैद्यकीय अधिकाऱ्याने शनिवारी सांगितले.

या साथीमुळे १० रुग्णांच्या मृत्यूची माहिती आपल्याला मिळाली आहे, असे इंदूरचे महापौर पुष्यमित्र भार्गव यांनी शुक्रवारी सांगितले होते, तर सहा महिन्यांच्या बालकासह १६ लोकांचा मृत्यू झाला आहे, असा दावा भागीरथपुरा भागातील रहिवाशांनी केला आहे. सध्या शहरातील ४१ रुग्णालयांमध्ये २०३ रुग्णांवर उपचार सुरू आहेत आणि सहा लोकांचा मृत्यू झाला आहे. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांपैकी ३४ रुग्ण अतिदक्षता विभागात (आयसीयू) आहेत व त्यांच्या उपचारांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे, असे जिल्हाधिकारी शिवम वर्मा यांनी सांगितले.



भागीरथपुरा परिसरात उद्भवलेल्या आरोग्य संकटाच्या पृष्ठभूमीवर मध्य प्रदेश सरकारने इंदूरच्या महापालिका आयुक्तांची बदली केली असून दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांना निलंबित केले आहे. आपण महापालिका आयुक्त दिलीप कुमार यादव यांच्या बदलीचे व अतिरिक्त महापालिका आयुक्त रोहित सिस्सोदिया व सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाचे प्रभारी अधीक्षक अभियंता संजीव श्रीवास्तव यांच्या निलंबनाचे आदेश दिले आहेत, असे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी शुक्रवारी सांगितले. दूषित पाणीपुरवठ्यामुळे झालेल्या अतिसाराच्या साथीवर आता प्रभावीपणे नियंत्रण मिळवण्यात आले आहे व कोणताही पुनरुद्भव टाळण्यासाठी सतत मिनिट-दर-मिनिट निरीक्षण केले जात आहे, असे शासनाने उच्च न्यायालयासमोर सादर केलेल्या स्थिती अहवालात म्हटले आहे. *(वृत्तसंस्था)*

### हायकोर्टाची इंदूर प्रशासनाला नोटीस

मध्य प्रदेशातील इंदूर शहरातील भागीरथपुरा परिसरात दूषित पाण्यामुळे झालेल्या मृत्यूंच्या घटनेवर मध्य प्रदेश उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिकेवर न्यायालयाने प्रशासनाला नोटीस बजावून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. या प्रकरणाची पुढील सुनावणी ६ जानेवारी रोजी होणार आहे. न्यायालयाने इंदूर महानगरपालिकेचे आयुक्त दिलीप यादव आणि अतिरिक्त आयुक्त रोहित सिसोनिया यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. ■

# रंगदेवतेच्या कृपेने 'दशावतार' ऑस्करच्या दारात

### चित्रपटाची 'मेन ओपन फिल्म कॅटेगरी'मध्ये निवड

◆ **मुंबई, ३ जानेवारी**

अभिनेते दिलीप प्रभावळकर यांच्या अभिनयाने गाजलेल्या 'दशावतार' या चित्रपटाची ऑस्कर स्पर्धेसाठी निवड झाली आहे. २०२५ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. हा क्षण सर्व मराठी माणसांसाठी अभिमानाचा ठरला आहे. मराठी सिनेइतिहासात पहिल्यांदाच चित्रपटाची 'मेन ओपन फिल्म कॅटेगरी'मध्ये निवड झाली आहे.

कोकणच्या अस्सल मातीत तयार झालेला आणि कलेवर जीवापड प्रेम करणाऱ्या एका निष्ठावंत कलाकाराचा अवतार असलेला 'दशावतार' हा चित्रपट अमराठी प्रेक्षकांनाही भावला. दिलीप प्रभावळकर यांनी वयाच्या ८१ व्या वर्षी या चित्रपटात साकारलेल्या 'बाबुली मिस्त्री'च्या भूमिकेचे प्रेक्षकांनी भरभरून कौतुक केले. 'दशावतार'




चित्रपटाची ९८ व्या ऑस्कर पुरस्कारांच्या मुख्य स्पर्धेत निवड झाली आहे. हा चित्रपट मल्याळम भाषेतही प्रदर्शित करण्यात आला होता. अकॅडमी अवॉर्ड्सच्या मुख्य स्पर्धेसाठी जगभरातून १५० हून अधिक चित्रपटांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये 'दशावतार' हा एकमेव मराठी चित्रपट आहे. विशेष म्हणजे अकॅडमीच्या स्क्रीनिंग रूममध्ये दाखवला जाणारा हा पहिलाच मराठी चित्रपट ठरणार आहे, असे दिग्दर्शक सुबोध खानोलकरांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

### दमदार कलाकारांसह बॉक्स ऑफिसवरही कमाई

हा चित्रपट ऑस्करच्या दारात पोहोचण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे या चित्रपटातील कलाकारांनी केलेल्या दमदार भूमिका आहेत. याला जोड बॉक्स ऑफिस कलेक्शनची मिळोली. दिलीप प्रभावळकर, महेश मांजरेकर, भरत जाधव, सिद्धार्थ मेनन, प्रियदर्शिनी इंदलकर, अभिनय बेर्डे, विजय केंकरे, सुनील तावडे असे दमदार कलाकार या चित्रपटात आहेत. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर २८.४७ कोटींची कमाई केली आहे. ■

# रिसिन हल्ल्याच्या कटाचा तपास एनआयएकडे

◆ **अहमदाबाद, ३ जानेवारी**

अत्यंत घातक समजल्या जाणाऱ्या रिसिन या विषाचा वापर करीत रचलेल्या हल्ल्याच्या कटाचा तपास राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएकडे सोपवण्याचा आदेश केंद्रीय गृह मंत्रालयाने दिला, अशी माहिती गुजरात दहशतवादविरोधी पथकाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

शस्त्रास्त्र आणि रसायनांचा वापर करून मोठा दहशतवादी हल्ला घडवण्याचा कट रचल्याच्या आरोपाखाली गुजरात एटीएसने मागील वर्षी ९ नोव्हेंबर रोजी डॉ. अहमद मोहियुद्दिन सईद, आझाद सुलेमान शेख आणि मोहम्मद सुहैल मोहम्मद सलीमला अटक केली होती. भारतीय न्याय संहिता आणि शस्त्रास्त्र कायद्यासोबतच तपास यंत्रणेने तिघांवरही बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. गृह मंत्रालयाने रिसिन रासायनिक कटाशी संबंधित बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याचे प्रकरण एनआयएकडे सोपवण्याचा आदेश दिला, असे एटीएसचे पोलिस अधीक्षक के. सिद्धार्थ यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

रिसिन हा एक अत्यंत विषारी पदार्थ आहे. या प्रकरणाचा तपास करणाऱ्या गुजरात एटीएसने हैदराबाद येथील मूळ रहिवासी डॉ. सय्यदला ७ नोव्हेंबर रोजी गांधीनगरजवळील अडालज येथून अटक करीत त्याच्या ताब्यातून दोन ग्लॉक पिस्तूल, एक बेरेटा पिस्तूल, ३० जिवंत काडतुसे आणि चार लिटर एरंडेल तेल जप्त केले होते, असे अधिकाऱ्यांनी यापूर्वी सांगितले होते. *(वृत्तसंस्था)*


**Nagpur Nagarik Sahakari Bank Ltd. Nagpur**

**A Multi State Scheduled Bank**

is expanding its branch Network in current year, **Conducting Written Test followed by Interviews for the Post of "Branch Manager" & "Officers".** Last Date for Application is **20th January 2026.** Details like: Qualification/ Experience for Application is available on the official website of the Bank : **www.nns.bank.in** Interested Candidates are requested to visit the site and download the details.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

दिनेश गुणे

# काळाच्या प्रवाहातील सांडपाणी

'महाराष्ट्रात सांगलीशेजारच्या पेठ गावाजवळ एका खाजगी कारखान्याचे शौचकूप स्वच्छ करताना तीन कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला. अन्य पाच कामगार दूषित हवेमुळे अत्यवस्थ असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत!'

उभे जग नव्या वर्षाच्या स्वागतासाठी सज्ज होत असताना, मावळत्या वर्षातील डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यातील अखेरच्या रविवारी ही दुर्दैवी घटना घडली आणि हाताने मैला साफ करण्याच्या अमानवी प्रथेचे समूळ उच्चाटन करण्याच्या आणाभाकांची आठवण नव्याने जागी झाली. याआधी केंद्र सरकारने, राज्य सरकारांनी आणि न्यायालयांनीदेखील या अमानवी प्रथेच्या उच्चाटनाचे आदेश, सूचना, मार्गदर्शक तत्त्वे आणि कायदेही जारी केले होते. पण सामाजिक न्यायाच्या संकल्पनेस हरताळ फासणारी ही कुप्रथा अजूनही बंद झालेली नाहीच, उलट वर्षागणिक अशाच दुर्दैवी घटनांमध्ये होणाऱ्या मृत्यूंच्या बातम्यांनी माध्यमांचे रकाने मात्र अव्याहतपणे वाहताना दिसतात... तीन साडेतीन वर्षांपूर्वी, मार्च २०२२ मध्ये मुंबईच्या चारकोप भागात सार्वजनिक शौचालयाची टाकी साफ करताना चार जणांचा गुदमरून मृत्यू झाला होता, तर चार वर्षांपूर्वी चंद्रपूर जिल्ह्यात बल्लारपूर परिसरात सांडपाण्याची भूमिगत टाकी स्वच्छ करताना तीन कंत्राटी मजूर घुसमटून दगावले. सुमारे दोन वर्षांपूर्वी परभणीत सेफ्टी टँक साफ करताना पाच कामगार दगावले, तर बरोबर एक वर्षापूर्वी, ३ जानेवारी २०२५ रोजी रायगड जिल्ह्यातील उरणजवळील एका गावात स्वच्छतागृहाची टाकी साफ करणाऱ्या दोन मजुरांचा विषारी वायूमुळे गुदमरून मृत्यू झाला. कायदे, नियम आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पना धुडकावून ही कुप्रथा आजही सर्वत्र सुरू आहे, हा या घटनांचा अर्थ आहे!

समाजाच्या कोणत्याही घटकास अपमानकारक, अमानवी ठरणारी कोणतीही प्रथा काळाच्या प्रवाहासोबत नष्ट व्हावी हे प्रगत समाजव्यवस्थेचे लक्षण असते. भारतातील बहुसंख्यांच्या समाजाने तसे करून दाखविले आहे. गैरसमजुतीमुळे किंवा केवळ प्रथांमुळे पडलेल्या अनेक रूढी, परंपरा काळासोबत मागे पडल्या. आता जग जवळ आलेले असताना व प्रगतीची पावले वेगाने पडत असताना त्यापैकी अनेक अनावश्यक प्रथा तर समाजाच्या स्मरणातूनही पुसल्या गेल्या आहेत. तरीही काही प्रथा अधूनमधून आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत असतात. हाताने मैला साफ करण्याची प्रथा हा देशाच्या समाजव्यवस्थेचा कलंक अजूनही अस्तित्वात असल्याचे दिसते, तेव्हा, वेगवेगळ्या क्षेत्रांत घोडदौड करणारी प्रगतीची आणि नवतंत्रज्ञानांची पावले या प्रथेबाबत मात्र पेंड का खातात असा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न जुनाच आहे. तरीही, प्रत्येक वेळी जेव्हा तो नव्याने समोर येतो, त्याची गंभीर चर्चा होते, या प्रथेविषयी चीड व्यक्त केली जाते, मानवाधिकाराच्या मुद्यांचा खल होतो, अगदी न्यायालयांपासून संसदेपर्यंत आणि राज्य सरकारांपासून सामाजिक संघटनांपर्यंत सर्व मंचांवर या प्रथेच्या संपूर्ण निर्मूलनाची गरज व्यक्त होते, आणाभाका घेतल्या जातात, तरीही ही प्रथा समूळ नष्ट झालेली नाही याचे अनेक दाखले या कुप्रथेमुळे जागोजागी घडणाऱ्या जीवघेण्या घटनांमधून उघड होत असतात. मानवी विष्ठा किंवा मैला किंवा मलद्रव्यांची सफाई करण्यासाठी मानवी हातांना पर्याय का सापडत नसावा, असा प्रश्न वारंवार विचारला जातो. आता सफाई करणारी यंत्रे उपलब्ध आहेत, कृत्रिम बुद्धिमत्तेसारखे तेजस्वी दुधारी हत्यार मानवाच्या हाती सापडले आहे आणि समाजसुधारणेचे आणि विकासाचे संकल्प सोडून त्याची प्रामाणिक अंमलबजावणी करण्याची उमेद असलेले नेतृत्वदेखील आहे, तरीही मानवी हाताने सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि शौचालये स्वच्छ करण्याची प्रथा देशातून पूर्णपणे हद्दपार झाल्याचा छातीठोक दावा करण्यास अजूनही कोणतीच यंत्रणा धजावत नाही, ही भारताच्या अमृतकाळातील एक लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल. या प्रथेविरुद्ध संसदेत आवाज उमटले, अनेक सरकारांनी या प्रथेचे उच्चाटन करण्याची आश्वासने दिली, कित्येक दशकांपासून संसदेसारख्या अत्युच्च सभागृहात या प्रथेच्या संदर्भात प्रश्नोत्तरे, चर्चा, विधेयके, कायदे यांबाबत ऊहापोहदेखील झाला, तरीही या प्रथेची पाळेमुळे अजूनही पुरती नष्ट झालेली नाहीत. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात मार्च २०२४ मध्ये मंत्रिमंडळाच्या एका बैठकीतही या प्रथेविषयी गंभीर चर्चा झाली. हाताने मैला उचलण्याच्या प्रथेचे समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार राज्य सरकारने एका निर्णयाद्वारे जाहीर केला. यंत्रमानवाच्या साह्याने हे काम करण्याची योजनादेखील जाहीर झाली, तिचा भरपूर गाजावाजाही झाला. याआधीही अनेकदा सरकारी स्तरावर या प्रथेविरोधात चर्चा झडल्या असतील, निर्णयही झाले असतील, न्यायालयांनीही सरकारचे कान उपटले असतील, मात्र त्याचे काय झाले आणि यांत्रिक सफाईच्या त्या निर्णयाच्या अंमलबजावणीविषयी कोणती कार्यवाही झाली, हे अजूनही पुरते स्पष्ट झालेले नाही.

राज्य सरकारने त्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, हाताने मैला साफ करण्याच्या या प्रथेचे उच्चाटन करण्याकरिता रोबोटिक स्वच्छता यंत्रे आणि यांत्रिक उपकरणांचा वापर तसेच स्वच्छता युनिट वाहने खरेदी करण्याचे जाहीर झाले होते. राज्यातील अ आणि ब वर्ग नगरपरिषदांमध्ये पहिल्या टप्प्यात ही मोहीम राबविली जावी आणि या नगर परिषदांतील अंमलबजावणीनंतर निधी उपलब्ध राहिला, तर क वर्ग नगरपरिषदांतही ही मोहीम राबविली जावी, असाही निर्णय सरकारने घेतला आहे. राज्यातील अ, ब आणि क वर्गाच्या अनेक नगरपरिषदांत हाताने मैला साफ करण्याची प्रथा कायम आहे, असा या निर्णयाचा स्पष्ट निष्कर्ष निघतो.



'मॅनहोलकडून मशीनहोलकडे' असे या मोहिमेचे नामकरण करण्यात आले आणि या योजनेच्या अंमलबजावणीकरिता तब्बल ५०२ कोटी ४० लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यताही देण्यात आली. पाचशे कोटींहूनही अधिक रक्कम खर्चून या प्रथेला पर्याय निर्माण करण्याची गरज अधोरेखित झाली त्याआधी या प्रथेमुळे अनेक मानवी जीव गुदमरून मृत्युमुखी पडल्याच्या नोंदी महाराष्ट्रात झाल्या आहेत.

सुमारे चार वर्षांपूर्वी मुंबईत गोवंडी येथे एका खाजगी गृहसंकुलातील सेप्टिक टँकची स्वच्छता करताना तीन कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला. या कामगारांच्या कुटुंबास कायद्यानुसार नुकसान भरपाई मिळावी यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागली. हाताने मैला साफ करण्याच्या प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा २०१३ मध्ये अस्तित्वात आला. या कामाकरिता मानवी हातांचा वापर करू नये असेही या कायद्याने बजावले आहे. असे काम करणाऱ्या कुटुंबांना उदरनिर्वाहाचे पर्यायी स्रोत उपलब्ध करून देऊन त्यांचे पुनर्वसन करावे असेही या कायद्याने स्पष्ट केले आहे. तरीदेखील हाताने मैला साफ करण्याची लज्जास्पद कुप्रथा राज्यात सुरू कशी, असा सवाल न्यायालयाने केला होता. हाताने मैला साफ करण्याची प्रथा अस्तित्वात राहणार नाही याची खबरदारी घेण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे, असा परखड इशाराही न्यायालयाने त्या सुनावणीत दिला होता. ही प्रथा जिवंत असल्याच्या जाणिवेवर न्यायालयाच्या त्या इशाऱ्यानेच शिक्कामोर्तब केले आहे.

संसदेच्या दोन वर्षांपूर्वीच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान या प्रथेविषयी सभागृहासमोर प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा घडून आली. २०१८ ते २०२३ या पाच वर्षांत देशभरातील विविध राज्यांत मलद्रव्ये साफ करणाऱ्या ४०० हून अधिक कामगारांचा गुदमरून मृत्यू झाल्याची आकडेवारी सामाजिक न्याय विभागातर्फे सभागृहामार्फत देशासमोर उघड झाली. २०२३ या एका वर्षात ४९ कामगार मृत्युमुखी पडल्याची माहिती समाजकल्याण मंत्री रामदास आठवले यांनी दिली होती. २०१३ ते २०१८ या पाच वर्षांत देशातील या प्रथेचे अस्तित्व शोधण्यासाठी दोन सर्वेक्षणे करण्यात आली आणि तब्बल ५० हजारांहून अधिक कामगार मानवी मलद्रव्ये स्वच्छ करून उदरनिर्वाह करतात, असे निष्पन्न झाले. ५० हजार कुटुंबांच्या चरितार्थाचे हे साधन आहे, ही लज्जास्पद बाब या सर्वेक्षणातून उघड झाली आणि अधिक शोध घेतला गेला. यापैकी उत्तर प्रदेशातील सफाई कामगारांची संख्या सर्वाधिक म्हणजे ३२ हजार ५०० इतकी होती, तर त्याखालोखाल दुसऱ्या क्रमांकावरील महाराष्ट्रात सहा हजार ३२५ कामगारांची नोंद झाली होती. २००७ मध्ये महाराष्ट्रात हाताने मलद्रव्ये साफ करणाऱ्या कामगारांची संख्या ४५ हजार ६०० एवढी होती. सेप्टिक टँक किंवा विषारी वायू असलेली भूमिगत गटारे साफ करताना येणाऱ्या दुर्दैवी मृत्यूंची एक आकडेवारीच केंद्र सरकारने जारी केली होती. १९९३ मध्ये कायदा अस्तित्वात आल्यापासून जून २०२२ पर्यंतच्या सुमारे दहा वर्षांत देशाच्या वेगवेगळ्या राज्यांत भूमिगत गटारे आणि सेप्टिक टँक सफाई करणाऱ्या ९६६ कामगारांचा मृत्यू ओढवला होता, त्यापैकी ४१ दुर्घटना महाराष्ट्रात घडल्या होत्या. तामिळनाडूत २१८, तर गुजरातमध्ये १३६ कामगार मृत्युमुखी पडले होते. एकट्या दिल्लीत त्या काळात ९९ कामगारांचा मृत्यू झाला होता.

हाताने मलद्रव्ये सफाई करणारे कामगार आणि धोकादायक द्रव्यांच्या भूमिगत वाहिन्या स्वच्छ करणारे कामगार यांमध्ये फरक असतो. मानवी मलद्रव्यांची सफाई करणाऱ्या कामगारांना या प्रथेपासून मुक्त करावे व त्यांचे सन्मानजनक पुनर्वसन करावे असे २०१३ मध्ये लागू झालेल्या कायद्याने स्पष्ट केले आहे. तरीही जानेवारी २०२४ मध्ये देशातील सुमारे ५० जिल्ह्यांत ही प्रथा अस्तित्वात होती. मार्च २०२४ मध्ये महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतल्या गेलेल्या निर्णयानुसार, मॅनहोल ते मशीनहोल नावाची योजना राज्यात सुरू असेल, तर या कुप्रथेचे उरलेसुरले अवशेष महाराष्ट्रातून नामशेष व्हावेत आणि या लज्जास्पद कामातून मुक्त होऊन त्या कामगारांना जगण्याची प्रतिष्ठा मिळायला हवी. तसे झाले तर स्वच्छ भारत नावाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचे अमृतकाळातील ते मोठे यश ठरेल आणि दयनीय रीतीने होणाऱ्या मृत्यूंनाही आळा बसेल. मुख्य म्हणजे, जातिव्यवस्थेच्या उतरंडीमुळे वाटणीला येणारी दुर्दशा संपविण्याकरिता ही मोहीम तीव्र होणे गरजेचे आहे. ऑगस्ट २०२३ नंतर या देशात हाताने मैला साफ करण्याची प्रथा अस्तित्वात नसेल, असा निर्धार केंद्र सरकारकडून व्यक्त झाला होता. त्याला आता दोन वर्षे उलटून गेली आहेत. या कामातील कामगारांकरिता पर्यायी रोजगारसंधी उपलब्ध कराव्या लागतील, त्यांच्या कौटुंबिक पुनर्वसनाकरिता योजना तयार कराव्या लागतील आणि अशा कामाकरिता यंत्रे, उपकरणांचा वापर करण्याचे तंत्र आत्मसात करावे लागेल. ही कुप्रथा संपूर्ण नामशेष व्हावी असे आवाहन खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेकदा केले आहे. या कुप्रथेचे राज्यातून निर्मूलन कसे करणार यासंबंधीचा कृती आराखडा सादर करावा आणि राज्यस्तरीय तसेच जिल्हास्तरीय देखरेख समित्यांनी ही प्रथा रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती द्यावी असा आदेश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिला होता. 'मॅनहोल ते मशीनहोल' योजना आखून राज्य सरकारने त्यासंबंधी पावले उचलली होती. ती पावले पुढे पडण्याची गरज सांगलीजवळच्या गेल्या आठवड्यातील घटनेमुळे अधोरेखित झाली आहे.

माणूस म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येकाच्या प्रतिष्ठेचा स्तर जेव्हा समान होईल, तेव्हा सामाजिक न्यायाची संकल्पना खऱ्या अर्थाने प्रस्थापित होईल. अशा सामाजिक न्याय व्यवस्थेत जात, धर्म, पंथ किंवा कोणत्याही पेशाचा अडसर असणार नाही. पण ही सामाजिक समतेची एक स्वप्नवत व्याख्या झाली. प्रत्यक्ष मानवी व्यवहारांत हेच तर मोठे अडसर असल्यामुळे, माणसाच्या प्रतिष्ठेचे स्तर याच बाबींवरून ठरत असतात. सामाजिक समतेचा आणि वैचारिक पुरोगामित्वाचा उद्घोष करणाऱ्या महाराष्ट्रात अजूनही अशाच कुप्रथांच्या ओझ्याखाली पिचलेला वर्गदेखील दिसतो आणि त्याच्या समस्यांची ओझी दूर करण्याच्या आणाभाका घेणारा वर्गही दिसतो. गेल्या अनेक वर्षांपासून, न्यायालये, सामाजिक जाणिवा असलेला समाजघटक, स्वयंसेवी संस्था, कामगार संघटना, आंतरराष्ट्रीय संस्था वगैरे सर्व स्तरांवर आवाज उठवून, इशारे देऊन आणि प्रसंगी आंदोलनेही उभारूनही, महाराष्ट्रातील एक कुप्रथा अजूनही जिवंत असल्याचे उघडकीस येणे ही लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल. सामाजिक स्तरांच्या उतरंडीवर माणसांस बसवून त्याच्या प्रतिष्ठेचाच अपमान करण्याच्या मानसिकतेशीच या कुप्रथेचा संबध असला पाहिजे. कारण, समाजातील काही ठरावीक समूहांच्याच नशिबी या कुप्रथेचे ओझे वाहण्याची दुर्दैवी वेळ आल्याचे दिसते. या कामामुळे समाजातील एखाद्या घटकाच्या प्रतिष्ठेची किंमत कवडीमोल झालेली आहेच, पण त्याच्या जगण्याच्या अधिकारांवरही बेपर्वाईची टांगती तलवार असल्याचे स्पष्ट झाले आहे. २०११ च्या जनगणनेत देशात तब्बल २६ लाख शौचालये अनारोग्यकारी असल्याचे स्पष्ट झाले होते. अशा शौचालयांच्या सफाईसाठी वापरल्या जाणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना या कामातून मुक्त करण्याचे संकल्पही सोडण्यात आले. ही कामे करणारे १०० यंत्रमानव खरेदी करण्याचा विचार असल्याचे राज्य सरकारने जाहीर केले होते. पण या कागदी घोड्यांनी या समस्येच्या मैदानात कोणते शौर्य गाजविले, ते गुलदस्त्यातच राहिले आहे. ही कुप्रथा कायमची नष्ट कधी होणार आणि प्रतिष्ठेचे मोल मातीमोल ठरविणाऱ्या या कुप्रथेत गुरफटलेल्यांना मुक्ती कधी मिळणार हा प्रश्न त्या समस्येसारखाच ओझे होऊन राहिला आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### सनातन धर्मानुसार वाढदिवसाचा विधी

नुकताच 'तरुण भारत'मधील एका लेखामध्ये वाढदिवस साजरा करण्याच्या पाश्चात्त्य पद्धतीचा निषेधात्मक उल्लेख आहे. त्यानिमित्त आपल्या सनातन धर्मात असलेल्या वाढदिवसाच्या विधीची माहिती द्यावी असे वाटते. आपल्याला नेहमी बघून, ऐकून वाढदिवसाला केक कापणे, पुढची विकृती म्हणजे तो तोंडाला फासणे आणि मेणबत्ती विझविणे हे सामान्य वाटू लागले आणि ती प्रथा पडली. त्यातल्या त्यात कुणी सुधारणा करून म्हणजे घरी केलेला केक व मेणबत्ती न विझविता लावणे असं करतात, पण मूळ गाभा तसाच असतो.

आपल्या सनातन धर्मात वाढदिवसाचा नेमका विधी आहे हेच आपल्याला ठावूक नाही व त्यामुळे प्रचलित नाही. विनायकशास्त्री आर्वीकर आणि आमचे पुरोहित जयंत देव गुरुजी (९४२३६३७९०४) यांनी सांगितल्याप्रमाणे हा एक छोटासा विधी आहे. सर्वप्रथम गणपती वंदन आणि संकल्प करणे. मग ज्या व्यक्तीचा वाढदिवस आहे तिने हातात एका वाटीत/ फुलपात्रात थोडेसे दूध, गूळ व तिळ यांचे मिश्रण घेऊन सप्त चिरंजीवाची प्रार्थना असलेला श्लोक म्हणून ते दूध मिश्रण प्राशन करणे.

दुग्ध प्राशनाचा मंत्र असा-

**सतिलं गुड संमिश्र अंज्यलर्धमितं पयः ।**
**मार्कंडेयात वरं लब्धा पिबाम्यायुर्विवृद्धये ।**

त्यानंतर हातात थोडेसे तिळ घेऊन पुढील मंत्र म्हणावा. तिलदानाचा मंत्र-

**तिलाः कश्यपसंभूस्तातिलाः पापहराः शुभाः ।**
**तिलपात्रप्रदानेन अतः शान्ति प्रयच्छ मे ॥**

आणि ते तिळ एका मंदिरात दान करावे. त्याव्यतिरिक्त ऐपतीनुसार एखाद्या संस्थेला जास्त प्रमाणात दान करता येईल. त्यानंतर, एका ताम्हणामध्ये तूप घेऊन त्यात मुखावलोकन करणे व पुढील श्लोक म्हणणे.

आज्यावलोकनाचा मंत्र-

**आज्यं तेजः समुदिष्टं, आज्यं**
**पापहरं स्मृतम ।**
**आज्यं सुराणामहार आज्ये देवाः प्रतिष्ठताः ॥**

त्यानंतर प्रदीर्घ श्वास घेऊन त्याचा उःश्वास तुपात हळुवारपणे सोडणे. (ते तूप दिव्यात घालून मारुती किंवा महादेवाच्या मंदिरात दिवा लावणे.) हे सर्व झाल्यावर घरातील उपस्थित व्यक्तींनी (पुरुष सुद्धा) औक्षण करावे आणि भेटवस्तू देणे वगैरे. हे सर्व करायला १० मिनिटे लागतात. माझी माहिती परिपूर्ण नसेलही परंतु जिज्ञासूंनी अधिक माहिती व शास्त्रार्थ तज्ज्ञ व्यक्तींकडून जाणून घ्यावा.

**डॉ. धनंजय काणे**/९४२३४०५७४५

### राजमाता जिजाऊ : हिंदवी स्वराज्याचे प्रेरणास्थान

राजमाता जिजाबाई शहाजी भोसले (जिजाऊ) या केवळ छत्रपती शिवाजी महाराजांच्या माता नव्हत्या, तर त्या स्वराज्याच्या प्रेरणास्थान आणि खऱ्या अर्थाने शिल्पकार होत्या. त्यांचा जन्म पौष पौर्णिमा १५९८ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे झाला. जिजाऊंना बालपणापासूनच युद्धकला, राजकारण आणि घोडेस्वारीचे शिक्षण मिळाले होते. जिजाबाईंचे लग्न शहाजीराजे भोसले यांच्याशी झाले. त्या काळात महाराष्ट्र परकीय आक्रमकांच्या (निजामशाही, आदिलशाही आणि मुघल) अंमलाखाली होता. स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि मंदिरांची होणारी विटंबना पाहून जिजाऊंच्या मनात स्वराज्य स्थापनेचे बीज रुजले. त्यांनी हेच स्वप्न शिवरायांच्या डोळ्यात रुजवले. शिवरायांना घडवण्यात जिजाऊंचा सिंहाचा वाटा आहे.

त्यांनी शिवरायांना रामायण, महाभारत आणि पराक्रमी पुरुषांच्या गोष्टी सांगितल्या. न्यायनिवाडा कसा करावा, प्रजेची काळजी कशी घ्यावी आणि संकटात धीर न सोडता कसे लढावे, याचे बाळकडू दिले. शहाजीराजे बंगळुरूला असताना, पुण्याची जहागीर सांभाळण्याची आणि शिवरायांना तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी जिजाऊंनी समर्थपणे पेलली. पुण्याचा कायापालट केला. शिवाजी महाराज मोहिमेवर असताना स्वराज्याची जबाबदारी जिजाऊच सांभाळत असत. अफझलखान वध असो वा आग्रा सुटका, प्रत्येक कठीण प्रसंगी जिजाऊ महाराजांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. स्त्रीशक्तीचे प्रतीक असलेल्या त्या केवळ एक माता नव्हत्या, तर एक कुशल प्रशासक आणि न्यायनिवाडा करणाऱ्या राजमाता होत्या. शिवराज्याभिषेकाचा सुवर्ण सोहळा पाहिल्यानंतर अवघ्या १२ दिवसांनी, १७ जून १६७४ रोजी रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड येथे त्यांचे निधन झाले.

जिजाऊ माता आजही प्रत्येक भारतीयासाठी स्वाभिमान, संस्कार आणि धैर्याचे प्रतीक आहेत. म्हणूनच त्यांना स्वराज्यजननी म्हटले जाते. राजमाता जिजाऊंचे जीवन केवळ इतिहास नसून तो आजच्या पिढीला घडवण्याचा एक वस्तुपाठ आहे. आजच्या पालकांनीही जिजाऊप्रमाणे मुलांच्या बुद्धीसोबतच त्यांच्या चारित्र्यावर, मूल्यांवर आणि धर्म संस्कारावर भर द्यावा. केवळ करीअर नाही, तर कर्तव्य शिकवणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक घरात जिजाऊ घडली, तरच घराघरात शिवबा घडेल.

**वर्षा आवदे**/नागपूर

### सोशल मीडियाचा वापर आणि डिजिटल गुलामगिरी

आजच्या काळात सोशल मीडिया हा आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. संवाद, माहिती आणि संपर्कासाठी हे माध्यम उपयुक्त असले, तरी त्याचा अतिरेक आपल्याला नकळत एका वेगळ्याच मानसिक गुलामगिरीकडे नेत आहे. मी मागील दहा ते बारा वर्षांपासून सोशल मीडियाचा वापर करत आहे. मी या माध्यमावर फारसा सक्रिय नसलो, तरी त्याचे बदलते स्वरूप आणि मानवी वर्तनावर होणारा परिणाम अनुभवत आलो आहे. नोव्हेंबर महिन्याच्या २९ तारखेला माझा वाढदिवस असतो. दरवर्षी फेसबुक आणि व्हॉट्सॲपवर मित्र, सहकारी आणि नातेवाईकांकडून मोठ्या प्रमाणावर शुभेच्छा मिळत असत. मात्र मागील वर्षी मी माझा फेसबुक अकाऊंट बंद केला. त्यानंतर सोशल मीडियावर कुठल्याही माध्यमातून वाढदिवसाच्या शुभेच्छा मिळाल्या नाहीत. तथापि, काही मोजक्या व्यक्तींनी मला प्रत्यक्ष फोन करून किंवा वैयक्तिक संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या. या अनुभवातून एक महत्त्वाची गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, खऱ्या अर्थाने महत्त्वाच्या नात्यांना सोशल मीडियाची गरज नसते. सोशल मीडियावरील शुभेच्छांची सवय असल्यामुळे काही क्षण मन अस्वस्थ झाले, पण त्याचवेळी हेही उमगले की, सतत अशा प्रतिक्रियांची अपेक्षा ठेवणे हीच एक प्रकारची डिजिटल गुलामगिरी आहे. आज आपण कुठेही फिरायला गेल्यानंतर त्या ठिकाणाचा अनुभव घेण्याआधीच मोबाईल कॅमेऱ्यातून फोटो काढतो, ते सोशल मीडियावर पोस्ट करतो आणि नंतर लाईक्स, कमेंट्स व व्ह्यूजची वाट पाहतो. हा आनंद स्वतःसाठी नसून इतरांसाठी सादर केला जातो. परिणामी, आपण आपले जीवन जगण्याऐवजी प्रेक्षकांसाठी जगू लागतो. फोटो काढणे किंवा सोशल मीडियावर पोस्ट करणे हे चुकीचे नाही. मात्र प्रश्न असा आहे की, आपण हे सर्व करताना खरोखर आनंदी आहोत का, की फक्त इतरांच्या प्रतिक्रियांवर आधारित आपली प्रतिमा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करत आहोत? आज अनेकदा सोशल मीडिया हे आनंदाचे साधन न राहता, मान्यतेचे व्यासपीठ बनले आहे.

काही लोक असेही आहेत, जे आयुष्यातील क्षण सोशल मीडियावर न मांडता प्रत्यक्ष अनुभवतात. त्यांच्यावर कुठलाही प्रेक्षकांचा दबाव नसतो. ते आयुष्य जसे आहे तसे स्वीकारतात आणि जगतात. अशा जीवनशैलीत मानसिक स्वातंत्र्य अधिक असते. कॅमेरा हा आपल्या आठवणी जपण्यासाठी निर्माण झाला होता. मात्र आज तो वर्तमान क्षण बाजूला ठेवून भविष्यातील लाईक्स आणि कमेंट्ससाठी वापरला जात आहे. याचाच विचार करून आपण सोशल मीडियाचा वापर किती, कसा आणि का करतो, याचे आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

**डॉ. स्वप्निल धनराज अंबादे**/नागपूर

### निष्ठा आणि विचारधारेचे द्वंद्व

हल्ली राजकीय क्षेत्रात एक वेगळीच घाई-गर्दी जाणवते. पक्षातील कार्यकर्ते उमेदवारी मिळविण्यासाठी आतूनच रस्सीखेच करताना दिसतात. जणू काही समाजसेवेचे प्रवेशद्वार एकच विधानभवनातील खुर्ची. मग प्रश्न उभा राहतो, समाजसेवा निवडणूक जिंकल्यावरच सुरू होते का? लोकप्रिय असणे आणि निवडणूक जिंकणे यात फरक नाही का? याच प्रश्नांच्या छायेत कार्यकर्ते, पक्षनिष्ठा, तत्त्वनिष्ठा आणि विचारधारा यावर चिंतन करणे आवश्यक ठरते. लोकप्रिय असणे म्हणजे लोकांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाला दिलेली दाद. पण निवडणूक हा भावनांचा सण नसून समीकरणांचा खेळ असतो. जात, धनबल, मतदारसंघाची मांडणी, कार्यकर्त्यांचे जाळे, स्थानिक गटतट, हे सारे घटक मिळून निवडणुकीचा परिणाम ठरवतात. म्हणूनच अनेकदा लोकमान्य व्यक्ती पराभूत होते, तर अपरिचित चेहरा विजयी ठरतो. लोकप्रिय असणे वेगळे आणि निवडणूक जिंकणे वेगळे, हे सत्य स्वीकारणे आवश्यक आहे.

मात्र यातून एक मोठी विसंगती ठळक होते. पक्षनिष्ठा आणि तत्त्वनिष्ठा कुठे तरी हरवत चालली आहे. पूर्वी पक्ष म्हणजे विचारांची शाळा. विचारधारा म्हणजे जीवनपद्धती. पक्षाचे कार्यकर्ते हे त्या तत्त्वांचे वाहक असत. आज मात्र उमेदवारी म्हणजे प्रतिष्ठेचा मुकुट आणि पक्ष म्हणजे सत्तेची शिडी. कार्यकर्त्यांची धावपळ तत्त्वांसाठी नसून तिकिटासाठी अधिक दिसू लागल्याने राजकारणाचा आत्मा कसल्याशा मुखवट्यामागे लपून बसला आहे. समाजसेवा म्हणजे केवळ निधी मंजूर करणे किंवा मोठ्या पदावरून आदेश देणे नव्हे. समाजसेवा म्हणजे लोकांमध्ये मिसळणे, त्यांच्या वेदना समजून घेणे, समस्यांना उपाय शोधणे. हे कार्य पदाविना देखील शक्य आहे. उलट, पद नसलेला कार्यकर्ता अधिक मुक्तपणे काम करू शकतो. त्याला सत्ता, दबाव, प्रतिमा अशा बंधनांचे ओझे नसते. तरीही आज आपल्याला दिसते ते असे की समाजसेवेची ओळख हळूहळू खुर्चीशी जोडली जात आहे. यात कार्यकर्त्यांचीही काहीशी चूक आणि समाजाचीही. आपण कार्यकर्त्याला तेव्हाच मान देतो जेव्हा तो पुढाऱ्यांच्या जवळ दिसतो, जेव्हा त्याच्या हातात एखादे पद असते. मग स्वाभाविकच कार्यकर्ता पदाच्या मागे धावणार. पक्षांनाही लोकप्रियतेपेक्षा निवडणूक जिंकणारा 'योग्य' उमेदवार हवा असतो. अशा चक्रात विचारधारा दुय्यम बनते.

परंतु कोणत्याही पक्षाची खरी ताकद हे त्याचे तत्त्व आणि त्याला जगणारे कार्यकर्ते. जेव्हा कार्यकर्ता पक्षनिष्ठेपेक्षा तत्त्वनिष्ठेला प्राधान्य देतो, तेव्हा राजकारण केवळ सत्तास्पर्धा राहत नाही; ते जनतेच्या आशा-अपेक्षांचे प्रतिनिधित्व बनते. अन्यथा पक्ष फक्त रंग, चिन्ह आणि घोषणांची कंपनी बनून राहते. आजच्या कार्यकर्त्यांनी स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा की मी तिकीट मिळविण्यासाठी पक्षात आहे की विचार जगविण्यासाठी? समाजालाही विचार करायला हवा की आपण खुर्चीवर बसलेल्या माणसालाच समाजसेवक मानणार का, की त्यासाठी त्याच्या कृतींचे मोल करणार? लोकशाही केवळ मतदानाचा उत्सव नाही; ती विचारांचा प्रवास आहे. लोकप्रियता मिळविणे हे साधन असू शकते, पण अंतिम ध्येय समाजभान आणि जबाबदारीची जाणीव असली पाहिजे. पद मिळाले किंवा नाही तरी तत्त्वनिष्ठ राहणारा कार्यकर्ता हा खरा लोकशाहीचा प्रहरी असतो. आणि विचारधारा जिवंत ठेवणारा पक्षच समाजाच्या इतिहासात आपली नोंद सुवर्णाक्षरांनी करू शकतो.

**विवेक गडकर**/९३७०३२४१०५

### यातला एक निवडायचा आहे

आधीपासून असलेले, आज आलेले, काल आलेले, परवा आलेले, मागच्या महिन्यात आलेले, मागील वर्षी आलेले, मागच्या निवडणुकीत आलेले, एकदा जाऊन परत आलेले, परत जाऊन परत आलेले, येऊन जाऊन असलेले, परत परत येऊन जाऊन असलेले, यातला एक निवडायचा आहे.



पक्षाशी निष्ठा असलेले जुने, पक्षाशी निष्ठा असलेले नवे, पक्षात राहून बाहेरख्याली असलेले, साहेबांशी निष्ठा असलेले जुने, साहेबांशी निष्ठा असलेले नवे, हृदयसम्राटाशी इमान असलेले जुने सैनिक, हृदयसम्राटाशी इमान आणलेले नवे सैनिक, गांधी, नेहरूंचे मीठ खाल्लेले, गांधी, नेहरूंचे मीठ खाण्यास आलेले, यातला एक निवडायचा आहे. तुरुंगात गेलेले, जाऊन आलेले, तुरुंगाच्या वाटेवरचे, आरोप झालेले, जामिनावर सुटलेले, जामीन अर्ज केलेले, पॅरोलवर सुटलेले, सुप्रीम कोर्टात सुटलेले, हायकोर्टात गेलेले, खालच्या कोर्टात अडकलेले, यातला एक निवडायचा आहे. फुकट वीज, फुकट पाणी, कर्जमाफी, सबसिडी, फुकट राशन, फुकट बेकारभत्ता, फुकट यात्रा, फुकट रस्ते, बोलाची कढी, बोलाचा भात, यातील जास्तीत जास्त देऊ म्हणणारा यातला एक निवडायचा आहे.

भाईचा माणूस, दादाचा माणूस, बाबाचा माणूस, अण्णाचा माणूस, काकांचा माणूस, अध्यक्षांचा माणूस, उपाध्यक्षांचा माणूस, साहेबांचा माणूस, जातीचा माणूस, धर्माचा माणूस, गावाचा माणूस, गुरूचा शिष्य, गटाचा माणूस यातला एक निवडायचा आहे.

पक्षाचा अधिकृत, पक्षाचा अनधिकृत, पक्षात आयात केलेला, पक्षाने निर्यात केलेला, फिक्स झालेला, पाठिंबा दिलेला, छुपा पाठिंबा मिळालेला, आतून पाठिंबा दिलेला, बाहेरून पाठिंबा मिळालेला, आतून विरोध असलेला, बाहेरून विरोध असलेला, आपल्यातला त्यांचा, त्यांच्यातला आपला यातला एक निवडायचा आहे.

शंभर कोटी जमवलेला, हजार कोटी बाळगून असलेला, गावोगावी जमिनी करणारा, बायकोला श्रीमंत करणारा, सासूच्या नावावर फ्लॅट घेणारा, मेव्हणीला जमीन घेऊन देणारा, मेव्हण्याला पीए करणारा, भाजीवाल्याला फ्लॅट घेऊन देणारा, ड्रायवरला कंपनी काढून देणारा यातला एक निवडायचा आहे.

सहकारमहर्षी, शिक्षणसम्राट, मद्यसम्राट, वाळूसम्राट, जमीनसम्राट, कोळसासम्राट, खाणसम्राट, हृदयसम्राट यातला एक निवडायचा आहे. कॉमनवेल्थमध्ये गेम केलेला कोळशात काळा झालेला, जल संधारणात घोटाळा केलेला, महाराष्ट्र सदनात भ्रष्टाचार केलेला, टोळधाडीत सामील असलेला, बँकेत घोटाळे केलेला, मनरेगात घोटाळा केलेला, टीडीआरचा घोटाळा केलेला, देवाच्या नावाने घोटाळा केलेला, गांधीच्या नावाने घोटाळा केलेला, ट्रस्टच्या नावाने घोटाळा केलेला यातला एक निवडायचा आहे. खळखट्याक करणारा, भाषेवरून मारणारा, राडेबाजी करणारा, बस पेटवणारा, ट्रेन जाळणारा, कारच्या काचा फोडणारा, लोकांना भडकवणारा, भाईचा पाठीराखा, झोपडपट्टीचा दादा, अतिक्रमण करणारा, सात-बारा नावावर करणारा, अनधिकृत बांधकाम करणारा यातला एक निवडायचा आहे.

यादी फार मोठी आहे. मी फक्त सुरुवात केली. वाढव यादी तुझी तू. पण मतदार गड्या तुला वेळ तरी कुठे आहे! चल उठ कोणातरी एकावर ठप्पा मार, मग महागाईचा विचार कर, मग भ्रष्टाचारावर बोल, मग शिक्षणाच्या घसरणाऱ्या दर्जावर बोलत राहा, मग बेकारीवर बोल, मग बलात्कारावर चर्चा कर, मग वाढणाऱ्या विकास खर्चावर बोल, मग ढासळणाऱ्या मूल्यांवर बोल, बोलत बस, बोलत बस आणि कोकलत बस. पुढची पाच वर्षे तुझीच आहेत, उगाच घाई करू नको, पहिले त्यांना निवडून दे. ती लोकशाहीची गरज आहे. तुला तुझ्यावर शासन लागते, तुला तुझ्यावर सरकार लागते, तुला तुझ्यावर लोकसभा लागते, तुला तुझ्यावर विधानसभा लागते. त्यांच्याशिवाय तुझे जीवन अधुरे आहे. त्यांना पहिले निवडून दे. तेवढाच तुझा हक्क आहे.

**रवी वाघमारे**/नागपूर

### नवीन वर्षातील सकारात्मक बदल

इंग्रजी वर्ष २०२६ या वर्षाच्या सुरुवातीलाच अनेक सकारात्मक बदलांची नोंद होते आहे. जनतेच्या सुविधेसाठी यावर्षी नवीन अत्याधुनिक जलदगती महामार्ग जोडले जाणार आहेत. पूर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण या दिशांना जोडणाऱ्या एक्सप्रेसवे नेटवर्कमुळे औद्योगिक केंद्रे, बंदरे, धार्मिक स्थळे आणि पर्यटन हब यांच्यातील अंतर मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे अशी माहिती मिळाली आहे. रेल्वेच्या वेळापत्रकात देखील मोठे बदल होणार आहेत. यानुसार सुमारे ६२ एक्सप्रेसचा वेग वाढणार आहे. यात पुणे मुंबईतील अनेक गाड्यांचा समावेश आहे. हे सुधारित वेळापत्रक प्रवाशांची एकाच वेळी होणारी गर्दी कमी करण्यासाठी आणि अधिक सुविधेसाठी सुरू करण्यात येणार असल्याचे सांगितले जाते.

या वर्षी उल्लेखनीय बाब म्हणजे नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी पर्यटनाला किंवा हॉटेल्स, पब, डिस्को, क्लब येथे जल्लोष करण्याला प्राधान्य देणारी तरुणाई या वर्षी धार्मिक तीर्थस्थळांकडे मोठ्या प्रमाणात वळली आहे असे चित्र दिसले. हे परिवर्तन धार्मिक स्थळांचा विकास आणि धर्मजागृती यामुळे बघावयास मिळाले. अयोध्या, मथुरा, काशी विश्वनाथ, उज्जैन या देशातील विविध स्थळांवर ३०, ३१ आणि १ तारीख या दिवसांत विविध वयोगटांतील नागरिकांची तुफान गर्दी होती. नागपूर तसेच आसपासच्या प्रमुख मंदिरांमध्ये भक्तांची दर्शनासाठी भली मोठी रांग लागल्याचे चित्र दिसून आले. अनेक ठिकाणी दर्शनार्थींच्या संख्येचे विक्रम मोडले गेले आहेत. ही धर्मजागृती समाधानकारक आहे.

परंतु या सगळ्या बरोबरच असमानता, दहशतवाद, हिंसा कमी व्हावी आणि भारत अधिक विकसनशील आणि प्रगत व्हावा यासाठी आपण हातभार लावूया.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### देश महत्त्वाचा की खेळ?

सध्या बांगलादेशात हिंदूंवर होत असलेला अमानुष अत्याचार, मंदिरांची तोडफोड, हत्या आणि जीव मुठीत धरून जगण्याची वेळ आलेल्या हिंदूंची अवस्था पाहता प्रत्येक संवेदनशील भारतीयाच्या मनात तीव्र संताप आणि वेदना निर्माण झाल्या आहेत. या पृष्ठभूमीवर भारताने बांगलादेशविरोधात कठोर पावले उचलावीत, अशी मागणी देशभरातून होत आहे आणि त्याची प्रकर्षाने आवश्यकता देखील आहे. अशा अत्यंत गंभीर परिस्थितीत आयपीएलच्या लिलावात अभिनेता शाहरुख खान मालकीच्या कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) संघाने बांगलादेशी गोलंदाज मुस्तफिजूर रहमान याला तब्बल ९.२ कोटी रुपयांची बोली लावून संघात सामील करून घेणे, हे कितपत योग्य आहे? बांगलादेशातील हिंसाचार, तिथे वाढलेल्या भारतविरोधी कारवाया, सीमेवरील तणाव या सर्व परिस्थितीत भारताचे शत्रू राष्ट्रांपासून रक्षण करणे असे गंभीर मुद्दे समोर असताना; शत्रुराष्ट्राला साथ देणाऱ्या देशाच्या खेळाडूंवर पैशांची उधळण करणे, याला काय म्हणावे? ही एक प्रकारे देशविरोधी कृती आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. खेळाला सीमारेषा नसतात, हे अगदी योग्य आहे. मात्र जेव्हा राष्ट्राच्या सुरक्षेचा आणि अखंडतेचा प्रश्न असतो तेव्हा देशापेक्षा खेळ महत्त्वाचा की खेळापेक्षा देश महत्त्वाचा याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

बांगलादेशातील काही कट्टरपंथी संघटना आणि पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा आयएसआय यांच्या संगनमताने भारताविरोधात षड्यंत्र रचले जात असल्याच्या बातम्या वारंवार समोर येत आहेत. भारताच्या ईशान्येकडील राज्यांना मुख्य भूमीशी जोडणारा 'सिलिगुडी कॉरिडॉर' (चिकन नेक) हा भाग शत्रराष्ट्रांच्या निशाण्यावर आहे. अशा परिस्थितीत ज्या देशातील सरकार आणि संघटना भारताच्या विरोधात कारस्थान करत आहेत, त्याच देशाच्या खेळाडूला कोट्यवधी रुपये देणे, नैतिकदृष्ट्या अयोग्य तर आहेच आणि देशहिताला धक्का देणारे आहे. त्यामुळे देश महत्त्वाचा की खेळ? याचा गांभीर्याने विचार करण्यासोबतच या निर्णयाचा विरोध करणे आवश्यक आहे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सावित्रीबाईचे जीवन म्हणजे कर्तव्याचा अखंड प्रवास : डॉ. सोनवणे

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

ज्या काळात स्त्रीला शिक्षणाचा अधिकार नाकारला जात होता, स्वातंत्र्याचा विचारही पाप मानला जात होता आणि समाजरचनेत तिला दुय्यम स्थान दिले जात होते, त्या अंधकारमय काळात ज्ञानाचा दिवा हातात घेऊन समाजाला दिशा देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य आजही दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरते. कर्तव्य आणि करुणा यांचा संगम म्हणजे सावित्रीबाई होत. त्यांचे जीवन म्हणजे मूल्य, विवेक आणि कर्तव्याचा अखंड प्रवास आहे असे प्रतिपादन वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथील प्राध्यापिका डॉ. अंजना सोनवणे यांनी केले. सात रस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्या प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे होते. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. इंदुमती गंगन्नवर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या ढेपे यांनी केले. तर प्रा. अरुणा कोडम यांनी आभार मानले.



### पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाच्या अध्यक्षपदी डॉ. सूर्यप्रकाश कोठे

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

हैदराबाद येथील पद्मशाली पद्मशाली भवनात शनिवारी दि. ३ जानेवारी रोजी अखिल भारतीय पद्मशाली संघाचे सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष पद निवडीचे पत्र डॉक्टर सूर्यप्रकाश कोठे यांना प्रदान करण्यात आले. यावेळी ऑल इंडियाचे सर्व पदाधिकारी ऑल इंडिया गौरव अध्यक्ष श्रीधरजी सुंकुरवार अध्यक्ष कंदिकतला स्वामी, जनरल सेक्रेटरी जगन्नाथ गड्डम, उपाध्यक्ष रामकृष्ण कोंड्याल, सेक्रेटरी प्रदीप संगा, राजकीय विभागाचे अध्यक्ष बोलला शिवशंकर, सेक्रेटरी तुकेश भैरी, महाराष्ट्रचे निरीक्षक संघा मुंबई पद्मशाली संघाचे अध्यक्ष गंजी, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे जनरल सेक्रेटरी दयानंद मामड्याल, पद्मशाली न्याती संस्थेचे सेक्रेटरी संतोष सोमा, युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कटक, राकेश पुंजाल, सूर्यकांत जिंदम उपस्थित होते.



### मोडनिंब ग्रामपंचायततर्फे सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात

**मोडनिंब, दि.३ जानेवारी-**

क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतिबा फुले यांची १९५ वी जयंती मोडनिंब (ता. माढा) ग्रामपंचायत कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यावर प्रकाश टाकत त्यांचे विचार अंगीकारण्याचा संकल्प ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ माळी यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास राहुल पाटील, उपसरपंच अमित कोळी, ग्रामपंचायत सदस्य कैलास तोडकरी, बालाजी पाटील,चांगदेव वरवडे, दत्तात्रय सुर्वे, सदाशिव पाटोळे, सोमनाथ माळी, अतुल गाडे, संतोष पाटील, किरण तोडकरी, डॉ. प्रशांत कोल्हे, बाबुराव सुर्वे, राहुल केदार,, तात्या मोहिते, चंद्रकांत ओहोळ, बालाजी गायकवाड, प्रकाश माळी, दामोदर माळी, बाबू माळी, माऊली जमदाडे तसेच भाजप महिला शहराध्यक्ष मनिषा गिड्डे, महिला तालुका उपाध्यक्ष रोहिणी मोहिते, खजुरकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाजारात काळी तूर टॉपवर; आवक कमी पण मागणीत वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जानेवारी-**

येथील बाजारपेठेत अनेक दिवसांपासून टॉपवर असलेल्या पांढऱ्या तुरीच्या दरात घसरण झाली असून काळी तूर आता टॉपवर गेली आहे.

शेतमालाच्या भावात नेहमीच चढउतार होतात. कधी आवक वाढते तर कधी आवक घटते. पीकपध्दतीसह खाद्य संस्कृतीत झालेल्या बदलाचा परिणामही बाजारपेठेवर होतो. त्यामुळे अव्वलस्थानी असलेली एखादी वस्तू अथवा शेतमाल खाली घसरतो. तर अचानक एखाद्या मालाचा अपेक्षेपेक्षा दर वाढतो. काळ्या तुरीची आवक कमी असली तरीही खाद्या संस्कृतीतील बदलही बहुतांशी याला कारणीभूत आहे. काळ्या तूरीपासून आता डाळी बरोबरच उसळ बनवली जात असून केरळ, गुजरात, राजस्थान भागातून या



तुरीला मागणी अधिक आहे. यापूर्वी एका शेतात वर्षभरात एकच पीक घेण्याची पध्दत वापरली जात होती. पूर्वी कोरडवाहू शेतकऱ्यांकडून तूर किंवा ज्वारी, सूर्यफूल अशा पिकांचा यात प्रामुख्याने समावेश करत असत. अलिकडच्या काळात शेतकरी वाढते खर्च भागविण्यासाठी वार्षिक एक पीक पद्धतीकडून बहुपीकपध्दतीकडे वळला आहे. शेतकरी आता कमी कालावधीची दोन किंवा तीन पिके घेवू लागले आहेत. खरिपात सोयाबीन करून नंतर हरभरा, राजमा अशी कमी कालावधीची पिके घेवून जास्तीत जास्त उत्पादन घेत आहेत. त्यामुळे तुरीच्या पेऱ्यात लक्षणीयरीत्या घट झाली. पूर्वी पांढऱ्या व त्याखालोखाल तांबड्या व काळ्या तुरीचे उत्पादन होत असे. पांढऱ्या व तांबड्या तुरीची डाळ चवदार असल्याने व्यापारी डाळ करण्यासाठी याच तुरीच्या खरेदीला पसंती देत असत. मार्केटमधील काळी तूर डाळीसाठी नागपूर आदी भागात जात असे. साहजिकच पांढऱ्या व तांबड्या तुरीला काळ्या तूरीपेक्षा दरही जास्त असायचा. मागच्या वर्षीपासून यात फरक पडू लागला आहे. सध्या बाजार समितीत काळ्या तुरीचा दर सर्वाधिक आहे. डाळी बरोबरच उसळ बनविण्यासाठी वापरली जावू लागली आहे. आवक कमी हे एक कारण असले तरी खाद्य संस्कृतीतील बदल हे सुध्दा मागणी व दरवाढी मागचे आणखी कारण आहे. सध्या काळ्या तुरीला पांढऱ्या व तांबड्या तुरी पेक्षा अधिक दर आहे.

# बाजार समितीत ७६२ ट्रक कांद्याची आवक

## ७ कोटी ६२ लाखांची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शनीवारी यंदाच्या हंगामात पहिल्यांदाच विक्रमी ७६२ ट्रक कांद्याची आवक झाली आहे. मात्र बाजार भाव स्थिरच राहिला आहे. चांगल्या प्रतिच्या कांद्याला प्रति क्विंटल २ हजार ५०० तर सर्वसाधारण कांद्याला प्रति क्विंटल १०० रुपयांचा भाव मिळाला आहे. आवक वाढली - असली तरी भाव वाढत नसल्याने शेतकऱ्यांनी -चिंता व्यक्त केली आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या महिनाभरापासून कांद्याची आवक सातत्याने वाढत चालली आहे. यंदाच्या हंगामात शनीवारी बाजार समितीत तब्बल ७६२ ट्रक कांद्याची आवक झाली आहे. पहिल्यांदाच ७०० हून अधिक ट्रक कांदा आवक झाला आहे. यामध्ये १,५२,४३४ पिशवी कांद्याची विक्री झाली आहे. त्यामधून तब्बल ७ कोटी ६२ लाख १७ हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाली आहे. यंदाच्या हंगामातील कांदा आता बाजारात येत असला तरी कांद्याचा भाव स्थिरच असल्याने शेतकऱ्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

शेतकऱ्यांच्या कांद्याला प्रति क्विंटल किमान पाच ते सहा हजार रुपयांचा भाव मिळावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे. कांद्याचा उत्पादन खर्च पाहता सध्या मिळत असलेला भाव शेतकऱ्यांना परवडत नसल्याने शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.



# वालचंद रंगधारा कला महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात वालचंद रंगधारा कला महोत्सव उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य श्री. अनुप म्हेत्रे, डॉ. जीवराज कस्तुरे तसेच ज्येष्ठ शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर इयत्ता अकरावी कला विभागातील विद्यार्थ्यांनी णमोकार महामंत्रावर सादर केलेल्या नृत्याने कार्यक्रमाला आध्यात्मिक व कलात्मक सुरुवात झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी भरतनाट्यम, कथक, लावणी, बॉलीवूड व मराठी रिमिक्स डान्स, सोलो व ग्रुप डान्स, देशभक्तीपर गीत, क्लासिकल साँग, तेलुगू गीतावर नृत्य, रॅप साँग अशा विविध कला सादर करत रसिकांची मने जिंकली.

अमृता गुंफेकर हिचे योगा विथ डान्स हे अभिनव सादरीकरण. नृत्याच्या तालावर योगासने सादर करत तिने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच सिद्धार्थ यमनोलू (इयत्ता अकरावी, कला शाखा) याने स्वतः लिहिलेल्या व सादर केलेल्या 'आता काय म्हणताय मित्रा' या रॅप साँगने प्रेक्षकांची दाद मिळवली. राजनंदिनी जमखंडी हिने 'पावनखिंड शिवबा राजे' या गायनातून इतिहासाचा जिवंत अनुभव दिला, तर महाभारताच्या टायटल साँगवरील डान्स सादरीकरणाने कार्यक्रमाला भव्यतेची उंची दिली.

सूत्रसंचालन प्रशांत पाटील व कविता उदगीरी यांनी केले तर संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन विजया तडकल यांनी केले.

# घोळसगाव येथे विविध कार्यक्रमांनी बालिका दिन उत्साहात



**अक्कलकोट दि. ३ जानेवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा घोळसगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती निमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले.

मुख्याध्यापक मनोज माने अध्यक्षपदी होते. इयत्ता सहावी व सातवीच्या मुलींनी सावित्रीबाई फुले यांचा वेश परिधान करून प्रतिमेचे पूजन केले. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांच्या रांगोळी, चित्रकला, निबंध लेखन, लिंबू-चमचा, संगीत खुर्ची इ. स्पर्धा घेण्यात आल्या. रा. रो. दरेकर यांनी फलकलेखन केले. अमोल गुंजोटे, मु. कि. वागदकर व श्रीमती घोडके यांनी सहकार्य केले.



# भयमुक्त वातावरणात मतदान होण्यासाठी 'मविआ'चे निवेदन

## खा. प्रणिती शिंदे यांनी खुनी हल्ल्यातील बाळासाहेब सरवदेंच्या कुटुंबीयांचे केले सांत्वन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

महापालिका निवडणूक भयमुक्त वातावरणात मतदान व्हावे, अशी मागणी महावीकास आघाडीच्या वतीने पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. तसेच खासदार प्रणिती शिंदे आणि महाविकास आघाडीच्या नेतेमंडळींनी खुनी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या बाळासाहेब सरवदे यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले.

महानगरपालिका सार्वजनिक निवडणूक प्रक्रिया सध्या सुरू असून सर्व राजकीय पक्ष निवडणुकीत सहभागी झाले आहेत. शुक्रवारी घडलेल्या खूनी हत्येच्या घटनेतून भाजप कार्यकर्त्यांची गुंड प्रवृत्ती उघड झाली असून, निवडणूक काळात प्रत्येक प्रभागात दमदाटी करणे, उमेदवारांवर उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव आणणे, मारहाण करणे तसेच विविध प्रकारे दहशत निर्माण करणे हे प्रकार सर्रास सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सोलापूर शहरात विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांना भयमुक्त वातावरणात फिरणे व प्रचार करणे अवघड झाले आहे.

भाजपा कार्यकर्त्यांकडून मनसेच्या पदाधिकाऱ्याची झालेल्या हत्येप्रकरणी खुनाचा सूत्रधार व मारेकरी यांच्यातील मोबाईल संवादाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, माजी आमदार नरसय्या आडम मास्तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष महेश गादेकर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष अजय दासरी, शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड, अशोक निंबर्गी, भारत जाधव, युसुफ मेजर, प्रताप चव्हाण, तिरूपती परकीपंडला, ॲड. केशव इंगळे आदी उपस्थित होते.

# प्रा. देवराव मुंडे यांना पीएचडी प्रदान

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील प्रा. देवराव मुंडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे पीएचडी प्रदान करण्यात आली. त्यांनी 'प्रवासी भारतीय कवी सुरेशचंद्र शुक्ला के काव्यचिंतन के विविध आयाम विषयावर संशोधन केले आहे. नॉर्वे येथील प्रवासी साहित्यिक असलेल्या सुरेश शुक्ला यांच्या दहा कवितासंग्रहाचा चिकित्सक अभ्यास करून प्रवासी हिंदी साहित्य समीक्षात्मक संशोधनात मोलाचे योगदान दिले आहे. नळदुर्ग येथील महाविद्यालयतील प्रा.डॉ. हशमबेग यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. चेअरमन संजीव पाटील, डॉ. सुहासिनी शहा, सीमा किणीकर, स्नेहा सावे, प्राचार्य डॉ.ढेरे, प्राचार्य डॉ.राजेंद्रसिंह लोखंडे आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name MAHEEN ABDUL SATTAR KURESHI Has been changed to New Name MAHEEN SATTAR KURESHI Kindly note the same.
126 Valsang, Tal. South Solapur, Dist. Solapur

**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
पत्ता-इंद्रभुवन, पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ,
रेल्वेलाईन्स,सोलापूर ४१३००१ E-mail ID: cityengg.smcgmail.com
नगर अभियंता कार्यालय, शहर सुधारणा विभाग

**जाहीर प्रकटन**

विषय : मा. मुंबई उच्च न्यायालय सामान्य मूळ दिवाणी अधिकारक्षेत्र लोकहित याचिका क्र. ७१/२०१३ ची सुनावणी, दि. १३-१०-२०२५.

वरील विषयास अनुसरुन मा. मुंबई उच्च न्यायालय सामान्य मूळ दिवाणी अधिकारक्षेत्र लोकहित याचिका क्र. ७१/२०१३ ची सुनावणी आदेशातील मुद्दा क्र. ७०,७१ प्रमाणे मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशानुसार महानगरपालिका हद्दीतील रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत करावयाच्या प्रभावी निराकरण, जबाबदारी आणि वेळेवर अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार शहरातील रस्त्यावरील खड्यांमुळे मृत्यु आणि दुखापतीसाठी भरपाई निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व हुद्दा | पदनाम |
|---|---|---|
| १ | आयुक्त, सो.म.पा. सोलापूर. | अध्यक्ष |
| २ | सदस्य, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर. | सदस्य |
| ३ | अतिरिक्त आयुक्त (बांधकाम व पा.पु.) सो.म.पा.सोलापूर. | सदस्य |
| ४ | मुख्य लेखापाल, सो.म.पा. सोलापूर. | सदस्य |
| ५ | सार्वजनिक आरोग्य अभियंता, सो.म.पा. सोलापूर. | सदस्य |
| ६ | नगर अभियंता, सो.म.पा. सोलापूर. | सदस्य सचिव |

(संदीप कारंजे)
अतिरिक्त आयुक्त २
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**जाहिर नोटीस**

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर यांचेकडून सर्व संबंधितांना जाहिर नोटीसेव्दारे कळविण्यात येते की सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर यांचे कार्यक्षेत्रातील खाली नमूद केलेल्या सहकारी संस्था मा कार्यालयाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार अवसायनात घेतलेल्या आहेत. सर्व संबंधीतांना या नोटीसीव्दारे सुचित करण्यात येते की, खालील सहकारी संस्थांबाबत कोणाचे दावे आक्षेप/हरकती असतील तर या कार्यालयाकडे नोंदवाव्यात, लेखी आक्षेप नोंदविण्याची अंतिम मुदत दिनांक ०३/०२/२०२६ पर्यंत राहिल त्यानंतर दाखल झालेले दावे/आक्षेप यांचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी, तरी खालील अवसायनातील सहकारी संस्थेच्या सभासदांनी खाली नमूद केलेल्या ठिकाणी, दिवशी, वेळी होणाऱ्या शेवटच्या सर्वसाधारण सभेस उपस्थीत राहावे.

**सभेची विषय सूची पुढीलप्रमाणे: १.** अवसायकाचे कामकाज आढावा व जमा खर्चास मंजूरी देणे. २. संस्थेचे येणे-देणे बाबात हरकतींचा विचार करुन येणे-देणे अंतिम करणे ३. संस्थांची नोंदणी रद्द करणेबाबत निर्णय घेणे ४. इतर आयत्या वेळीचे विषय

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अवसायकाचे नांव | अ.क्र. | संस्थेचे नांव | अवसायकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | सिध्देश्वर बहुउददेशीय सहकारी संस्था मर्या. पेनूर | श्री. एन.व्ही. पवार | ४ | म.फुले औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था मर्या, मोहोळ | श्री. एम.एम. शिंदे |
| २ | प्रिसीजन एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसा. चिंचोलीकाटी | श्री एन.व्ही.पवार | ५ | स.म.शंकरराव मोहिते पाटील ग्राबिशे सहकारी संस्था मर्या. टाकळी सिकंदर | श्रीमती. पी. बी. शिंदे |
| ३ | शिवपार्वती बिगरशेती सहकारी संस्था मर्या., नरखेड | श्रीमती. डी. यु. शेट्टीगार | ६ | मोहोळ तालुका शिक्षक प्रसारक मंडळ सहकारी संस्था मर्या., मोहोळ | श्री.एम.एम. शिंदे |

संस्थेच्या शेवटच्या सर्वसाधारण सभेची तारीख दिनांक ०३/०२/२०२६ वेळ दुपारी १:०० वाजता ठिकाण सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर

दिनांक : ०२/०१/२०२६

(एस.टी. तेलंगरे)
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
मोहोळ ता. मोहोळ जि.सोलापूर

# ग्रामीण शिक्षणाचा चेहरामोहरा बदलणारे ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुल : डॉ. भोसले

## वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी काढले गौरवोद्गार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

बोरामणी येथील ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुल ही नावाप्रमाणेच ग्रामीण भागात जागतिक दर्जाचे शिक्षण देत असून, नई तालीम संकल्पना, सीबीएसई शिक्षणपद्धती आणि अटल टिंकरिंग लॅब यांचा प्रभावी संगम साधत प्रेरणादायी कार्य करीत आहे, असे गौरवोद्गार पुण्याच्या नामवंत एस.एन.बी.पी. ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या अध्यक्षा माननीय डॉ. वृषाली भोसले यांनी व्यक्त केले.

हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, इंग्रजी अभिव्यक्ती व सादरीकरण पाहून ही संस्था ग्रामीण भारताचा शैक्षणिक नकाशा बदलणारी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. प्रारंभी कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी यांच्या स्मृतिदिनानिमित्त यांच्या प्रतिमेला अभिवादन केल्यानंतर पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. संस्थेच्या सचिवा संगीता शहा यांनी डॉ. वृषाली भोसले यांना त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल मानपत्र प्रदान करून त्यांचा सन्मान केले. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त सुजाता बादोले, सरोजनी करूटी, राजश्री चनशेट्टी, वैशाली धुत्तरगी, प्रा.अनिकेत चनशेट्टी, शुभम बादोले, नचिकेत चनशेट्टी यांच्यासह पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष पंडित मामा आचलेरे, सदस्य कमलाकर भोसले, अरुण शिंदे, दयानंद झुरळे, मुस्ती केंद्राचे केंद्रप्रमुख रेवणसिद्ध होनमाने व बोरामणी केंद्रप्रमुख शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक मल्लिनाथ जळकोटे यांनी तर प्राचार्या आस्मा नदाफ व सौन्दर्या पुट्टा यांनी अहवाल वाचन केले. प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापूरच्या संध्याराणी बंडगरला दोन सुवर्ण पदके

## अखिल भारतीय नागरी सेवा लॉन टेनिस क्रीडा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ जानेवारी -**

केंद्र शासनाच्या विद्यमाने व गुजरात शासनाच्या वतीने गांधीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा लॉन टेनिस स्पर्धेत महाराष्ट्राकडून खेळताना येथील संध्याराणी बंडगर यांनी एकेरीत तसेच दुहेरीतही सुवर्ण पदक पटकावले.

एकेरीच्या अंतिम सामन्यात गतविजेती गुजरातच्या हिरल पटेल यांच्या ९-६ ने पराभव करून एतिहासिक विजय मिळिवला. तसेच दुहेरीच्या अंतिम सामन्यात गुजरातच्या हिरल पटेलच्या साथीने हरियाणाच्या मधु मान व डॉ. मीता अरोरा यांचा ९-५ फरकाने पराभव करून विजेतेपद पटकाविले. बंडगर यांची निवड मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेतून झाली होती. अखिल भारतीय नागरी सेवेच्या लॉन टेनिस स्पर्धेत प्रथमच महाराष्ट्र राज्याला दोन सुवर्ण पदके मिळाली आहेत. सुधीर सालगुडे हे संध्याराणी यांचे प्रशिक्षक आहेत. संध्याराणी या सोलापूर येथे सामाजिक वनीकरण विभाग कार्यालयात मुख्य लेखापाल या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी व महाराष्ट्र राज्य लॉन टेंनिस संघटनेचे संयुक्त सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले.



# विजय हजारे ट्रॉफीत हार्दिकचे पांड्याचे शतक



**नवी दिल्ली :** विजय हजारे ट्रॉफीमध्ये राजकोटमध्ये बडोद्यासाठी हार्दिक पंड्याने शतक झळकावत विदर्भसमोर २९४ धावांचे लक्ष्य ठेवले, प्रत्युत्तरात विदर्भाने एक गडी गमावून ४१.४ षटकांत विजय मिळवला. तर अहमदाबादमध्ये कर्नाटकच्या देवदत्त पडिक्कलचा शानदार फॉर्म कायम राहिला आणि त्याने पाच सामन्यांमध्ये आपले चौथे शतक झळकावले.

हार्दिकने ६८ चेंडूत १०० धावा केल्या. त्याने शेवटच्या षटकात ५ षटकार आणि एक चौकार मारत एका ओव्हर मध्ये ३५ धावा काढल्या.

दुसरीकडे, दिल्लीने कर्णधार ऋषभ पंत अर्धशतकांच्या मदतीने सर्व्हिसेसचा ८ गडी राखून पराभव करत स्पर्धेत आपला चौथा विजय नोंदवला.



# चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

### भाग - ३७

## रनिंग आणि कार्बन डायऑक्साइड

धावताना किंवा कोणतीही शारीरिक क्रिया करताना आपल्या शरीरात कार्बन डायऑक्साइड ($CO_2$) सतत तयार होत असतो. हा वायू आपल्या स्नायूंपासून रक्ताद्वारे फुफ्फुसांपर्यंत पोहोचतो. सामान्य हवेत $CO_2$ खूप कमी असतो (०.०४%), पण आपल्या फुफ्फुसांमध्ये तो साधारण ४ ते ५% पर्यंत असतो, आणि हे शरीरासाठी सामान्य आणि आरामदायी असते. मात्र, धावताना किंवा जोरदार व्यायाम करताना स्नायू अधिक $CO_2$ तयार करतात. त्यामुळे रक्त $CO_2$ फुफ्फुसांकडे जास्त वेगाने आणते, आणि शरीराला हा वायू बाहेर टाकण्यासाठी जास्त श्वासोच्छ्वास करायला भाग पाडते.

इथे महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्वास लागण्याचे कारण ऑक्सिजन ($O_2$) कमी होणे नाही, तर $CO_2$ वाढणे आहे. मेंदूतील श्वास नियंत्रण केंद्र $CO_2$ वाढताच सक्रिय होते आणि शरीराला जलद श्वास घेण्याचा आदेश देते. त्यामुळे धावपटूंना जोरात श्वास लागतो, छाती धडधडते आणि आपोआप श्वासाची गती वाढते. हा एक नैसर्गिक आणि संरक्षणात्मक प्रतिसाद आहे जेणेकरून $O_2$ कमी होण्यापूर्वीच शरीर स्वतःला स्थिर ठेवू शकेल.

श्वास रोखून धरल्यास देखील हेच लागू होते. पाण्यात किंवा ठिकाणी श्वास आवरून ठेवताना आपल्याला अचानक श्वास घ्यावासा वाटतो ते $O_2$ कमी झाल्यामुळे नाही, तर $CO_2$ जास्त झाल्यामुळे. जर $O_2$ खरोखरच धोकादायक पातळीपर्यंत कमी झाला, तर व्यक्ती बेशुद्ध पडू शकते. त्यामुळे $CO_2$ वाढल्याने मिळणारा श्वास घेण्याचा सिग्नल आपल्याला वेळेत वाचवतो. धावपटूंकरिता निष्कर्ष असा: जास्त वेगाने धावलात तर $CO_2$ वाढतो, त्यामुळे श्वासोच्छ्वास वाढतो. त्यामुळे श्वासाची लय सांभाळणे, पेस नियंत्रित करणे आणि योग्य श्वास तंत्र (Breathing Technique) वापरणे परफॉर्मन्स टिकवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

### भारत-न्यूझीलंड वनडे सामना

# ५ मिनिटांत विकले गेले सर्व तिकीट

इंदूर : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील एकदिवसीय मालिकेतील पहिल्या सामन्याबद्दल प्रचंड उत्साह दिसून आला. इंदूरच्या होळकर स्टेडियमवर १८ जानेवारी रोजी होणाऱ्या या सामन्याची तिकिटे अवघ्या ५ मिनिटांत विकली गेली. शनिवारी सकाळी लोक झोपेतून जागे होण्यापूर्वीच तिकिटे विकली गेली होती. शनिवारी सकाळी बरोबर ५ वाजता तिकिटांची ऑनलाइन विक्री सुरू झाली होती. झोमॅटोच्या डिस्ट्रिक्ट या तिकीट बुकिंग प्लॅटफफॉर्मवर विंडो उघडताच चाहते तिकिटे खरेदी करण्यासाठी तुटून पडले. परिस्थिती अशी होती की सकाळी ५:१५ वाजण्यापूर्वीच सर्व तिकिटे बुक झाली आणि वेबसाइट व ॲपवर (विकले गेले) असा संदेश दिसू लागला.

यावेळी मध्यप्रदेश क्रिकेट असोसिएशन (चझङअ) ने आधीच स्पष्ट केले होते की सामन्यासाठी एकही तिकीट ऑफलाइन मिळणार नाही. तिकिटांची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल ठेवण्यात आली होती. बीसीसीआयने चाहत्यांसाठी एक सल्लागार सूचना देखील जारी केली होती, ज्यात हाय-स्पीड इंटरनेट ठेवण्याचा आणि वेळेपूर्वी लॉगिन करण्याचा सल्ला दिला होता, जेणेकरून तिकीट विंडो उघडताच बुकिंग करता येईल. असे असूनही, प्रचंड ट्रॅफिक आणि जबरदस्त मागणीमुळे हजारो चाहते तिकिटांपासून वंचित राहिले.

# महाराष्ट्राच्या दोन्ही संघांची उपांत्यपूर्व फेरीत धडक

## ४४ वी कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बेंगळुरू, दि. ३ जानेवारी-**

गंजूरच्या मैदानावर मराठी खेळाडूंनी जणू वीज कोसळवली! भारतीय खो-खो महासंघाच्या मान्यतेने कर्नाटक खो-खो असोसिएशनतर्फे आयोजित ४४ व्या कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी आक्रमक, चपळ आणि आत्मविश्वासपूर्ण खेळाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना धूळ चारत उपांत्यपूर्व फेरीत दणदणीत प्रवेश केला. चित्त्याच्या चपळाईसह खेळलेले हे सामने पाहून संपूर्ण देशाचे लक्ष आता मराठी वाघांकडे खिळले आहे.



### कुमार गटात ओडिशावर मात

कुमार गटात महाराष्ट्राने ओडिशावर ३४-२४ असा दहा गुणांनी विजय मिळवला. मध्यांतराला २४-१० अशी भक्कम आघाडी घेत महाराष्ट्राने सामना पूर्णपणे आपल्या बाजूने वळवला. महाराष्ट्राच्या जितेंद्र वसावे (२.२० व नाबाद १.१० मि. संरक्षण), सोत्या वळवी (२.१०, १.४० मि. संरक्षण, ४ गुण), हारदया वसावे (२.००, १.५० मि. संरक्षण, ४ गुण) व राज जाधव (१.५० मि. संरक्षण, २ गुण) यांनी विजयात निर्णायक भूमिका बजावली. ओडिशाकडून समीरने (८ गुण) व कुना बी. (१.२० मि., ४ गुण) यांची झुंज अपुरी ठरली.

### रणरागिणींचा हरियाणावर प्रचंड विजय

महाराष्ट्राच्या मुलींनी हरियाणाचा ४७-१० असा पराभव करत एक डाव व तब्बल ३७ गुणांनी सामना जिंकला. महाराष्ट्राच्या श्रावणी तामखाडे (नाबाद ३.१० मि. संरक्षण), सानिका चाफे (३.२० मि. संरक्षण व २ गुण), मैथिली पवार (३ मि. संरक्षण व ४ गुण) व लामकाणे स्नेहा (२.५०, २.३० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी सामना एकतर्फी केला. पराभूत हरियाणाकडून अमन्ना व आंचल (प्रत्येकी ४ गुण) यांचा प्रतिकार निष्फळ ठरला.

### कोल्हापुरी तडाखा; कुमार व मुलींचे दणदणीत विजय

कुमार गटात कोल्हापूरने उत्तर प्रदेशला २८-१८ असे पराभूत करत एक डाव व दहा गुणांनी सामना जिंकला. कोल्हापूरच्या योगेश मंचीकातला (३.२६ मि. संरक्षण), सिद्धेश माने (१.३५, नाबाद १.५० मि. संरक्षण) व प्रेम देशमाने (१.२० मि. संरक्षण व ८ गुण) यांनी मैदान गाजवले. उत्तर प्रदेशकडून निकेश (१.२० मि. संरक्षण व ६ गुण) व बित्तू कुमार (१.०० मि. संरक्षण व २ गुण) यांनी प्रतिकार केला. मुलींच्या गटात कोल्हापूरने पश्चिम बंगालवर १३ गुण व एका डावाने विजय मिळवला. कोल्हापूरच्या श्रावणी पाटील (२.३० मि. संरक्षण व ४ गुण) व निलम हरिजन (२ मि. संरक्षण व २ गुण) यांनी चमकदार खेळ केला. तर पराभूत बंगालकडून अमृता दास (१.२६ मि. संरक्षण) हिची झुंज अपुरी पडली.

### विदर्भाच्या मुलींचा राजस्थानवर दबदबा

मुलींच्या गटात विदर्भाने राजस्थानवर ८ गुणांनी विजय मिळवला. मध्यांतराला २३-८ अशी मोठी आघाडी घेत विदर्भाने सामना खिशात घातला. विदर्भाच्या श्रद्धा एन. (२.४६ मि. संरक्षण व ६ गुण), कमल एम. (२.३०, २.५० मि. संरक्षण व ६ गुण) व ईश्वरी बी. (१.४० मि. संरक्षण) यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. पराभूत राजस्थानकडून रक्षीम (१२ गुण), दीपांशी (१ मि. संरक्षण), कोमल व आरती (प्रत्येकी १.३० मि. संरक्षण) यांनी लढत दिली.

# घेऊ शत्रूवरी झेप वाघापरी, मृत्यू आम्हा पुढे घाबरे !


## ७ मराठा लाइट इन्फंट्री: शौर्य, त्याग आणि ६३ वर्षांचा दैदिप्यमान इतिहास

### भारता आम्ही तुलाच देव मानतो, हाच महाराष्ट्र धर्म आम्ही एक जाणतो...

या ओळी केवळ शब्द नाहीत, तर ७ मराठा लाइट इन्फंट्रीच्या प्रत्येक जवानाच्या श्वासातील मंत्र आहे. १ जानेवारी २०२६ रोजी, या महान बटालियनने आपल्या गौरवशाली अस्तित्वाची ६३ वर्षे पूर्ण केली आहेत. हा इतिहास केवळ तारखांचा नाही, तर मातृभूमीच्या रक्षणासाठी सांडलेल्या रक्ताचा, दिलेल्या बलिदानाचा आणि शत्रूला पाणी पाजणाऱ्या असीम धैर्याचा आहे.

**रणभूमी गाजवणारे शूर सुपुत्र**

१ जानेवारी १९६३ रोजी बेळगावच्या पवित्र भूमीत या बटालियनची स्थापना झाली. तेव्हापासून आजवर भारतीय सैन्याच्या इतिहासात ७ मराठाने आपले नाव सुवर्ण अक्षरांनी कोरले आहे. भारतीय सैन्याने आजवर लढलेल्या सर्व युद्धांच्या इतिहासात या बटालियनच्या शौर्याची गाथा सुवर्ण अक्षरांनी कोरली गेली आहे. १९६५ च्या युद्धात बटालियनने उत्कृष्ट कामगिरी बजावली. १९७१ चे रणसंग्राम: पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात या बटालियनने शत्रूच्या छातीत धडकी भरवली. 'अमरखरा' असो वा 'पचगढ', शत्रूचा अभेद्य गड मोडीत काढत या वीरांनी विजयश्री खेचून आणली. कांटानगर ब्रिजचा थरार: शत्रूच्या तोफा धडाडत होत्या, गोळ्यांचा पाऊस पडत होता, पण या मराठा वीरांनी मरणाची भीती न बाळगता दिवसाढवळ्या धाडसी हल्ला चढवला आणि विजय मिळवला.



नागालँडच्या घनदाट जंगलांपासून ते जम्मू-काश्मीरच्या उणे तापमानातील तंगधार, पूंछ, चोरबत ला आणि उरी यांसारख्या दुर्गम शिखरांपर्यंत... जिथे जिथे देश संकटात होता, तिथे तिथे '७ मराठा'चा जवान ढाण्या वाघासारखा उभा राहिला.

**रक्ताने लिहिलेला सन्मान**

या बटालियनने केवळ युद्धे जिंकली नाहीत, तर देशाचा सर्वोच्च सन्म ानही मिळवला. त्यांच्या शौर्याची साक्ष त्यांची पदके देतात:

**मानाचे पुरस्कार :** २ कीर्ती चक्र, २ शौर्य चक्र आणि १६ सेना पदके या बटालियनच्या शौर्याची ग्वाही देतात.

**सन्मान आणि गौरव**

२७ नोव्हेंबर १९९८: 'जीओसी-इन-सी (GOC-in-C) नॉर्दर्न कमांड युनिट अप्रीसिएशन'ने सन्मानित.

१५ जानेवारी १९९९: नियंत्रण रेषेवरील (LoC) आणि दहशतवादविरोधी मोहिमांमधील आदर्श कामगिरीबद्दल मानाच्या **थलसेनाध्यक्ष (COS) युनिट सायटेशनने गौरवण्यात आले.

१५ जानेवारी २०१०: उरी सेक्टरमधील लाछीपुरा येथे ७९ माउंटेन ब्रिगेडसोबत कार्यरत असताना, पुन्हा एकदा 'जीओसी-इन-सी नॉर्दर्न कमांड युनिट अप्रीसिएशन' बहाल करण्यात आले. बटालियनला युनायटेड नेशन्सच्या पीस कीपिंग मिशन करता निवडण्यात आले

**६३ वर्षांचा अभेद्य वारसा :**

आज १ जानेवारी २०२६ रोजी आपल्या स्थापनेचा ६३ वा वाढदिवस साजरा करताना, ही बटालियन केवळ एक लष्करी तुकडी उरलेली नाही, तर ती एक 'परंपरा' बनली आहे.

रक्त शिंपुनी पवित्र ठेवितो धरा... हे ब्रीद सार्थ ठरवणाऱ्या, वीर मातांच्या कुशीतून जन्मलेल्या आणि सह्याद्रीच्या कड्याकपाऱ्यांसारखी छाती असणाऱ्या सर्व जवान आणि अधिकाऱ्यांना मानाचा म ुजरा! ७ मराठा लाइट इन्फंट्री - तुमची गाथा पिढ्यानपिढ्या आम्हास प्रेरणा देत राहील!

छत्रपती शिवाजी महाराज की जय! मराठा लाइट इन्फंट्री - बोल श्री छत्रपती शिवाजी म हाराज की जय!

७ मराठा लाईट इन्फंट्रीचा: शौर्य आणि स्मृतींचा मेळावा सोलापूरच्या ऐतिहासिक भूम ीवर

छत्रपती शिवाजी महाराज की जय! हा केवळ एक रणघोष नाही, तर अंगात रक्ताचे पाणी करून शत्रूवर तुटून पडण्याची प्रेरणा देणारा एक मंत्र आहे. 'कर्तव्य, मान, साहस' हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून आणि 'मर्द आम्ही मराठे खडे' या स्फूर्तीगीताचा हुंकार मनात ठेवून ७ मराठा लाईट इन्फंट्रीने भारतीय भूमीच्या रक्षणासाठी आपले रक्त सांडले आहे.

येत्या ४ जानेवारी २०२६ रोजी, सोलापूरच्या ऐतिहासिक भूमीवर ही बटालियन आपला ६३ वा स्थापना दिवस (ठळीळपस ऊ) साजरा करत आहे. हा केवळ एक कार्यक्रम नसून, मराठा वीरांच्या असीम त्यागाचा आणि पराक्रमाचा गौरव सोहळा आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा: एक भावनात्मक प्रवास

**हुतात्म्यांना वंदन:** सोहळ्याची सुरुवात सकाळी १० वाजता अत्यंत भावूक वातावरणात होईल. ज्या वीर पुत्रांनी देशासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली, त्यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला जाईल.

**शौर्याचे दर्शन:** त्यानंतर जवानांच्या साहसी खेळांचे प्रदर्शन होईल, जे पाहून उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे राहतील. मराठा रेजिमेंटच्या पराक्रम ाचे वीरश्रीयुक्त पोवाडे जेव्हा गायले जातील, तेव्हा पुन्हा एकदा इतिहासातील मर्दानी शौर्याचा अनुभव येईल.

**सैनिक संमेलन:** या विशेष प्रसंगी बटालियनचे माजी कमांडिंग ऑफिसर्स आणि सुभेदार मेजर आपल्या अनुभवांतून जवानांना मार्गदर्शन करतील. देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या वीर माता, वीर पत्नी आणि शूर सैनिकांचा सन्मान करताना उपस्थितांचे डोळे नक्कीच पाणावतील.

**एकता आणि आठवणी:** कार्यक्रमाचा कळस म्हणजे सर्वांनी एकत्रितपणे गायलेले 'मराठा स्फूर्ती गीत'. त्यानंतर, देशभरातून आलेले ७०० हून अधिक माजी सैनिक आणि अधिकारी एकमेकांना भेटतील, जुन्या आठवणींना उजाळा देतील आणि स्नेहभोजनाने या अविस्मरणीय दिवसाची सांगता होईल. रक्तात ज्यांच्या मर्दानगी, मनी शिवरायांचे नाव... अशा ७ मराठा वीरांचा, सोलापूरला रंगणार ठाव! हा सोहळा म्हणजे केवळ माजी सैनिकांचे एकत्र येणे नसून, एका मोठ्या कुटुंबाची पुनर्भेट आहे. ज्यांनी खांद्याला खांदा लावून सीमेवर शत्रूचा सामना केला, ते आज पुन्हा एकदा आपल्या 'रेजिमेंटल' कुटुंबासोबत हा आनंदाचा क्षण साजरा करतील. कार्यक्रमाचे मुख्य संयोजक सुभेदार मेजर बाळू पवार साहेब आणि सोलापूर जिल्ह्यातील इतर वीर जवान आहेत.

# संघाची पद्ये (गीते) - संस्कारपूर्ण व प्रेरणादायी

### मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग - १५

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.
मो.क्र.७५८८२१६५२६

संघाच्या शाखेमध्ये अथवा बौद्धिक कार्यक्रमाच्या सुरुवातीला सांघिक पद्य म्हटले जाते. पद्य म्हणजे गाणे. सांघिक म्हणजे कोणीतरी पुढे म्हणतो, त्याच्या पाठीमागे ऐकून सर्वांनी म्हणणे. सांघिक पद्य हे काही विशिष्ट ध्येय समोर ठेवून तयार केली गेलेली आहेत. कोणी तयार केली ही पद्ये ? संघ कामांमध्ये जी पद्ये वापरली जातात, त्यातील फार थोडी पद्ये ही प्रचलित असणारी गाणी आहेत, परंतु सामान्यपणे इतरांना माहीत नसणारी पद्ये संघ कार्यात गायली जातात. ही पद्ये संघ स्वयंसेवकांनीच लिहिलेली असतात. परंतु ज्यांनी त्याचे लेखन केलेले असते, त्याचे नाव मात्र कोणालाच माहीत नसते. त्या गीताचा गीतकार देखील कधीही याबाबत वाच्यता करत नाही. अनेकदा अनेक कार्यक्रमांमध्ये हे पद्य छान आहे असे कोणीतरी म्हणते, ऐकणाऱ्यानेच ते पद्य लिहिलेले असते, तरीही तो याबाबत बोलत नाही. प्रसिद्धीपासून पूर्णपणे दूर राहून संघ स्वयंसेवक कार्य करीत असतात, याचेच हे एक उदाहरण आहे.

संघाच्या ध्येय - उद्दिष्टाला धरून पद्यांची निर्मिती केलेली असते. ही पद्ये शास्त्रीय संगीताच्या भाषेत काही रागदारीमध्ये बांधलेली असतात, परंतु सहजपणे सर्वांना म्हणता येईल अशीच या पद्यांची चाल असते. हिंदू धर्म, संस्कृती, येथील परंपरा, महापुरुष व त्यांचे आदर्श, जातीयतेचे निर्मूलन, समरसतेचा भाव, देशाची अखंडता, एकात्मता, सामान्य व्यक्तीची प्रतिष्ठा अशा अनेक गोष्टींचा बोध होईल असा विचार करून या पद्यांची निर्मिती केलेली असते. हिंदू समाजाचे संघटन हा सर्वच पद्यांमधील प्रमुख आशय असतो. अनेक वेळा इतिहासातील घटनांमधून कशा प्रकारे बोध घ्यावा याबाबतचेही मार्गदर्शन पद्यातून केलेले असते.

पद्याची निर्मिती करत असतानाच ध्येय - उद्दिष्टांचा व समाजाच्या मानसिकतेचा विचार केला गेलेला असतो, त्यामुळे साहजिकच ही पद्ये सर्वांना आपलीशी वाटतात, गोड अशा चालींमुळे ही पद्ये सहजपणे स्वयंसेवक गुणगुणतात, या पद्यातून संस्कार करण्याचा प्रयत्न केला जातो व ही पद्ये स्वयंसेवकांना संघ कार्यासाठी प्रेरणा देण्याचे काम करतात. वेगवेगळ्या भाषांमधील पद्ये एकाच राज्यात देखील म्हटली जातात. उदा. महाराष्ट्र राज्यामध्ये मराठी, हिंदी, संस्कृत या भाषांबरोबरच कन्नड, तमिळ, तेलुगु, पंजाबी, बंगाली अशा भाषांमधील पद्ये देखील मनापासून म्हटली जातात. अन्य भाषातील पद्यांचा भावार्थ सांगितला जातो, त्यामुळे या पद्यातून काय म्हणावयाचे आहे याचा स्वयंसेवकांना बोध होतो.

संघाच्या प्राथमिक अथवा इतर प्रशिक्षण वर्गातून काही पद्ये पाठ करून घेतली जातात, या पद्य म्हणण्याच्या स्पर्धाही आयोजित केल्या जातात. सांघिक पद्यामध्ये काही पद्ये ही संचलन पदे म्हणून देखील ओळखली जातात. पथसंचलनाप्रसंगी म्हणावयाची काही विशिष्ट पद्ये आहेत. सांघिक पद्याबरोबरच काही पद्ये ही वैयक्तिक म्हटली जातात. वैयक्तिक पद्य म्हणजे ते केवळ एकट्याने म्हणावयाचे, पाठीमागून कोणीही म्हणावयाचे नाही. एखाद्या बौद्धिक कार्यक्रमाच्या प्रसंगी वक्ता ज्या विषयावर बोलणार आहे, त्या विषयाला अनुसरून पद्याची निवड केली जाते व ते पद्य वक्ता बोलण्यापूर्वी वैयक्तिकरित्या म्हटले जाते. त्या पद्यातील शब्दांचा श्रोत्यांच्या मनावर परिणाम झालेला असतो, तोपर्यंतच वक्ता त्याच विषयावर बोलायला लागतो व त्याच्या बोलण्याचा एक वेगळा परिणाम श्रोत्यांच्या मनावर होतो.

एखादे गाणे ज्याप्रमाणे मनाला प्रसन्नता देते व अनेक वेळा प्रेरणाही देण्याचे काम करते, त्याच पद्धतीने संघाच्या पद्यातून देखील स्वयंसेवकांना नित्य काम करण्याची प्रेरणाच मिळते. एखाद्या कार्यक्रमांमध्ये उत्साह व वातावरण निर्मिती करण्यासाठी या पद्याचा अत्यंत चांगल्या प्रकारे उपयोग होतो. संघाच्या पद्यांना फार अवघड अशी चाल नसते. संघाच्या कार्यक्रमात पहिल्यांदाच आलेल्या व्यक्तीला देखील हे पद्य म्हणता यावे अशीच सोपी चाल लावलेली असते. सार्वजनिक ठिकाणी संघाची पद्दे इतर संस्था - संघटनांच्या कार्यक्रमात देखील म्हटली जातात याचाच अर्थ या पद्याचा आशय सर्वांना सामावून घेणारा तर असतोच परंतु यातून कोणत्याही प्रकारचा नकारात्मक विचारही तयार होत नाही. पद्य म्हणण्यामध्ये अनेक स्वयंसेवकांचा हातखंडा असतो. असे स्वयंसेवक अनेक पद्ये पाठ करतात. शेकडो पद्ये पाठ असणारे स्वयंसेवक माझ्या पाहण्यात आहेत. तन्मयतेने व संघ संस्कारात राहून हे स्वयंसेवक योग्य त्या ठिकाणी पद्याचा वापर करतात. बौद्धिक वर्गामध्ये एखादी गोष्ट समजावून देण्यासाठी वक्ते देखील पद्याचा आधार घेतात. स्वयंसेवकांना मार्गदर्शन करण्याचे व प्रेरणा देण्याचे काम पद्दे करतात याचा नेहमीच सर्व स्वयंसेवकांना अनुभव येतो. अशी संघाची पद्ये समाजाला देखील आपली वाटतात व समाज देखील अशा पद्यांचे गुणगान करताना दिसून येतो. सांघिक, वैयक्तिक, पथसंचलनात म्हणावयाची पद्ये ही संघ कार्यातील महत्त्वाची देण आहे. या पद्यांमुळे स्वयंसेवकांना संघस्थानावर अथवा बौद्धिक कार्यक्रमांमध्ये जी प्रेरणा मिळते, त्या प्रेरणेतूनच संघ स्वयंसेवक कोणतेही काम करायला तत्परतेने तयार होतात. भारतातील कोणत्याही राज्यात कोणत्याही शाखेवर तुम्ही गेल्यानंतर तेथे तुम्हाला पद्य हे ऐकायला मिळणारच. पद्याचे संघ कार्यातील महत्त्व अनन्यसाधारण असे आहे.

संघ विचारांच्या विरोधी असणारी मंडळी देखील खासगीमध्ये संघाच्या पद्याचा आदरपूर्वक उल्लेख करतात व संघ पद्यातून प्रेरणा मिळाल्याचे कबूल करतात. अनेकदा राजकीय क्षेत्रातील व्यक्ती संघाच्या पद्याचा आधार घेऊन संघाच्या उद्दिष्टांचा उल्लेख करताना आढळतात तर संघ पद्याचा उल्लेख करून काही राजकीय मंडळी आपल्या पक्षातील कार्यकर्त्यांना शिस्त, निष्ठा व देशभक्तीचे धडे देतानाही दिसून येतात. संघाच्या पद्याची ही जादू आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा संस्कार रुजविण्याचे काम आजपर्यंत अनेक पद्यांनी केले आहे व स्वयंसेवकांना तसेच समाजाला देखील प्रेरणा दिली आहे.

# मंगळवेढा ते सोनारी बससेवा सुरु; ऑनलाइन बुकिंग सुविधा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. ३ जानेवारी**

मंगळवेढा ते सोनारी (परांडा) ही बस सेवा शनिवारी सकाळी ८ वाजता आगार प्रमुख संजय भोसले यांच्या हस्ते सुरू करण्यात आली. ही बससेवा सुरू करावी अशी अनेक वर्षापासून भाविकांची मागणी होती. मंगळवेढ्यातील अनेक कुटुंबाचे कुलदैवत श्री क्षेत्र सोनारी येथील काळभैरवनाथ (सोनारसिद्ध) आहे. पाठखळ,खोमनाळ,मरवडे,लेंडवे चिंचाळे फटेवाडी,गोणेवाडी सह अनेक गावातील लोकांचे क्षेत्र हे असल्याने भाविकांना दर्शनासाठी मोठी कसरत करावी लागत होती.मंगळवेढा ते सोनारी हा प्रवास अनेक थांबे व बस बदलत करावा लागत होता. याबाबत मंगळवेढा आगाराला विशेष बस सेवा सुरु करावी अशी मागणी करण्यात आली.



या मागणी नंतर बस सुरू करण्यासाठी आगार व्यवस्थापक संजय भोसले यांनी सकारात्मकता दर्शवली व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परवानगी दिली यानुसार शनिवारी सकाळी दोन बस सोनारीकडे रवाना झाल्या आहेत.

सुरवातीस मंगळवेढा बसस्थानाकावर दोन्ही एसटीचे पूजन करण्यात आले. या प्रवासात पंढरपूर, शेटफळ फाटा कुर्डूवाडी, परांडा ते सोनारी हा मार्ग असून भाविकाना दर पोर्णिमेला सकाळी आठ वाजता ही फेरी होणार आहे.सदर बससाठी ऑनलाईन तिकीट बुकिंगची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. या प्रवासासाठी पूर्ण तिकीट: ४०४ अर्धे तिकीट:२०४ महिला सन्मान योजना: २०४ जेष्ठ नागरिक:२०४ व ७५ वय जेष्ठ नागरिक मोफत आहे.

ही बससेवा सुरू व्हावी यासाठी प्रफुल्ल सोम दळे, प्रा विनायक कलुबर्मे, पत्रकार सचिन इंगळे, ॲड. रमेश जोशी, नितीन सुरवसे, सचिन नागणे, अर्जुन नागणे, सुधीर बिले, पांडुरंग नागणे, संतोष पवार आदिंनी विशेष प्रयत्न केले.

## महत्वाचे...



### डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेच्या करमाळा तालुकाध्यक्षपदी पुनश्च दिनेश मडके

**करमाळा, दि.३ जानेवारी-**

महाराष्ट्र डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेच्या करमाळा तालुका अध्यक्षपदी पत्रकार दिनेश मडके यांची पुनश्च निवड करण्यात आली आहे. संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या नेतृत्वाखाली गेल्या पाच ते सात वर्षांत मडके यांनी तालुक्यात संघटनात्मक बांधणी करत पत्रकारांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून दिला आहे. त्यामुळे त्यांच्यावर पुन्हा एकदा तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे. ही निवड पंढरपूर येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत जाहीर करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, प्रदेश उपाध्यक्ष सतीश भाऊ सावंत, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष प्रविण नागणे, सोलापूर जिल्हाध्यक्ष सचिन कुलकर्णी, राज्य संघटक मुरलीधर चव्हाण, कोषाध्यक्ष अमित इंगोले यांच्यासह गणेश शिंदे, शशांक शिंगाडे, धीरज शेळके, माढा तालुका अध्यक्ष विजय चव्हाण, अंकुश आतकर तसेच जिल्हा, तालुका व राज्यस्तरीय पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते मडके यांना निवडीचे अधिकृत पत्र प्रदान करण्यात आले. लवकरच करमाळा तालुक्याची कार्यकारिणी जाहीर करण्यात येईल, अशी माहिती तालुकाध्यक्ष मडके यांनी दिली.

### रघुनाथ भोसले परिवारातर्फे बार्शीत अशोक स्तंभाची उभारणी

**पांगरी, दि.३ जानेवारी-**

प्रतिनिधी श्रावस्ती बुद्ध विहार महात्मा फुले नगर बार्शी प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्रावस्ती बुद्ध विहार बार्शी येथे ४१ गुंठे जागेमध्ये भव्य बुद्ध विहार निर्मितीचे काम प्रगतीपथावर आहे. या जागेमध्ये आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ प्राध्यापक रघुनाथ भोसले सेवानिवृत्त सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांनी स्वतः च्या खर्चाने साडेतीन लाख रुपये खर्च करून अशोक स्तंभ उभारला आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर बार्शीला तीन वेळा येऊन गेलेले आहेत. त्याचाच भाग म्हणून १० मे १९२४ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली बार्शी सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या परिषदेमध्ये अध्यक्ष भाषणात देशांतर नामांतर की धर्मांतर या आशयाचे मनोगत व्यक्त केले होते. या प्रसंगाला शंभर वर्षे पूर्ण झाल्या निमित्ताने अशोक स्तंभाची निर्मिती केली. रघुनाथ भोसले हे नेहमीच धम्म चळवळीत आघाडीवर असतात. ते बोल घेवडे नाहीत तर ते कर्तुत्वान आहेत या प्रसंगावरून ते दिसून येतात. या विहाराच्या सुशोभीकरणासाठी माजी आमदार राजाभाऊ राऊत यांनी तीस लाख रुपये दिले आहेत तर आजी आमदार दिलीपराव सोपल यांनी रोड लाईट या कामी दहा लाख रुपये दिले आहेत.

### जि.प.प्रा.शाळा, भिमनगर येथे घर घर संविधान कार्यक्रम साजरा

**सांगोला, दि.३ जानेवारी -**

भारतीय संविधान अमृत महोत्सव निमित्त घर घर संविधान कार्यक्रम जि.प.प्रा.शाळा, भिमनगर, सांगोला येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी भारतीय संविधानाविषयी ड.सागर बनसोडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी बाळासाहेब बनसोडे, इरफान फारुकी, बापूसाहेब ठोकळे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी नगरसेविका गोदाबाई बनसोडे, संगीत सोमनाथ जगधने, लक्ष्मण घनसरवाड, रोहिदास गायकवाड, शा.व्य.समिती अध्यक्ष कोमल ठोकळे, उपाध्यक्ष मंजुषा बनसोडे, सदस्य सुरेखा रणदिवे, नीता वाघमारे, स्वाती साठे, अंगणवाडी सेविका जयंती बनसोडे, लक्ष्मी बनसोडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका शेळके यांनी केले. शिक्षिका मैना गायकवाड यांनी आभार मानले.

### संत शिरोमणी गुरु रविदास महाराज दिनदर्शिकेचे प्रकाशन उत्साहात

**बार्शी, दि.३ जानेवारी**

संत शिरोमणी गुरु रविदास महाराज दिनदर्शिकेचे प्रकाशन विठ्ठल व्हनमारे, डॉ. कृष्णा मस्तूद, ॲड. आसिफभाई तांबोळी, नगरसेविका चंद्रकला कांबळे, भारत रामगुडे, रोहिदास कांबळे, अमोल वायचळ, संतोष लोंढे, राजेंद्र लोंढे यांच्या हस्ते झाले. भारत रामगुडे अध्यक्षपदी होते. प्रस्तावना पवन अहिरे यांनी केली. मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. नूतन नगरसेविका चंद्रकला कांबळे यांचा तसेच संत रोहिदास सामाजिक संघटनेचे राज्याध्यक्ष विठ्ठल व्हनमारे यांचा विशेष सत्कारकरण्यात आला. डॉ. मस्तूद यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर विठ्ठल व्हनमारे यांनी समाज प्रबोधनपर विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी पवन अहिरे, सुभाष राजभोज, वैभव राजभोज, सागर खडतरे, शुभम शिंदे, सौरभ शिंदे, सोमेश्वर सूर्यवंशी आदींनी परिश्रम घेतले.

# खर्डी अन् सरकोलीत अवैध वाळू विरुध्द कारवाई

## पंढरपूर तालुका पोलिसांनी केला 13 लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ जानेवारी -**

येथील तालुका पोलिसांनी अवैध वाळू तस्करांचे कंबरडे मोडुन काढण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतली आहे. या विशेष मोहिमे अंतर्गत अवैध वाळू तस्करी विरोधातील दोन वेगवेगळ्या कारवाईं मध्ये १३ लाखांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती येथील तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक टी.वाय.मुजावर यांनी दिली.

या कारवाई संदर्भात माहिती देताना पोलिस निरीक्षक मुजावर यांनी सांगितले की, पंढरपूर तालुका पोलिसांना शुक्रवारी (ता.२ ) दुपारी मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे पंढरपूर तालुका पोलिसांनी खर्डी गावातील खर्डी ते शिरभावी जाणारे रोडवर बातमीच्या ठिकाणी जाऊन माहिती घेतली. त्यावेळी अशोक लेलँड कंपनीचा एक टेम्पो त्यामध्ये एक ब्रास वाळू मिळून आली. सदरची वाळू अवैधरित्या अशोक लेलँड मध्ये वाहतूक करताना मिळून आलेली असून पंढरपूर तालुका पोलिसांनी अशोक लेलँड विदाऊट नंबरचे व वाळू असा एकूण सहा लाख सात हजार रुपयांचा मुद्देमाल पंचनामा करून जप्त केलेला आहे. या जप्त केलेल्या अशोक लेलँडच्या चेसी (एमबी १२२३३३०९) नंबर आहे. दरम्यान दुसऱ्या कारवाईत तालुक्यातील सरकोली या ठिकाणी अशोक लेलँड टेम्पो



ताब्यामध्ये घेऊन त्यामध्ये एक त्रास वाढू एकूण एकूण किंमत सहा लाख सहा हजार असे एकूण दोन अशोक लेलँड कंपनीचे टेम्पो व दोन ब्रास वाळू असा तेरा लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त केला आहे.

या ठिकाणी पंढरपूर तालुका पोलीस आणि जप्त करून सदर गाडीचा चालक आणि मालक याचे विरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय.मुजावर, सहपोनीशहाजी गोसावी, एपीआय विभावरी रेळेकर, पीएसआय विक्रम वढणे, एएसआय बनसोडे, पोलीस हेडकॉन्स्टेबल विनायक नलावडे, मंगेश रोकडे, सुहास देशमुख, दीपक भोसले, तात्या गायकवाड आणि सतीश चंदनशिवे यांच्या पथकाने केली.

# समाईक विहिरीच्या पाणी पाळीवरून दोन गटात हाणामारी;आठ जणांविरूध्द गुन्हा

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.३ जानेवारी-**

सलगर बु. येथे समाईक विहिरीच्या पाण्याच्या पाळीचा वाद मिटविण्यासाठी आलेल्या दोन गटात हाणामारी व दोन महिलांना लज्जा वाटेल असे कृत्य केल्याची घटना घडली. याप्रकरणी परस्परविरोधी बिराप्पा हिप्परकर,विलास हिप्परकर,अंकुश हिप्परकर, अजीत हिप्परकर, यल्लाप्पा हिप्परकर, लक्ष्मण हिप्परकर, सुनिल हिप्परकर, विनोद हिप्परकर आदी आठ जणांविरूध्द गुन्हे दाखल झाले आहेत.

पोलिस सुत्रांनुसार पहिल्या घटनेत यातील ४८ वर्षीय फिर्यादी महिला दि.१ जानेवारी रोजी रात्री ७.३० वा. तीच्या पतीसह घरी असताना अजीत हिप्परकर याने यल्लाप्पा हिप्परकर यांचे मोबाईलवर फोन करून सांगितले की विहिरीच्या पाण्याच्या पाळीचा वाद मिटवायचा आहे, तुम्ही आम च्या घरी या. फिर्यादीच्या पतींना आरोपीकडून शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण झाली. फिर्यादीला छातीवर मारून तीच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. सदरच्या भांडणात फिर्यादीच्या गळयातील गंठण पडून गहाळ झाले असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे.

दुसऱ्या घटनेत यातील ३५ वर्षीय फिर्यादी महिला व तीचा पती घरी असताना अजीत हिप्परकर यांचा फोन पतीच्या मोबाईलवर आला. व विहिरीच्या पाण्याच्या पाळीची तक्रार मिटवायची आहे तुम्ही घरी या त्यावेळी फिर्यादीसह सर्वजण घरी गेले असता तुम्ही मोटारीच्या फ्युजा का काढता असे विचारले असता वरील चौघा आरोपीनी शिवीगाळ केली. यावेळी तुम्ही शिव्या देवू नका असे म्हणत असताना तुला लयी मस्ती आली आहे असे म्हणून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी फिर्यादीस खाली पाडून कपडे ओढून छातीवर हाताने मारून मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याचे दिलेल्या फिर्यादीत नमूद करून फिर्यादीच्या पतीस दगडाने कमरेवर मारून जखमी केले असल्याचे म्हटले आहे. या दोन्ही घटनेत एकमेकांविरूध्द परस्परविरोधी गुन्हे दाखल झाले असून पोलिस याचा तपास करीत आहेत.

# औज येथे पोलिस अधिक्षकांच्या हस्ते वृक्षारोपण

**दक्षिण सोलापूर, दि.३ जानेवारी-**

औज (मं.) येथे जय हिंद एज्युकेशन फाउंडेशनतर्फे वृक्षारोपण, आदर्श पोलीस पाटील व शिक्षक सन्मान सोहळा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते संपन्न झाला.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर, परिविक्षाधीन सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल आत्राम, मंद्रूप पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार आदी उपस्थित होते. यावेळी जय हिंद एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अब्दुलकादर समशेर अली बडे



जागीरदार तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस पाटील व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.



# शाह कन्या प्रशालेत सावित्रीबाई फुले जयंती

**बार्शी, दि.३ जानेवारी**

मुली शिकल्या तर त्या स्वतः स्वावलंबी बनतात तसेच संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होते. त्यामुळे सावित्री बाई फुले यांच्या विचारांचा वारसा घेऊन मुलींना शिक्षण दिले पाहिजे, असे विचार प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. शुभदा जोशी यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची सुरुवात क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभागप्रमुख संदेश घाडगे यांनी केले. 'लेक वाचवा लेक शिकवा' या अभियानांतर्गत प्रशालेतील विद्या खुणे, सिद्धी बोराडे, अक्षता आळे, श्रद्धा पवार या विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली.

यावेळी गणित दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धामधील यशस्वी विद्यार्थिनींना पारितोषिके देण्यात आली. वक्तृत्व स्पर्धाचे परीक्षण उज्वला स्वामी व वैशाली कोकाटे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ज्योती अग्रवाल, रविकिरण पोरे, उषा वीर व सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विदयार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात कायदेविषयक साक्षरता शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ जानेवारी-**

येथील शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात तालुका विधी सेवा समितीच्या वतीने कायदेविषयक साक्षरता शिबीर घेण्यात आले.

वकील संघ कार्यकारी समितीचे अध्यक्ष ॲड. रणजित गुंड यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सह दिवाणी न्यायाधीश आर. पी. बागडे, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. दिपक गुंड, वक्ते म्हणून ॲड. ए. डी. कुलकर्णी, ॲड. बापूसाहेब गलांडे, ॲड. संजय कोकाटे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ॲड. ए. डी. कुलकर्णी यांनी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये पॉक्सो कायदा याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच त्यांनी बेटी बचाव बेटी पढावो या विषयावर आधारित कायद्याविषयी माहिती दिली. त्याविषयी जनजागृती करणे हे सर्वांचे काम आहे असे सांगितले.

ॲड बापूसाहेब गलांडे यांनी नशामुक्त भारत या योजनेविषयी माहिती सांगितली. नशा केल्याने आपल्या आरोग्यावर आणि मानसिकतेवर वाईट परिणाम होतो असे सांगितले. त्याचबरोबर त्यांनी ड्रग अवेअरनेस ॲन्ड वेलनेस नेव्हिगेशन फॉर ड्रग फ्री इंडिया या विषयावर आधारित कायद्याची माहिती सांगितली. ॲड. संजय कोकाटे यांनी पर्यावरणीय कायदेशीर साक्षरता आणि समुदाय संरक्षण उपक्रम, राष्ट्रीय युवा दिन, राष्ट्रीय मानवी तस्करी जागरुकता दिन याविषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच पर्यावरण संरक्षण कायदा तसेच कायदेशीर साक्षरता याविषयीचे मार्गदर्शन केले.

शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष आर. पी.बागडे यांनी या विविध प्रकाराच्या कायद्याविषयीच्या साक्षरता शिबीर कार्यक्रमाचे उद्दिष्ट सांगितले. त्यांनी बेटी बचावो, बेटी पढावो आणि उसे कमाने के काबील बनाओ असे देखील सांगितले. या संदर्भातील हक्क आणि कर्तव्ये याविषयी कायद्याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. शिक्षकांवर भविष्यकाळात खूप मोठी जबाबदारी आहे, असे देखील सांगितले. प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. असे उद्बोधन होणे गरजेचे आहे, असे सांगितले.वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. व्ही. डी. गोणेकर यांनी आभार मानले. ॲड. एस. पी. ननवरे व प्रा. जे. पी. गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### मोहन भडंगे



**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

श्रीराम नगर, शाहीर वस्ती वारकरी संप्रदायाचा वसा असणाऱ्या भडंगे परिवारातील जेष्ठ व्यक्तिमत्व असणारे श्रीयुत मोहन चंद्रकांत भडंगे यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. ते ६५ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अतुल व प्रवीण भडंगे यांचे ते वडील होत.

### डॉ. कीर्ती तोष्णीवाल



**सोलापूर, दि.३ जानेवारी-**

विद्यानगर हाउसिंग सोसायटी येथील रहिवासी डॉ. कीर्ती नितीन तोष्णीवाल (वय ५५) यांचे कर्करोगाने शनिवार दि. ३ जानेवारी रोजी सकाळी निधन झाले. डॉ. नितीन तोष्णीवाल यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात पती सासू, दोन मुले, असा परिवार आहे. मारवाडी स्मशानभूमी येथे त्यांच्या पार्थिवावर संध्याकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शिक्षकांना ऑनलाईन कामाचा व्याप; गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा बोजवारा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ३ जानेवारी-**

शासन विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा संकल्प करीत आहे पण खरेतर शिक्षकांना महिन्यातून १७ ते १८ दिवस ऑनलाईन माहीती भरण्यातच वेळ जात आहे. शिक्षकांना आपला वेळ विविध लिंक, पोर्टलवर माहीती भरणे, अहवाल भरण्यातच जात आहे ही अतिशय गंभीर बाब आहे. शिक्षण विभागाकडून सकाळी शिक्षक किंवा मुख्याध्यापक शाळेत पोहचतात तोपर्यंत ऑनलाईन, ऑफलाईन किंवा एक्सशिल सिटदवारे विविध माहीती ताबडतोब आजच पाठवा असा आदेश येतो. माहीती न दिल्यास वरीष्ठ लगेच फोन करतात यामुळे तर शिक्षकांचा आपला वेळ शिकवण्याऐवजी माहीती भरण्यासाठीच जातो. एवढी विदारक परिस्थिती सध्या सर्वच जिल्ह्य परिषद शाळांमध्ये बघावयास मिळत आहे. यामुळे शिक्षक ऑनलाईन माहीती भरणयातच दिवसभर व्यस्त राहतात व विद्यार्थी दिवसभर बसूनच राहतात. यंदा शासनाने बदली प्रक्रिया अतिशय उशीरा राबविली यामुळे अनेक उपशिक्षकांना मुख्याध्यापक पदी पदोन्नती देण्यात आली आहे . ज्यांना ऑनलाईची ही कामे अजिबात जमत नाही. त्यांच्याकडून वारंवार चुका होत आहेत यामुळे प्रचंड मनस्ताप होत आहे. यासाठी शिक्षक व नवीन मुख्याध्यापक यांच्यासाठी तालुका स्तरावर शिबिर आयोजित करावीत व ऑनलाईन कामाचा बोजा ताबडतोब कमी करावा अशी मागणी शिक्षक संघटनांकडून होत आहे. सध्या शिक्षक व मुख्याध्यापक याच्याकडे शंभरहुन अधिक ऑनलाईन कामाचा व्याप आहे जसे की शाळा सिद्धी, यु डायस, शालार्थ पिएफएमएस, विद्यार्थी उपस्थिती, मध्यान्ह भोजन, भौतिक सुविधा, विविध अहवाल, ऑनलाईन पत्र व्यवहार, दीक्षा प,निपुन भारत, माय भारत, वेगवेगळ्या लिंक भरणे अशी जवळपास शंभरहून अधिक ऑनलाईन कामाचा व्याप सध्या शिक्षकांच्या पाठीमागे आहे. याची वेळीच दखल न घेतल्यास ऑनलाईन कामाचा बोजा वरचेवर वाढतच चालला आहे. यामुळे शाळांमधून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे सध्या मोठे अडचणीचे झाले आहे. हे असेच सुरू राहिले तर भविष्यात हे अतिशय अडचणीचे ठरणार असुन गुणवत्ता पुर्णपणे ढासळल्याशिवाय राहणार नाही. यामुळे पालकही मोठ्या चिंतेत आहेत. याबाबत शिक्षक संघटनांकडून वरचेवर मोर्चा काढुन, आंदोलन करुन ऑनलाईन कामे कमी करण्याची वारंवार मागणी केली आहे पण शासन अद्यापपर्यंत तरी याबाबत बेदखलच आहे. यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण कागदावरच राहीते की काय अशी भिती पालकांमधुन व्यक्त केली जात आहे.



> शासनाचा विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा उद्देश चांगला आहे. पण यामध्ये शिक्षकाकडे सध्या शंभरहून अधिक ऑनलाईनची कामे असल्याने त्यातच जास्त वेळ जातोय. यामुळे विद्यार्थ्यांकडे लक्ष देण्यासाठी वेळ कमी पडत आहे.
> **–सचिन गाटे,** संचालक माळशिरस तालुका शिक्षक पतसंस्था.

> शासनाने शिक्षकांचा ऑनलाईन कामाचा बोजवारा ताबडतोब कमी करुन गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आवश्यक आहे.
> **–संजय पाटील,** माजी अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समीती, लक्ष्मीनगर, कुसमोड.

# ‘एकश: संपत’ वाचकांच्या मनात जागवते राष्ट्रचेतना

## प्रिसिजन वाचन अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जानेवारी-**

‘एकश: संपत’ हे आकाराने लहान असले तरी भारताचा व्यापक सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय पट उलगडणारे पुस्तक आहे. काश्मीरपासून पूर्वांचलपर्यंत तसेच देशातील विविध भागांतील वास्तवाचे सखोल दर्शन या लेखनातून घडते. काश्मीरपासून पूर्वांचलपर्यंत तसेच देशातील विविध भागांतील वास्तवाचे सखोल दर्शन या लेखनातून घडते.

राष्ट्रप्रेम, संघटन, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रउत्थान यांचा प्रखर विचार मांडणारे हे लेखन वाचकांच्या मनात राष्ट्रचेतना जागवते, असे ‘प्रिसिजन’च्या वतीने आयोजित वाचन अभियान कार्यक्रमात सांगण्यात आले. दत्ता जोशी लिखित ‘एकश: संपत’ या पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचे लोकार्पण दैनिक सोलापूर तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, दै.सकाळचे सहयोगी संपादक सिध्दाराम पाटील, दै.लोकमतचे संपादक मिलिंद कुलकर्णी, दै.दिव्य मराठीचे संपादक महेश रामदासी, दै.संचारचे वरिष्ठ उपसंपादक प्रशांत जोशी, वात्सल्य संस्थेचे उमाकांत मिटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लेख दत्ता जोशी हेही उपस्थित होते. दत्ता जोशी लिखित विविध पुस्तकांमधील निवडक उताऱ्यांचे अभिवाचन रश्मी मोहोळकर व प्रथमेश कासार यांनी आपल्या खुमासदार शैलीत केल्याने कार्यक्रम बहरला.





प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी उपस्थितांचे स्वागत व मान्यवरांचा सन्मान केला. प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे यांनी दत्ता जोशी यांची मुलाखत घेतली. या मुलाखतीदरम्यान दत्ता जोशी यांनी विविध विषयांवर आपले विचार मांडले. सरस्वतीच्या मागे जेव्हा लक्ष्मी उभी राहते, तेव्हा निश्चितच काहीतरी सकारात्मक निर्माण होते. चांगल्या माणसांची यादी म्हणजेच पोलादी माणसे होय. उद्योजकतेकडे एक वृत्ती म्हणून पाहण्याची गरज आहे, असेही लेखक दत्ता जोशी यांनी सांगितले. सांगलीच्या हरिभाऊंनी उभारलेल्या हर्मन चहा उद्योगाची यशोगाथा प्रेरणादायी होती. विनायक दुदगी यांनी आभार मानले.

### उद्योगामुळे अर्थकारणाला मिळते गती

कोणताही उद्योजक मोठा होत असताना तो एकटा मोठा होत नाही, तर त्याच्यासोबत अनेक उद्योजक घडत असतात. धाडस, सचोटी आणि मेहनत या त्रिसूत्रीवर उद्योजक यशस्वी होतात. उद्योगामुळे अर्थकारणाला गती मिळते, संपत्ती निर्माण होते; मात्र नोकरीत केवळ पगार मिळतो, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, इंजिनिअरिंगचे शिक्षण सोडून पत्रकारितेकडे वळण्यामागील प्रवासाचाही त्यांनी उल्लेख केला. माधव देशपांडे यांनी आपल्या खास शैलीत लेखक दत्ता जोशी यांची मुलाखत खुलवली.



# भक्तनिवासात विठ्ठल-रुक्मिणीचे होणार लाईव्ह दर्शन

### भक्तीगीतांचीही करण्यात आली सुविधा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ जानेवारी-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी निवासाची उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शहरातील सर्व्हे नं. ५९ येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवासाची उभारणी करण्यात आली आहे. या भक्तनिवासात वास्तव्यास असलेल्या भाविकांना श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे लाईव्ह दर्शन घेता यावे, यासाठी अत्याधुनिक एलईडी स्क्रीन बसविण्यात आली. भक्तीमय वातावरण निर्माण व्हावे यासाठी भक्तीगीतांसाठी साऊंड सिस्टीम उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे मंदिर समितीकडून सांगण्यात आले.

या सुविधांचे लोकार्पण भक्तनिवास व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ.दिनेशकुमार कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्ञानेश्वर देशमुख-जळगांवकर, संदेश भोसले, संजय कोकीळ, राजेंद्र सुभेदार, शंकर मदने, पांडुरंग बुरांडे, सावता हजारे, राजेंद्र घागरे, संदीप कुलकर्णी, विशाल देवकते, भाऊसाहेब घोरपडे, अरुण सलगर, सिध्दार्थ खिस्ते, अनंता रोपळकर आदी उपस्थित होते.

सदरची एलईडी स्क्रीन इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या सेवाभावी योगदानातून उपलब्ध करुन देण्यात आली. पुणे येथील अनिल भन्साळी यांनी साऊंड सिस्टीम देणगीदाखल दिली. भक्तनिवासातील खोल्यांचे दरही कमी करण्यात आले. www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावरून ऑनलाईन बुकिंगची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

या भक्तनिवासात सुमारे १ हजार ५०० भाविकांची निवास व्यवस्था आहे. व्यापारी गाळे, कार्यालये, उपहारगृह, गरम पाण्याची सुविधा, तबक उद्यान, प्रशस्त पार्किंग, लिफ्ट, सुरक्षा व्यवस्था, जनरेटर, वातानुकूलित सुविधा, सीसीटीव्ही कॅमेरे आदी सोयी उपलब्ध आहेत. या कॅम्पसमध्ये ग्रीन बिल्डिंग मानांकन प्राप्त आकर्षक चार इमारती असून, २ बेड, ५ बेड, ८ बेडच्या खोल्या, व्हीआयपी सूट व वन बीएचके फ्लॅट्स उपलब्ध आहेत, असेही सांगण्यात आले.




# टेंभू योजनेसाठी ७० कोटी रुपये मंजूर : आ.डॉ.देशमुख

### ‘शेकाप-पुरोगामी’च्या वतीने सांगोला येथे शेतकरी मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३ जानेवारी -**

टेंभू म्हैसाळ योजनेतील सांगोला तालुक्यातील वंचित क्षेत्र समाविष्ट करण्यासाठी निधीची आवश्यकता असून तो मंजूर करण्यात यावा; अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी टेंभू योजनेसाठी ७० कोटी रुपये मंजूर केले, अशी माहिती आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी दिली.

शेतकरी कामगार पक्ष व पुरोगामी युवक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने सांगोला येथे आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात बोलताना ते पुढे म्हणाले, दूध उत्पादनमध्ये सांगोला तालुका महाराष्ट्र राज्यात अग्रेसर आहे. परंतु दूध उत्पादक शेतकरी दुधाची धार काढताना होणारे लोडशेडिंग बंद करण्यात यावी यांसह चारा छावणी आणि सांगोला शहरातील अडीअडचणींबाबत हिवाळी अधिवेशनमध्ये प्रश्न मांडला. टेंभू म्हैसाळ योजनेची आवर्तने वेळेवर सुरु होतील. पुढच्या दोन दिवसात मका खरेदी केंद्र चालू होणार आहे. शेकाप हा कोणाच्या मालकीचा पक्ष नसून येणाऱ्या निवडणुकीत तुम्ही सांगाल तो निर्णय घेतला जाईल. वैयक्तिक टीका करायचे ती बाबासाहेब देशमुख वर करा, माझ्या कुटुंबावर खालच्या पातळीवर जाऊन टीका केली तर अजिबात खपवून घेणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.



**पराभवाची जबाबदारी स्वीकारतो**

नगरपालिका निवडणुकीत आपण आघाडी केली. परंतु आपला पराभव झाला. त्या पराभवाची जबाबदारी मी स्वीकारतो. आघाडी करत असताना वेळेअभावी तालुक्यातील कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करता आली नाही, असेही आ.डॉ.देशमुख यांनी सांगितले.

# ईपीएस पेन्शनरांचा आज सोलापूरमध्ये मेळावा

**नरखेड, दि.३ जानेवारी -**

सोलापूर जिल्ह्यातील सर्व ईपीएस ९५ पेन्शनरांचा भव्य मेळावा रविवार दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी नागेश करजीकर हायस्कूल, सुपर मार्केट समोर, संभाजी हायस्कूल जवळ, जुनी मिल कम्पाउंड, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे.

मंत्र्यांच्या समवेत झालेली चर्चा व सध्याची वस्तुस्थिती याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेण्यासाठी नवीन वर्षाच्या सुरुवातीला आपले सोलापूर शहरात भव्य मेळावा आयोजित करण्यात आला असून राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोकराव राऊत, महासचिव विरेंद्र सिंग राजावत, पश्चिम भारत संघटक सुभाषराव पोखरकर, महिला आघाडी सचिव सरिता नारखेडे, महाराष्ट्र समन्वयक अजीतकुमार घाडगे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष ईंद्रसिंग राजपूत व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व विविध उद्योग , सहकारी संस्था, कपडा उद्योग , साखर कारखाने, विविध आस्थापना, राज्य परिवहन, विद्युत मंडळ, विविध महामंडळे यातून सेवानिवृत्त झालेल्या पेन्शनरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष महादेव अतकरे, शहराध्यक्ष शशिकांत भुसारे, कुमार करजगी, राजेश रावळ, वैशाली बनसोडे,निता ठाणेकर, रमणताई केदार, शहर सचिव चव्हाण महाराज, सिध्देश्वर मोटे, राजेंद्र खराडे व सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# मित्राच्या खुनाचे आरोपातून दोघांची निर्दोष मुक्तता

**सोलापूर, दि.४ जानेवारी-**

तोडकर वस्ती बाळे येथील लखन रघुनाथ गायकवाड हा दारू पिऊन स्वतःच्याच आईला शिवीगाळ करीत असल्याने व समजावून सांगूनही ऐकत नसल्याने त्याचा लाकडी दांडक्याने व प्लास्टिक पाईपने मारहाण करून जीवे ठार मारल्याप्रकरणी आरोपी नागेश कोळेकर व आशुतोष ऊर्फ आवि गाडेकर दोघे रा. तोडकर वस्ती, बाळे, सोलापूर यांची मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश कटारिया यांनी निर्दोष मुक्तता केली.

यात हकिकत अशी की, दि.१६/५/२०२४ रोजी नागेश कोळेकर व आशुतोष गाडेकर हे फिर्यादी अल्का रघुनाथ गायकवाड यांचा मुलगा लखन यास घरी घेवून आले होते. त्यावेळी फिर्यादीचे गल्लीतील अजय मोहन भोसले हा घरी आला होता. लखन हा फिर्यादीस दारू पिण्यासाठी पैसे दे म्हणून अश्लील शिवीगाळ करीत होता. नागेश व आशुतोष हे आईला का शिव्या देतो, शिव्या देवू नको असे सांगत होते. नागेश याने लाकडाचे दांडका व आशुतोषने प्लास्टिक पाईपने लखनच्ला मारहाण केली. लखनला तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. आरोपींनी फिर्यादीच्या समोर मारहाण केल्याने फिर्यादी घाबरलेली होती. त्यानंतर फिर्यादीने सदरची घटना मुलगा राम व सर्व नातेवाईक यांना सांगितली व उपचारादरम्यान लखन चा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. सदर गुन्ह्यात नागेश कोळेकर व आशुतोष गाडेकर यांना अटक करण्यात आली होती. पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. आरोपींविरुद्ध भरलेल्या खटल्यात सरकार पक्षाने एकूण १४ साक्षीदार तपासले. आरोपीच्या वकिलाने केलेला युक्तिवाद ग्राह्य धरुन निर्दोष मुक्तता करण्यात आली. यात आरोपीतर्फे ॲड.संतोष न्हावकर, ॲड.राहुल रुपनर, ॲड.मीरा पाटील, ॲड.सोहेल शेख यांनी तर सरकार पक्षातर्फे ॲड.प्रकाश जन्नु यांनी काम पाहिले.

# नेताजी बोस शाळेच्यावतीने स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जानेवारी-**

येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मराठी प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते.

प्रमुख अतिथी शेळगी केंद्राचे केंद्रप्रमुख चंद्रकांत वाघमारे, सेवानिवृत्त प्राचार्य रेवणसिद्ध रोडगीकर, सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, सेवानिवृत्त प्राचार्य विजयकुमार हुल्ले, माजी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, सेवानिवृत्त शिक्षक लक्ष्मीकांत त्रिशूले, धर्मराज बळ्ळारी, नेताजी महाविद्यालयाचे प्राचार्य रविशंकर कुंभार, राजराजेश्वरी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, माता पालक संघाच्या सदस्या भाग्यश्री बंदलगी, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष संतोष पुजारी आदी उपस्थित होते. प्रथम मान्यवरांच्या हस्ते वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या प्रतिमेचे पूजन, दीप प्रज्वलन व रंगमंचाचे पूजन करुन स्नेह संमेलनाचे उदघाटन करण्यात आले. मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार यांनी अहवाल वाचनात शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला व पालकांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.संस्था अध्यक्ष कुंभार म्हणाले, स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या कला,कौशल्य व आत्मविश्वासाला नवे बळ मिळते. भविष्यात ही शाळेने गुणवत्तेचा दीप उजळवत समाजाला सक्षम पिढी देत राहावी.



या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी गणपती गीत, नवीन वर्षाच्या स्वागताचे गीत, कोळीगीत देशभक्तीपर गीत,ऑपरेशन सिंदूर, शेतकरी गीत अशा गाण्यावर बहारदार नृत्य सादर करुन पालक प्रेक्षकांना भारावून टाकले. बालवाडीतील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या उत्तम नृत्य अविष्काराने पालक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक प्रशांत बत्तुल यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदानी परिश्रम घेतले.



# ‘दारू नको, दूध प्या’द्वारे व्यसनमुक्तीचा एल्गार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.३ जानेवारी-**

३१ डिसेंबर म्हणजे जल्लोष, पार्ट्या आणि मद्यपान अशीच ओळख होत असताना टेंभुर्णी एमआयडीसी परिसरात मात्र या प्रवाहाला छेद देत सामाजिक भान जपणारा उपक्रम राबविण्यात आला. व्यसनमुक्त युवक संघ व शिवविचार प्रतिष्ठान यांच्या वतीने तसेच ह.भ.प. बंडातात्या कराडकर यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या ‘दारू नको, दूध प्या’ या उपक्रमांतर्गत नववर्षाचे स्वागत थेट दारूला नकार देत, मोठ्या प्रमाणावर दूध वाटप करून करण्यात आले. या उपक्रमामुळे तरुण पिढीला व्यसनमुक्तीचा ठोस संदेश विजय खटके यांनी दिला

एका दिवसाने काही फरक पडत नाही असे म्हणत सुरू झालेली दारूची सवय पुढे आयुष्याची साखळी बनते. पद, पैसा, प्रतिष्ठा, कुटुंब, तारुण्य आणि संपूर्ण आयुष्याची राखरांगोळी दारूमुळे होते. दारू घराघरांत दु:ख, दारिद्र्य आणि संघर्ष निर्माण करते. कधीतरी दारूच्या आहारी गेलेल्या कुटुंबांची अवस्था पाहावी, त्यांच्या पत्नी व कुटुंबीयांचे जगणे पाहून अंगावर काटा येतो, असा सामाजिक वास्तवाचा आरसा यावेळी उपस्थितांसमोर ठेवण्यात आला.

खोट्या प्रतिष्ठेसाठी तरुण पिढीला दारूच्या व्यसनाकडे ढकलू नका. आपल्या मागे फळी आहे हे दाखवण्यासाठी तरुणांचे आयुष्य उद्ध्वस्त करू नका, असे स्पष्ट आवाहन व्यसनमुक्त युवक संघाच्या वतीने करण्यात आले. गेल्या वीस वर्षांहून अधिक काळ संघ राज्यभर गावोगावी फिरून दारूचे दुष्परिणाम सांगत ‘दारू नको, दूध प्या’ हा उपक्रम राबवत आहे. या उपक्रमास माढा तालुका खरेदी-विक्री संघाचे चेअरमन बंडू नाना ढवळे, तांबवे तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष पैलवान नागाभाऊ खटके पाटील, कुर्डूवाडी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नागेश खटके पाटील, शिवविचार प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय खटके पाटील, उपाध्यक्ष सचिन पवार, माजी चेअरमन संतोष खटके यांच्यासह हनुमंत ढवळे, बाळासाहेब माने, सचिन तळेकर, महेश देशमुख, धनाजी भोसले, आप्पा करंडे, विशाल चव्हाण, योगेश जाधव, वैभव जाधव, सागर माने, अमोल लट्ठे, हनुमंत भोसले, विशाल खटके, आप्पा गाडे, विनोद कांबळे, सागर खटके पाटील, तांबवे गावचे युवा नेते बाळासाहेब खटके पाटील यांच्यासह व्यसनमुक्त युवक संघ व शिवविचार प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# आठवण... मी माय झाले... तुम्ही गणगोत व्हा...!

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.









## पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ अनाथांची आई





आहेत. देवा आम्हाला हसायला शिकव, पण आम्ही कधी रडलो होतो याचा विसर पडू देऊ नकोस ही ओळ ज्या स्त्रीने प्रत्यक्ष आयुष्यभर जगून दाखवली, त्या ज्येष्ठ समाजसेविका पद्मश्री डॉ. सिंधुताई (माई) सपकाळ यांनी अनाथ, उपेक्षित आणि दुर्लक्षित मुलांसाठी आपलं संपूर्ण आयुष्य वाहून घेतलं. स्वतःचं आयुष्य वेदनांनी भरलेलं असतानाही त्यांनी त्या वेदनांना शक्तीत रूपांतर केलं.

बालविवाह, अन्याय, उपेक्षा आणि समाज बहिष्कार अशा असंख्य संघर्षांतून मार्ग काढत त्यांनी रस्त्यावरच्या, रेल्वे स्थानकांवरील, स्मशानात राहणाऱ्या अनाथ मुलांना कवेत घेतलं. आई या नात्याचा खरा अर्थ त्यांनी कृतीतून दाखवला. सिंधुताईंच्या ममत्वामुळे हजारो मुलांना केवळ निवारा नव्हे, तर ओळख, शिक्षण आणि सन्मानाचं आयुष्य मिळालं. अनेक अनाथ मुलांसाठी त्यांनी आश्रम उभारले, त्यांना शिक्षणाची गोडी लावली आणि स्वावलंबी होण्यासाठी प्रेरित केलं. आज डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते म्हणून समाजात उभे असलेले अनेक जण अभिमानाने आम्ही माईंची मुलं आहोत असं सांगतात.

सिंधुताई सपकाळ म्हणजे केवळ एक व्यक्ती नव्हे, तर मातृत्वाची चळवळ होती. त्यांनी समाजाला शिकवलं की रक्ताचं नातं नसतानाही माया करता येते, आणि एका माणसाच्या ममतेतून हजारो आयुष्य उजळू शकतात. आज माई आपल्यात नसल्या तरी त्यांनी पेटवलेला मायेचा दिवा कधीही विझणार नाही. अनाथांच्या ओठांवरचं हसू, त्यांच्या डोळ्यांतली स्वप्नं आणि त्यांच्या आयुष्यातली दिशा याच सिंधुताई सपकाळ यांची खरी, जिवंत स्मृती आहे.

सिंधुताईंचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८ रोजी महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यात गुरेढोरे पाळणाऱ्या गरीब कुटुंबात झाला. एका गरीब कुटुंबात जन्मल्यामुळे त्यांना चिंदीचे कपडे घालावे लागत होते. सिंधुताईंच्या वडिलांचे नाव अभिमान साठे होते. त्यांचे वडील सिंधुताईंचे शिक्षण घेण्यास उत्सुक होते. सिंधुताईचे वडील त्यांना गुरे चारण्याच्या निमित्ताने बाहेर शाळेत पाठवत असत.

आईच्या विरोधामुळे आणि घराच्या आर्थिक परिस्थितीमुळे सिंधुताई यांच्या शिक्षणाला खीळ बसली. आर्थिक परिस्थिती, लहान वयात घरातल्या जबाबदाऱ्या आणि बालविवाहामुळे त्यांना चौथीपर्यंत शिकता आले आणि नंतर त्यांना शाळा सोडावी लागली. सिंधुताईं सपकाळ यांचा विवाह वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी वयाने २६ वर्षांनी मोठे असलेल्या श्रीहरी सपकाळ यांच्याशी वर्धा जिल्ह्यात झाला.

लग्नानंतर त्यांना खूप कठीण जीवनाचा सामना करावा लागला परंतु त्यांनी आशा गमावली नाही. त्यांच्या माहेरी त्यांनी महिलांच्या शोषणाविरूद्ध लढा दिला जे वन विभाग आणि जमीनदारांसाठी शेण गोळा करण्यासाठी वापरत होते. यामुळे त्यांचे जीवन अजून कठीण झाले. या लढाईनंतर त्यांचे आयुष्य अधिक कठीण होईल हे त्यांना माहित नव्हते. वयाच्या २० व्या वर्षी जेव्हा त्या गरोदर राहिल्या, तेव्हा एका चिडलेल्या जमीनदाराने कपट मनाने घृणास्पद अफवा पसरविली कि हे मूल दुसर्‍याचे आहे. त्यामुळे नवऱ्याच्या मनात त्यांच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण झाला, त्यामुळे नवऱ्याने हाकलल्यानंतर गावकऱ्यांनीही त्यांना गावाबाहेर काढले. त्याच रात्री सिंधुताईला अतिशय निराशजनक आणि मोठा धक्का बसला होता, त्यांनी एका गाईच्या गोठ्यामध्ये मुलीला जन्म दिला.

एकीकडे त्यांनी आपल्या वडिलोपार्जित घरी जाण्यासाठी त्यांनी धडपड केली, परंतु त्यांच्या आईनेही त्यांना नकार दिला. सिंधुताईंनी आपल्या गरजा भागवण्यासाठी रस्त्यावर आणि रेल्वे स्थानकांवर भीक मागितली. त्यांचे अतिशय संघर्षमय जीवन हे स्वतःचे आणि मुलीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी होते. जगण्याच्या या संघर्षमय प्रवासात सिंधुताई महाराष्ट्राच्या अमरावती जिल्ह्यात चिकलदारा येथे आल्या. येथे वाघ संरक्षण प्रकल्पामुळे ८४ आदिवासी गावे रिकामी करण्यात आली. त्यामुळे सिंधुताईंनी असहाय आदिवासी ग्रामस्थांचे योग्य पुनर्वसन करण्यासाठी संघर्ष करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या प्रयत्नांना वनमंत्र्यांनी मान्यता दिली आणि त्यांना पर्यायी पुनर्वसनासाठी योग्य ती व्यवस्था केली. त्यानंतर सिंधुताई आपल्या मुलीसोबत रेल्वे स्थानकात राहू लागल्या.

पोट भरण्यासाठी भीक मागणे आणि स्वत: ला आणि मुलीला रात्री सुरक्षित ठेवण्यासाठी स्मशानभूमीत राहत असे. आपल्या या संघर्षमय काळात त्यांना समजले की देशात अशी अनेक अनाथ मुले आहेत ज्यांना आईची गरज आहे. तेव्हापासून त्यांनी ठरविले की जो कोणी अनाथ त्यांच्या कडे येईल, त्यांची आई म्हणून संभाळ करेन.

त्यांनी स्वतःची मुलगी 'श्री दगडूशेठ हलवाई, पुणे, महाराष्ट्र' ट्रस्टला दत्तक दिली, कारण त्या सर्व अनाथ मुलांच्या आई बनू शकेल. बरीच वर्षे अथक परिश्रमानंतर सिंधुताईंनी चिखलदरा येथे पहिले आश्रम बांधले. त्यांनी आश्रमशाळांसाठी पैसे गोळा करण्यासाठी त्यांनी बरीच शहरे आणि गावे भेट दिली.

स्वतंत्र भारतात जन्मल्यानंतरही भारतीय समाजात उपस्थित सामाजिक अत्याचारांना त्या बळी पडल्या. आपल्या जीवनाचे धडे घेत त्यांनी महाराष्ट्रात अनाथांसाठी सहा अनाथाश्रम बनवले, त्यांना अन्न, शिक्षण आणि निवारा उपलब्ध करुन दिला. त्यांच्यामार्फत चालविल्या जाणाऱ्या संस्थांनी असहाय आणि बेघर महिलांना मदत केली. आपले अनाथाश्रम चालविण्यासाठी सिंधुताईंनी पैशासाठी कुणापुढे हात कधीच पसरवले नाहीत, त्याऐवजी त्यांनी सार्वजनिक व्यासपीठांतून प्रेरणादायी भाषणे केली आणि समाजातील वंचितांना व उपेक्षित वर्गांना मदत करण्यासाठी जनतेचा पाठिंबा मागितला. आयुष्यातील कष्टातून एक आत्मा एक हजाराहून अधिक मुलांची आई म्हणून जन्माला आली आणि तिने आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी समर्पित केले. माईंनी १२०० हुन अधिक मुलांना दत्तक घेतले आहे, जे प्रेमाने त्यांना 'माई' म्हणून संबोधतात. त्यापैकी बरेच लोक आता प्रतिष्ठित ठिकाणी डॉक्टर आणि वकील म्हणून काम करत आहेत. ७० वर्षांच्या आयुष्यात तिने २२० अधिक जावई आणि ५० अधिक सुना यांचा एक भव्य कुटुंब वाढवलेले आहे. माई ने १२०० हून अधिक अनाथ मुलांना दत्तक घेतले आणि त्यांना अन्न, निवारा आणि शिक्षण दिले.

सन २०१६ मध्ये, सिंधुताईंना सामाजिक कार्यासाठी डी वाय पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चतर्फे साहित्यात डॉक्टरेट पदवी देण्यात आली. सिंधुताईंना २०२१ मध्ये भारताच्या माननीय राष्ट्रपतींनी 'पद्मश्री' देऊन सन्मानित केले होते, त्यांच्या समर्पित सामाजिक कार्यासाठी १००० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केले होते.

पद्मश्री पुरस्कार हा त्यांच्या कार्याला मिळालेला सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान ठरला. मात्र, माईंसाठी पुरस्कार कधीच अंतिम ध्येय नव्हतं. माझ्या लेकरांचं हसू हाच माझा खरा सन्मान आहे, हे त्यांचं वाक्य त्यांच्या आयुष्याचं तत्त्वज्ञान स्पष्ट करतं. सिंधुताई माईंचा संदेश - जर तुम्ही कुणाला जगवायचे ठरवलं, तर येणाऱ्या प्रत्येक अडचणीला सामोरे जाण्याची तयारी असावी. संघर्षाला हरता नाही, तर जीवन बदलू शकते. सिंधुताई सपकाळ यांचा प्रवास हे दाखवतो की सहृदयता, धैर्य आणि निस्वार्थ सेवा यामुळे केवळ मुलांचे जीवन बदलत नाही, तर समाजालाही प्रेरणा मिळते.



अनिल आगलावे
मो. ९७६७०९९७११

**४ जानेवारी** हा दिवस सिंधुताई सपकाळ यांचा स्मृतीदिन म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ त्यांच्या जाण्याची हळहळ व्यक्त करण्याचा नसून, त्यांनी दिलेल्या मूल्यांचा वारसा पुढे नेण्याचा आहे. समाजातील प्रत्येक दुर्बल घटकासाठी संवेदनशील राहणं, हीच माईंच्या कार्याला खरी श्रद्धांजली ठरेल. आज सिंधुताई सपकाळ आपल्यात नसल्या, तरी त्यांनी पेटवलेला माणुसकीचा दिवा अजूनही हजारो आयुष्यांत उजेड पसरवत आहे.

अनाथांच्या ओठांवरचं हसू, त्यांच्या डोळ्यांतली स्वप्नं आणि त्यांच्या पावलांना मिळालेली दिशा याच माईंच्या अमर अस्तित्वाच्या साक्षी

## ममताताई बनल्या माऊली...

अनाथांना आईपण देणाऱ्या सिंधुताई (माई) सपकाळ आज भौतिक रूपात आपल्यात नसल्या, तरी त्यांनी दिलेली माया, संस्कार आणि विचारांची मशाल विझलेली नाही. माईंचा तोच अमूल्य वारसा आता ममता ताई अधिक प्रेमाने, अधिक जबाबदारीने आणि तितक्याच संवेदनशीलतेने पुढे नेत आहेत. माईंनी ज्या लेकरांना आई होऊन माया केली, त्यांनाच आता ममता ताई माऊली बनून आयुष्याचा आधार देत आहेत.

माईंच्या जाण्यानंतर आता या अनाथ मुलांचं काय? असा प्रश्न अनेकांच्या मनात होता. मात्र ममता ताईंनी शब्दांपेक्षा कृतीतून उत्तर दिलं आहे. माईंच्या सान्निध्यात घडलेल्या, त्यांच्या विचारांवर वाढलेल्या ममता ताईंनी हा वारसा केवळ जपला नाही, तर तो अधिक भक्कम केला आहे. माईंच्या विचारांतून उभी राहिलेली नवी जबाबदारी



सिंधुताई सपकाळ यांनी समाजाला शिकवलं की, आईपण हे रक्ताचं नव्हे, तर मायेचं नातं आहे. हाच विचार केंद्रस्थानी ठेवून ममता ताई आज अनाथ मुलांच्या आयुष्याचा आधार बनल्या आहेत.

माईंसोबतचा प्रदीर्घ सहवास, आश्रमातील अनुभव आणि प्रत्येक मुलाशी निर्माण झालेलं भावनिक नातं यातूनच ममता ताईंची भूमिका आकाराला आली. माया, शिस्त आणि भविष्याचा समतोल ममता ताईंचा सांभाळ म्हणजे केवळ निवारा किंवा व्यवस्था नाही. तो आहे आईसारखा आधार, मार्गदर्शकासारखं बळ आणि भविष्य घडवणारी दिशा. शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, संस्कार आणि स्वावलंबन यावर त्या विशेष भर देत आहेत. प्रत्येक मुलाच्या आयुष्यात त्या कधी मायेने जवळ घेतात, तर कधी कठोरपणे योग्य दिशा दाखवतात.

ही मुले समाजावर ओझं नाहीत, तर समाजाची संपत्ती आहेत, हा माईंचा विचार ममता ताई ठामपणे पुढे नेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक मुले शिक्षणात प्रगती करत असून आत्मविश्वासाने स्वतःचं भविष्य घडवण्याच्या मार्गावर आहेत. सिंधुताई सपकाळ यांचा वारसा म्हणजे केवळ आठवणी नव्हेत, तर अखंड सुरू असलेली मायेची चळवळ आहे. ममता ताईंच्या रूपाने ही चळवळ अधिक बळकट होत आहे. माईंची माया आजही जिवंत आहे-ती प्रत्येक मुलाच्या हसण्यात, स्वप्नांत आणि आत्मविश्वासात दिसून येते. माई गेल्या, पण माया गेली नाही. आईनंतर आता ममता ताई, अनाथांसाठी अजूनही माऊलीच...

## शेकडो अनाथ मुलींचं केलं कन्यादान...

समाजातील अनाथ आणि निराधार मुलांसाठी आयुष्यभर मायेचं छत्र उभं करणाऱ्या सिंधुताई (माई) सपकाळ यांनी केवळ आश्रयच दिला नाही, तर आईच्या भूमिकेतून त्यांनी शेकडो मुलींचं कन्यादान करून मातृत्वाचं सर्वोच्च रूप जगासमोर ठेवलं.

ज्या मुलींना जन्मदात्या आई-वडिलांचं छत्र लाभलं नाही, त्या मुलींच्या आयुष्यात माईंनी आईची जागा भरून काढली. मुलीचं लहानपण, शिक्षण, संस्कार, तिच्या भविष्याची चिंता आणि लग्नाच्या वेळी आई म्हणून उभं राहणं-ही सर्व जबाबदारी माईंनी स्वतःच्या खांद्यावर घेतली. माईंच्या आश्रमात वाढलेल्या अनेक मुलींच्या लग्नात माईंनी आई म्हणून कन्यादान केलं.



विवाहासाठी आवश्यक ते मार्गदर्शन, संसारासाठी संस्कार, तसेच समाजात सन्मानाने उभं राहण्यासाठी आत्मविश्वास देणं-हे सर्व माईंनी केवळ कर्तव्य म्हणून नव्हे, तर मायेने केलं. कन्यादानाच्या वेळी आज माझी मुलगी सासरी जाते आहे असं म्हणताना माईंच्या डोळ्यांतून वाहणारी माया आणि ओलावा, हे दृश्य पाहणाऱ्यांच्या मनाला स्पर्शून जायचं.

समाजाला दिलेला मोठा संदेश माईंच्या या कार्यातून समाजाला एक ठाम संदेश मिळाला. आईपण हे रक्ताचं नसतं, ते मायेचं असतं. अनाथ मुलींच्या लग्नात उभं राहून माईंनी समाजातील रूढ कल्पनांना छेद दिला आणि माणुसकीचं दर्शन घडवलं.

माईंसाठी कन्यादान म्हणजे केवळ विधी नव्हता. त्या प्रत्येक मुलीच्या सासरीही तिच्या पाठीशी उभ्या राहत. अडचण आली, तर समजावणं, धीर देणं आणि गरज पडल्यास आधार देणं-हे नातं लग्नानंतरही कायम राहायचं. आज माई आपल्यात नसल्या, तरी त्यांनी केलेल्या शेकडो कन्यादानांच्या आठवणी आणि त्या मुलींच्या आयुष्यात माईंचं स्थान अढळ आहे.

आता माईंचाच वारसा पुढे नेत ममता ताई या मुलींसाठी आईसारखाच आधार बनून उभ्या आहेत. जन्म न देता आईपण निभावणं, रक्ताचं नातं नसतानाही कन्यादान करणं हेच सिंधुताई सपकाळ यांचं असामान्य मातृत्व.

## माईंच्या दूरदृष्टीतून घडलेली आयुष्यं...

समाजातील अनाथ आणि निराधार मुलांना केवळ मायेची ऊब नव्हे, तर स्वाभिमानाने जगण्याची दिशा देणाऱ्या सिंधुताई (माई) सपकाळ यांच्या दूरदृष्टीमुळे हजारो आयुष्यांना यशस्वी मार्ग मिळाला. माईंसाठी अनाथ मुलांना सांभाळणं हे केवळ दयेचं काम नव्हतं, तर त्यांना सक्षम नागरिक बनवण्याचं ध्येय होतं. माईंनी अनाथांसाठी उभारलेली व्यवस्था ही केवळ निवारा देणारी नव्हती. शिक्षण, शिस्त, संस्कार आणि मेहनतीचं महत्त्व या चार स्तंभांवर त्यांनी अनाथ मुलांचं भविष्य उभं केलं. भीक नको, बळ द्या, हा त्यांचा दृष्टिकोन त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसून येत होता. अनाथ मुलांनी शाळेत जावं, शिकावं, विचार करायला शिकावं आणि स्वतःचं आयुष्य घडवावं, यासाठी त्या सातत्याने आग्रही होत्या. शिक्षणामुळेच ही मुले समाजाच्या मुख्य प्रवाहात आली, हा माईंचा ठाम विश्वास होता.





मांडणी/सजावट
विपीन वीर
उपसंपादक, मो. ८४२१४८९७२०

## यशस्वी आयुष्यांची साक्ष...



आज माईंच्या आश्रयाखाली वाढलेली अनेक मुले डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक आणि समाजसेवक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या यशात माईंच्या दूरदृष्टीचं प्रतिबिंब स्पष्टपणे दिसतं. माई नेहमी म्हणायच्या, माझी मुलं माझ्यावर अवलंबून राहिली, तर माझं काम अपूर्ण राहील. त्यामुळेच त्यांनी मुलांना स्वावलंबी, निर्णयक्षम आणि समाजासाठी उपयोगी बनवण्यावर भर दिला. आज माई आपल्यात नसल्या, तरी त्यांनी दाखवलेला मार्ग अजूनही अनाथांच्या आयुष्याला दिशा देत आहे. माईंची दूरदृष्टी ही केवळ त्या काळापुरती मर्यादित नव्हती. ती पुढील पिढ्यांसाठीही मार्गदर्शक ठरली आहे. माई गेल्या, पण दिशा दिली गेली. माया दिली, पण त्याहून मोठं जगण्याचं यशस्वी शास्त्र दिलं. माईंनी मुलांना केवळ पुस्तकी ज्ञान दिलं नाही, तर जीवनमूल्यांची शिदोरी दिली. प्रामाणिकपणा, कष्टाची तयारी, जबाबदारीची जाणीव आणि समाजाप्रती कृतज्ञता या संस्कारांमुळे अनाथ मुले आत्मविश्वासाने उभी राहिली.

# उजनी ग्रामपंचायत वसुली अभियानास उत्फूर्त प्रतिसाद

## एका दिवसात २५ लाखांची विक्रमी वसुली | सप्ताहात ४५ लाख ८३ हजार २६८ रुपयांची कर वसुली

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. ३ जानेवारी :** तालुक्यातील उजनी येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या वसुली अभियान अंतर्गत ३१ डिसेंबर रोजी सकाळी ६ वा. पासून रात्री ११ वाजेपर्यंत या एक दिवसात २५ लाख रुपयांची विक्रमी वसुली करुन ग्रामपंचायतीचा इतिहास नव्याने रचून नववर्षाचे स्वागत केले.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, पंचायत उप मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ, गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे, विस्तार अधिकारी बी. पी. तेलंग यांच्या मार्गदर्शनाखाली औसा बाजार समितीचे माजी सभापती योगीराज पाटील व सरपंच युवराज गायकवाड व ग्रामविकास अधिकारी एस. एस. सय्यद यांनी योग्य नियोजन केल्यामुळे गावकर्‍यांचा सहभाग या अभियानात वाढला.

लिपिक अनिल पाटील, मुख्तारभाई शेरीकर, गोकुळ ढवन यांनी प्रभागनिहाय ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी यांची सांगड घालून विशेष वसुली अभियान राबविले.

> ग्रामपंचायतीची ऐतिहासिक वसुली– योगीराज पाटील
>
> उजनी ग्रामपंचायतीच्या इतिहासात पहिल्यांदाच एका दिवसात सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत २५ लाख रुपये आणि विशेष करवसुली सप्ताहात ४५ लाखांहून अधिक रकमेची वसुली झाली आहे. उजनीकरांसाठी अभिमानास्पद बाब असून इतर ग्राम पंचायतींसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे असे मत औसा बाजार समितीचे माजी सभापती योगीराज पाटील व्यक्त केले आहे.

दि. २६ डिसेंबर २०२५ ते जानेवारी २०२६ या विशेष करवसुली सप्ताहअंतर्गत ४५ लाख ८३ हजार २६८ रुपयांची मालमत्ता, पाणीपट्टी, दिवाबत्ती कर तसेच इतर थकबाकीची वसुली करण्यात आली. तर ३१ डिसेंबार रोजी एक दिवसात २५ लाख रुपयांची ऐतिहासिक वसुली करुन नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. यासाठी योग्य नियोजनबद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली होती. थकबाकीदार नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधून कर भरण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले होते.त्यामुळेच ऐतिहासिक कराची वसुली होण्यास यश मिळाले आहे.

ग्रामस्थांनी वेळेवर कर भरण्यामुळे गावाच्या विकासकामांना गती मिळणार असून रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच इतर मूलभूत सुविधांसाठी पुरेसा निधी उप-लब्ध होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# ग्रामीणच्या नागरिकांना सर्व सुविधा पुरविणार : आ. बनसोडे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ३ जानेवारी :** शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी मी गेल्या अनेक वर्षापासून काम करत आहे आ-पला लोकप्रतिनिधी असलो तरी लोकसेवक म्हणूनच आज पर्यंत मी काम केले आहे. त्यामुळेच मंत्रिपदाच्या काळात मतदारसंघात विकासाचा डोंगर उभा करून शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांना सर्व सोई सुविधा पुरविल्या असल्याचे मत माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर तालुक्यातील ना-गलगाव ग्रामपंचायतीच्या नुतन इमारतीचा भुमीपुजन सोहळ्या प्रसंगी बोलत होते.

यावेळी गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, नागलगावचे सरपंच सुभाष राठोड, उपसरपंच नेताजी कांबळे, प्रा.श्याम डावळे,



शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, नगरसेवक व्यंकट बोईनवाड, माजी सरपंच राजीव वाघे, अंकुश वाघे, सुर्यकांत चवळे, चेअरमन कलप्पा पाटील, बाळु गुरमे, ईब्राहिम देवर्जनकर, संग्राम मोरखंडे, अॅड. तात्या पाटील, गुणवंतराव पाटील, रामलिंग स्वामी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे यांनी, मतदार संघातील प्रत्येक गावावर माझ लक्ष असल्याने ग्रामीण भागातील रस्ते, वीज, पाणी यासह विविध सभागृह यासाठी निधी उपलब्ध करून देवुन ग्रामीण भागाचा विकास केला आहे. ना-गलगाव येथील ग्रामपंचायतच्या इमारत बांधकामासाठी सुमारे २५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करून नविन इमारत बांधकाम होत आहे.

भविष्यात सर्वसामान्याला या ग्रामपंचायतीमार्फत सर्व कागदपत्रे व सुविधा पुरविल्या जातील यासाठी निधी अपुरा पडल्यास आणखीन वाढीव निधी देणार असल्याचे आ. संजय बनसोडे यांनी सांगितले.

# चारित्र्यावर संशय घेऊन विवाहितेस घराबाहेर हाकलले

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. ३ जानेवारी :** तालुक्यातील साकोळ येथील साक्षी चंद्रकांत स्वामी यांचा २०२३ साली औसा येथील महेश स्वामी यांच्यासोबत रितीरिवाजानुसार विवाह करण्यात आला होता. पण सासरच्या मंडळींकडून विवाहित सुनेच्या चारित्र्यावर संशय घेऊन सुनेला नादवण्यांऐवजी सुनेला घराबाहेर हाकलून दिले. त्यामुळे साक्षी महेश स्वामी यांनी सासरच्या सात जणांवर शिरूर अनंतपाळ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केलेली आहे.

> **सासरच्या सात जणांवर शिरूर अनंतपाळ पोलीसात गुन्हा दाखल**

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, साक्षी स्वामी हिचा विवाह दिनांक २१ मे २०२३रोजी महेश चंद्रकांत स्वामी यांच्यासोबत थाटामाटात रितीरिवाजानुसार करण्यात आला. यावेळी मुलींच्या वडिलांकडून वर दक्षिणा म्हणून नगदी रोख पाच लाख रूपय व विस तोळे सोने घालून लग्न लावण्यात आले. संसार ही चालु झाला मात्र सा-क्षीला सासरच्या मंडळींकडून सुनेचा दर्जा मिळालाच नाही. सासरच्या मंडळींकडून सतत साक्षीचा अपमान करणे घालून पाडून बोलणे असा प्रकार चालुच होता. त्यातच सासरच्या मंडळींने संगनमत करून साक्षीच्या चारित्र्यावर संशय घेत असत.

सासरच्या जाचाला कंटाळलेल्या साक्षी महेश स्वामी हिने दिनांक २ जानेवारी २०२६ रोजी पोलीस स्टेशन शिरूर अनंतपाळ येथे दिलेल्या तक्रारीवरून आर-ोपी महेश चंद्रकांत स्वामी, शोभा चंद्रकांत स्वामी, चंद्रकांत स्वामी, मंगेश चंद्रकांत स्वामी, पुजा मंगेश स्वामी, मुकेश चंद्रकांत स्वामी, अंजली मुकेश स्वामी सर्व राहणार मुक्तेश्र्वर मंदीर जवळ औसा यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात येऊन पुढील तपास पोलीस निरीक्षक अनंत भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली साकोळ बीटचे जमादार राजेंद्र कांबळे करित आहेत.

# गांधी विचार व संस्कार परीक्षा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. ३ जानेवारी :** गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव संचलित गांधी विचार व संस्कार परीक्षेचे आयोजन २४ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. जळकोट येथील संभाजीराव केंद्रे महाविद्यालय यामध्ये डॉ. एस. डी. मुंडे यांनी गांधी विचार व संस्कार परीक्षेचे आयोजन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य बी टी लहाने मार्गदर्शनाखाली गांधी विचार व संस्कार परीक्षेचे संयोजक प्रा.एस. डी. मुंडे तसेच सहसंयोजक प्रा. ए व्ही बचुटे डॉ. एस आर सुरनर आणि प्रा. केंद्रा के के महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी गांधी विचार व संस्कार रुजा-वेत म्हणून गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव यांनी दरवर्षी गांधी विच-ाराचा प्रसार व्हावा म्हणून परीक्षेचे आयोजन करण्यात आले.

# निलंगा नवीन बस स्थानक दुरुस्तीच्या नावाखाली बंद

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ३ जानेवारी :** कोट्यावधी रुपये खर्च करून बांधण्यात आलेले निलंगा येथील नवीन बस स्थानक अवघ्या दहा महिन्यातच दुरुस्तीच्या नावाखाली बंद करण्यात आले आहे. निकृष्ट काम करणाऱ्या गुत्तेदार व काम करून घेणारे अभियंते व अधिकारी यांची चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करा अशी मागणी जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी एस.टी. महामंडळ प्रशासनाला दिलेल्या निवेदनात केली आहे.

पंचतारांकित निलंगा बसस्थानक दहा महिन्यातच बंद का?.. असा सवाल करीत मनसे जिल्हाध्यक्ष

डॉ नरसिंह भिकाने यांनी शिष्टमंडळासह निलंगा बसस्थानकाची पहाणी करून स्पॉट पंचनामा केला.

मोठा गाजावाजा करत उदघाटन झालेल्या नवीन बस स्थानकाच्या बांधकामासाठी ७ कोटी रुपये खर्च झाले आहे..यात बसस्थानाकाचे बसवाहतुक होणाऱ्या प्लॅटफॉर्म वरील सिमेंट उखडले असून चक्क स्टील उघडे पडले आहे.प्रवास्यांना बस आली गेली की धुळीच्या लोटांचा सामना करावा लागत आहे.बसस्थानका मधील फरशीही



उखडली आहे.बस बसस्थानकात कुठेही पाणी पिण्यासाठी अद्यावत व्यवस्था नाही.

जनतेचे कोट्यवधी रुपये मातीत गेल्याने निकृष्ट काम करणाऱ्या गुत्तेदार व काम करून घेणारे अभियंते व अधिकारी यांची चौकशी करून गुन्हे दाखल करा अशी मागणी जिल्हाध्यक्ष डॉ नरसिंह भिकाने यांनी शिष्टमंडळासहित बस प्रशासनाला दिलेल्या निवेदनात केली आहे.या बसस्थानकाचे दुरुस्ती काम लवकर पूर्ण करून ते परत प्रवाशासाठी वापरता यावे. अन्यथा बसस्थानकातच उपो-षणास बसू असा इशारा डॉ भिकाने यांनी दिला आहे.या निलंगा पंचतारांकित बसस्थानकातून हिरकणी कक्ष,१०० खुर्च्यांचे अद्यावत थिएटर,महिलांसाठी चेंजिंग रुम,अद्यावत विद्युत रोषणाई,अद्यावत फिल्टर पाणी व्यवस्था चोरीला गेली आहे. त्याचाही शोध चौकशीत घ्यावा असे डॉ भिकाने यांनी केली आहे.

या आंदोलनात मनसे पदाधिकारी सूरज पटेल,प्रदीप शेळके, विकास सूर्यवंशी, बाल-ाजी पवार,गणेश उसनाळे आदींसह प्रदीप माने,डिंगबर जाधव, विनोद बिरादार, दत्ता शिंगरूपे आदी अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# शास्त्री विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ३ जानेवारी :** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कृष्णा मारावार, प्रमुख पाहुणे शैलेश बुरगे, लक्ष्मी चव्हाण तसेच प्रमुख उपस्थितीत सुनंदा टोम्पे, रेणुका कानगुले, उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर, पर्यवेक्षक किरण नेमट, माधव मठवाले, अभ्यास पूरक मंडळ प्रमुख निलेश मांडवकर उपस्थित होते. यावेळी कर्तुत्ववान सावित्रीच्या लेकी म्हणून सुनंदा टोम्पे व रेणुका कानगुले यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

प्रमूख वक्ते शैलेश बुरगे यांनी



आपल्या मनोगतात सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाच्या कैवार घेतल्यामुळे मुलींना शिकता आलं.याकरीता समाजातील मुलींनी शिकावे यासाठी त्या स्वतः आधी शिकल्या व नंतर समाजाकडून होणारा त्रास सहन करून मुलींना शिकविले असल्याचे सांगितले. तर प्रमुख पाहुण्या लक्ष्मी चव्हाण यांनी सावित्री होत्या म्हणून मुली शिकल्या. चुल आणि मुल यांच्या बाहेर पडून स्त्रिया सर्व क्षेत्रात उंच भरारी घेत आहेत अशा पद्धतीची माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोपात मारावार यांनी सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्यावर प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षिता पांडे, प्रास्ताविक वैदही कासले, स्व-ागत परिचय श्रीनिवास कानवटे,आभार नैतिक चामले यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम् नी झाली.

# साकोळात ऊस पीक परिसंवाद, कार्यशाळा



**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १ जानेवारी :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील साकोळ येथील विकास सेवा सोसायटीच्या शेतकरी मॉल येथे कोल्हापूर येथील राघवेंद्र फर्टिलायझर व गायत्री सिड्स ड पेस्टीसाईड यांच्या संयुक्त विघमाने साकोळ येथील ऊस उत्पादक शेतक-यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येऊन शेतक-यांनी एकरी १००टन ऊस उत्पादक कसे करावे याचे योग्य मार्गदर्शन यावेळेस करण्यात आले.

कार्यक्रमांच्या अध्यक्ष स्थानी येथील प्रगतशील शेतकरी माधवराव बर्गे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच प्रदीप पाटील, जिल्हा परिषद स्वीसहाय्यक प्रमोद हुडगे, मुख्याध्यापक अनंत डोंगरे, अंकुलग्याचे माजी सरपंच विकास जागले,अब्दुल अजीज मुल्ला, कोल्हापूरचे कृषी मार्गदर्शनक पंडीत सर उपस्थित होते.

या वर्षी समाधानकारक पाउस झाल्याने शेतकरी उसलागवडीकडे वळला आहे. त्यात शेतकऱ्यांना योग्य ते ऊस पिकाचे नियोजन व उत्पन्न वाढ करता येऊ शकते यासाठी पाण्याचे नियोजन, पाचट कुट्टी करून होणारे फायदे, पाचट जाळून होणारे जिवाणू मध्ये होणारी घट व दुष्परिणाम, अनेक वर्षापासून शेती मध्ये शेणखत न वापरल्यामुळे जिवाणू व सेंद्रिय कर्ब कमी झालेले प्रमाण, प्रति एकर फुटण्याची म्हणजेच ऊसाची संख्या किती असावी याचा विचार करून शेतकऱ्यांनी उस लागवड करण्याचे मार्गदर्शन राघवेंद्र ग्रूप कोल्हापूरचे पंडितराव यांनी उपस्थित शेतकऱ्यांना केले.

कार्यक्रमामध्ये एकरी ७०टन ऊस पिकवले अशा शेतकऱ्यांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आले. त्यात जवळगा गावचे शेतकरी नागनाथ कुंभार ही आपला ऊस घेऊन कार्यक्रमाला उपस्थित होते.

साकोळ नगरीतील शेकडो शेतकऱ्यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली व कमीत कमी सत्तर टन एकरी उत्पादन काढण्याचा संकल्प ही अनेक शेतकरी बांधवांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना दयानंद कलशेट्टे माटेगडीकर यांनी केले व तणनाशक नियोजनाबद्दल माहिती दिली.

कार्यक्रमाचे आभार गायत्री सीड्स अँड पेस्टिसाइड साकोळ चे श्रीपती दरेकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्विते साठी राज दरेकर, राजकुमार भिका, दिलीप भिका, तसेच संभाजी दरेकर यांनी प्रयत्न केले.

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण महाविद्यालय कटिबद्ध : डॉ.पवार



**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १ जानेवारी :** राज्यात शिक्षण क्षेत्रात शैक्षणिक गुणवत्तेचा अहमदपूर पॅटर्न निर्माण करणारे आपले महात्मा गांधी महाविद्यालय शैक्षणिक

गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या कला, क्रीडा, सांस्कृतिक गुणांचा विकास घडवून आणण्यासाठी सातत्यपूर्ण विविध प्रकारचे उपक्रम घेऊन त्यांना प्रे-रणा व प्रोत्साहन देत असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हे महाविद्यालय कायम कटिबद्ध आहे, असे मत प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांनी पालक-शिक्षक मेळावा प्रसंगी व्यक्त केले.

विचारपीठावर विचार विकास मंडळाचे संचालक मा. मधुकरराव देशमुख, स्टाफ सेक्रेटरी डॉ अनिल कांबळे, पालक-शिक्षक असोसिएशनचे सचिव डॉ. आर. एम. कदम, आयक्यूएसी समन्वयक डॉ. अनिल जाधव, बालाजी पवार, श्रीमती जयश्री वळसंगीकर यांची उपस्थिती होत. याप्रसंगी अर्चना शिंदे, जयश्री मुसळे, सुनील दहिकांबळे, परमेश्र्वर वाकडे, रमेश सुरनर असे अनेक पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिल जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आर. एम. कदम यांनी केले व आभार डॉ. ए. आर. कराड यांनी मानले.

# विद्यार्थ्यांनी समाजाप्रती संवेदनशील असले पाहिजे : कांबळे



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ३ जानेवारी :** आपल्या सभोवती असलेल्या समाजाचे प्रश्न समजून घेऊन त्यांची उकल करण्यासाठी कष्ट घ्यायला हवेत. आपल्या कडे असलेल्या कला आणि कौशल्याचा वापर समाजातील प्रश्र्न सोडविण्यासाठी करायला हवा असे मत लातूर येथील प्रसिद्ध सिने अभिनेते आणि नाट्य दिग्दर्शक अनिल कांबळे यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयात मागील १३ वर्षांपासून सुरू असलेल्या कॅम्पस फिल्म सोसायटीच्या या वर्षातील उपक्रमांचे उद्घाटक म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम होते तर मंचावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एस. गायकवाड, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्र्वर चौधरी, विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डॉ. हंसराज भोसले यांची उपस्थिती होती.

आपल्या उद्घाटकीय मनोगतात पुढे त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या महाविद्यालयीन जी-वनात जे अनुभव आले आणि जी संस्कारांची शिदोरी मिळाली त्याची आठवण विद्यार्थ्यांना सांगून आपल्या अडचणींवर मात करण्याची सर्वांनी जिद्द बाळगली पाहिजे असे मत व्यक्त केले. या प्रसंगी सुलतान या लघुपटाचा विशेष शो विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. अण्णाभाऊ साठे यांच्या लघुकथेवर आधारित असलेल्या या लघुपटातून अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची ओळख जगाला झाली असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

आपल्या मनोगतात याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. बी. एस. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी चित्रपट पाहताना त्यातील समाज दर्शन, प्रश्नांची मांडणी काळजीपूर्वक समजून घेतली पाहिजे. त्यातून योग्य तो संदेश घ्यायला पाहिजे असे मत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ कर्मवीर कदम यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय कॅम्पस फिल्म सोसायटीचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्र्वर चौधरी यांनी करून दिला तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. हंसराज भोसले यांनी केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कु.मुळे अंकिता व आगलावे अंकिता यांनी पार पाडली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. गोपाळ मोघे, प्रा. मनिषा घोगरे, प्रा. पूनम सातपुते, सुनील वाकळे, सिद्धेश्वर कुंभार, सचिन महिंद्रकर, राजू एखंडे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी अनेक प्राध्यापक, विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# विकासाच्या कामावर निवडणूक लढणार: अमर राजुरकर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जानेवारी-**

जाहीरनाम्यात नमूद करण्यात आलेली सर्व कामे सत्य व वास्तव असून स्वतःचा मोठेपणा करण्याचा भारतीय जनता पार्टीचा कुठलाही प्रयत्न नाही, ही निवडणूक भारतीय जनता पार्टी विकासाच्या कामावर लढणार असल्याची प्रतिक्रिया माजी आमदार तथा भाजपा महानगराध्यक्ष अमर राजुरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेत चैतन्यबापू देशमुख, संतोष पांडागळे यांची उपस्थिती होती

यावेळी बोलताना माजी आमदार अमर राजुरकर म्हणाले की, भारतीय पक्षाची तयारी जोरात असून पक्ष संघटन देखील जोरात आहे. मनपा निवडणूक साठी ५२१ लोकांनी अर्ज केले होते त्यापैकी ६७ जणांना त्यांची पात्रता व निवडणूक लढण्यासाठी सक्षम असल्याचे पाहून उमेदवारी देण्यात आली आहे. या निवडणुकीत सक्षम असे उमेदवार देण्यात आले असून नांदेड मनपावर भाजपाचा झेंडा फडकेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.



उद्या दि. ४ जानेवारी रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व नामदार पंकजा मुंडे या नांदेड दौऱ्यावर असून त्यांच्या उपस्थितीत संचालन समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर आयटीआय परिसरातील भाजपाचा प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. त्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे लातूरकडे रवाना होणार आहेत. तर नामदार पंकजा मुंडे या माळाकोळी येथे कै. गोपीनाथ मुंडे यांच्या पुतळा अनावरण कार्यक्रमास जाणार आहेत. विशेष म्हणजे दि.५ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा इंदिरा गांधी मैदान गोकुळ नगर येथे आयोजित करण्यात आली आहे. तर दि. ६ जानेवारी रोजी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत बूथ कमिटी अध्यक्ष, शक्ती केंद्रप्रमुख यांची बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती यावेळी माजी आमदार अमर राजूरकर यांनी दिली.

**शिवसेनेच्या अवास्तव मागणीमुळे युती तुटली: चैतन्यबापू देशमुख**

नांदेड महापालिका निवडणुकीसाठी भाजपा- शिवसेना शिंदे गटाची युती व्हावी म्हणून प्रयत्न करण्यात आले. यासाठी तीन बैठक देखील घेण्यात आल्या. परंतु जागा वाटपाबाबत चर्चा होत असताना शिवसेनेने अवास्तव मागणी केली. त्यामुळे शिवसेना -भाजपाची युती तुटली असून नांदेड मनपात भाजपाचा महापौर असेल असा विश्वास चैतन्यबापू देशमुख यांनी व्यक्त केला.

**जाहीरनाम्यातील कामे खासदार अशोक चव्हाण यांच्या कार्यकाळातील : पांडागळे**

भारतीय जनता पार्टीने प्रकाशित केलेल्या जाहीरनाम्यातील कामावरून विरोधक टीका करत असली तरी जाहीरनाम्यात नमूद केलेली सर्व कामे सत्य व वास्तव आहेत. खासदार अशोक चव्हाण काँग्रेस कार्य काँग्रेसमध्ये असताना त्यांच्याच कार्यकाळात ही सर्व कामे त्यांनी केली आहेत या जाहीरनाम्यामध्ये खासदार अशोक चव्हाण यांनी केलेल्या कामाचे प्रतिबिंब असून जनतेच्या हितासाठीचा हा जाहीरनामा असल्याची प्रतिक्रिया भाजपा प्रवक्ते संतोष पांडागळे यांनी दिली.

# शालेय पोषण आहार योजनेच्या मध्यान्ह जेवणामध्ये निघाल्या आळया



**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ३ जानेवारी-**

पी एम श्री योजने मध्ये निवड झालेल्या इस्लापूर येथील जिल्हा परिषद हायस्कूल मधील विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह जेवणामध्ये सोयाबीनच्या भाजीमध्ये अळ्या आढळून आल्याने संबंधित विद्यार्थ्यांनी पालकाकडे तक्रार केल्याने दिनांक ३ रोजी इस्लापूर येथील पालकांनी जिल्हा परिषद शाळेमध्ये धाव घेतली. व संबंधित ठेकेदार व मुख्याध्यापकाने निष्काळजी केल्याप्रकरणी त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी अशा स्वरूपाची मागणी केली. सदरील घटनेचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्याने व वृत्तवाहिनीवर या संदर्भात बातम्या प्रकाशित झाल्याने. किनवट येथील गटशिक्षण अधिकारी अनिल महामुने यांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन इस्लापूर शाळेला भेट दिली व सदरील प्रकरणांमध्ये सखोल चौकशी केली असता. इयत्ता सातवी मध्ये शिक्षण घेणारी कुमारी आराध्या बालाजी पळसपुरे या विद्यार्थिनीने शालेय पोषण आहारात देण्यात आलेल्या सोयाबीन च्या भाजीमध्ये आळ्या निघाल्याची संदर्भात मुख्याध्यापकास कळवले असता मुख्याध्यापकांनी मिल मेकर तेवढे फेकून द्या आणि भाजीतील रस्साया सोबत जेवण करा असा सल्ला दिला. असल्याची स्पष्ट कबुली गटशिक्षण अधिकारी यांच्या लेखी जबाब दिली. त्यातच दिनांक २ रोजी शाळेतील मेनू प्रमाणे आहार देण्यात आला नसून चव रजिस्टर सुद्धा संबंधित शाळेमध्ये उपलब्ध नव्हते. व आजच्या आहारात भाजीपाल्याची उणीव असल्याची सुद्धा गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यातच चौकस असलेल्या गटशिक्षणाधिकाऱ्यांनी चांगलेच मुख्याध्यापकास धारेवर धरले व पीएमसी योजनेअंतर्गत किती निधी उपलब्ध झाला या संदर्भात सुद्धा विचारणा केली. त्यामुळे मुख्याध्यापकाची चांगली धांदल उडाली. या चौकशी दरम्यान कोसमेट भिशी केंद्राची केंद्रप्रमुख सतीश शिरगुरवार व केंद्रप्रमुख उत्तम कानिदे यांचीही उपस्थिती होती. संतप्त झालेल्या पालक वर्गांना शांतपणे शाळेविषयक समस्या मांडण्याची वेळ गटशिक्षण अधिकाऱ्यांनी दिली. विद्यार्थ्यांची स्वच्छतागृह पाण्याची सोय व रिक्त शिक्षकांची पदे त्वरित भरण्यात यावी अशा स्वरूपाच्या सूचना पालक वर्गांनी दिल्या. सदरील प्रकरणाची कसून पणे चौकशी करून या प्रकरणाचा अहवाल वरिष्ठांना पाठविणार असल्याची ग्वाही याप्रसंगी गटशिक्षण अधिकारी अनिल महामुने यांनी पालक वर्गांना दिली.

## मुक्रमाबाद पोलीस ठाण्यास विद्यार्थ्यांची भेट

**बाऱ्हाळी** -येथील स्वामी विवेकानंद विद्या विहार या ईंग्रजी माध्यम शाळेने महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाचे औचित्य साधून मुक्रमाबाद पोलिस ठाण्याला इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भेट देऊन दैनंदिन कामकाजाची माहिती घेतली. शाळेचे प्राचार्य प्रविणकूमार रेड्डी,उप मुख्याध्यापक बालाजी पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र पोलीस दिनाचे औचित्य साधून मुक्रमाबाद येथील पोलीस ठाण्यास विद्यार्थ्यांनी भेट दिली. स.पो.नि. राजेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येक विभागाची सविस्तर माहिती दिली. सोबत रायफल आणि पिस्तूल यांचे डम्मी यांचे सादरीकरण करून दाखविण्यात आले व तसेच त्यांच्या प्रत्येक भागाचे सविस्तर माहिती देऊन त्यांचा वापर कोण आणि केंव्हा आणि कश्यासाठी केला जातो त्याचीही माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यास खावू वाटप करण्यात आला. शाळेकडून बालाजी पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे कर्मचारी श्री. शिंदे , प्रसाद , योगेश , किरण आणि लोमन ,पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी यांनी प्रभावी भूमिका बजावली.



## मुदखेड येथे भीमा कोरेगाव शौर्य दिन उत्साहात साजरा

**मुदखेड** -पुणे जिल्ह्यातील भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक लढाईच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी, मुदखेड शहरात दि.१ जानेवारी २०२५ रोजी २०८ वा शौर्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त शहरातून भव्य रॅली काढण्यात आली असून, भीमा कोरेगावच्या विजयस्तंभाची प्रतिकृती सर्वांचे आकर्षण ठरली.या कार्यक्रमाची सुरुवात शहरातील 'बुद्धभूमी प्रशिक्षण केंद्र' येथून झाली. १ जानेवारी १८१८ रोजी केवळ ५०० महार सैनिकांनी २८,००० पेशव्यांच्या फौजेचा पराभव करून विषमतेविरुद्ध समतेचा लढा जिंकला होता. या इतिहासाचे स्मरण करत, समता सैनिक दलाच्या ५० जवानांनी शिस्तबद्ध संचलन करत विजयस्तंभाला मानवंदना (सलामी) दिली. यानंतर ही रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. रॅलीमध्ये भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाची प्रतिकृती विशेष आकर्षण म्हणून ठेवण्यात आली होती, ज्याचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.या रॅलीचा समारोप डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजित ठिकाणी झाला.

## पत्रकार संजय निळेकर यांना साई जीवनगौरव समाज भूषण पुरस्कार

**नवीन नांदेड** -ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित साई जीवनगौरवसमाजभूषण पुरस्कार २०२६ चा राष्ट्रीय पातळीवरून दिला जानारा हा पुरस्कार नांदेड सिडको येथील शासनमान्यचे मुख्य संपादक संजय मधुकरराव निळेकर यांना जाहीर झाला असून तो दिनांक १० जानेवारी रोजी प्रधान करण्यात येणार आहे. शिर्डी संस्थानच्या वतीने सामाजिक , राजकीय चळवळीत आत्मविश्वासाने आणि जिद्दीन व ध्येय साध्य करणारे तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून सामान्यातल्या सामान्य घटकापर्यंत जाऊन त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यांना शासकीय, राजकीय क्षेत्रातील वरिष्ठांकडून न्याय मिळवून देण्याचे काम सातत्याने करत असतात त्याचप्रमाणे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे व खंबीरपणे समाजाच्या कल्याणासाठी सतत धडपड करणाऱ्या कार्याची दखल घेऊन नांदेड जिल्ह्यातील नांदेड येथील सिडको हडको परिसरातील शासनमान्यचे मुख्य संपादक संजय मधुकरराव वाघमारे निळेकर यांना ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित साई जीवन गौरव समाज भूषण पुरस्कार २०२६चा जाहीर झाल्याबद्दल मित्रमंडळी ,नातेवाईक व पत्रकार बांधवाच्या वतीने अभिनंदन केले आहे.



## माळाकोळी येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे आज अनावरण

**लोहा** -लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे ४ जानेवारी रोजी सायंकाळी माळाकोळी येथे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होणार आहे कार्यक्रमासाठी माजी मुख्यमंत्री खा अशोकराव चव्हाण, माजी मंत्री धनंजय मुंडे यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहेत. लोहा तालुक्यातील माळाकोळी येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृती जतन करण्यासाठी जुनी संसद भवनाची प्रतिकृती असलली ईमारत उभारण्यात आली आहे. या पुतळा अनावर सोहळ्यासाठी आ. प्रताप पाटील चिखलीकर, माजी आमदार तथा (राज्यमंत्री दर्जा) गोविंद आण्णा केंद्रे, खा. शिवाजी काळगे, आ.तुषार राठोड, आंबेडकर चळवळीतील अमन आंबेडकर, माजी आ. शंकर आण्णा धोंडगे, माजी आ. शामसुंदर शिंदे, माजी खा. सुधाकर श्रृंगारे, माजी आ. रोहिदास चव्हाण, सेवा जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.मनोहर धोंडे, मुक्तेश्वर धोंडगे, हभप माधव महाराज केंद्रे, बाजीराव भालेराव, सरपंच जनार्धन तिडके यांची उपस्थिती राहणार आहेत .या कार्येक्रमाचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन सुरनर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्ये क्रम संपन्न होणार आहे तरी कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन लोकनेते गोपीनाथ मुंडे स्मारक समिती माळाकोळी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.



# सिंधू महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ३ जानेवारी-**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त देगलूर येथील सिंधू कॉलेज ऑफ आय.टी.ॲण्ड सायन्स येथे जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश जाधव हे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कवयित्री सावित्री शेवाळकर उपस्थित होत्या.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव अशोक दाचावार, उपप्राचार्य मिलिंद राजुरकर, सिंधुताई कांबळे यांची उपस्थिती लाभली. प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची विधिवत सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख वक्त्या कवयित्री सावित्री शेवाळकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर सखोल मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या आयुष्यातील अज्ञान, अन्याय व दुःख दूर करण्यासाठी केलेले कार्य अतुलनीय असून स्त्रियांमध्ये संयम, धैर्य व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला, असे त्या म्हणाल्या. यावेळी त्यांच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या चरित्रावर आधारित ग्रंथांचे वितरण करण्यात आले.



यावेळी सिंधुताई कांबळे व उपप्राचार्य मिलिंद राजुरकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्राचार्य गणेश जाधव यांनी विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या विचारांचा आदर्श घेऊन जीवनात प्रगती साधावी, असे आवाहन केले. या कार्यक्रमात ऋतुजा जाधव, सृष्टी गायकवाड, साक्षी देशमुख, श्रुती बिरादार, अनुराधा बिरादार, सुवर्णा एन्नलवार, धनश्री तडखेले व संकेत भूपतवार आदी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन प्रा. अनुराधा गंधारे यांनी केले, तर आभारप्रदर्शन मनीषा बोन्तापल्ले यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सपना बुन्नावार यांनी केले. यावेळी प्रा. अभिनंदन सिताफुले, प्रा. भिमराव दिपके, प्रा. मारुती सोनकांबळे, प्रा. मिलिंद वाघमारे, प्रा. बाबूराव टेकाळे, मनीषा कळसकर, गजानन महाजन यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सावित्रीबाई शेवाळकर यांच्या वतीने विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या कवयित्री सावित्रीबाई शेवाळकर यांच्यातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या चरित्रे ग्रंथ भेट म्हणून देण्यात आले. या स्तुत्य उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये महापुरुषांचे विचार समजावे त्यांची विचारधारा विद्यार्थ्यांना लक्षात यावी या अनुषंगाने हा स्तुत्य उपक्रम शेवाळकर यांनी राबविला. या ग्रंथ भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# पत्रकार शेख निवडणुकीच्या रिंगणात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जानेवारी-**

नांदेड महापालिका निवडणुकांसाठी अनेक जणांनी तयारी केली असून या पत्रकार शेख याहीया ादेखील मागे राहिले नाहीत. शहरातील प्रभाग क्रमांक १२ मधून त्यांनी त्यांच्या पत्नी रुकसाना बेगम शेख या यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे.



मागील जवळपास तेरा वर्षापासून पत्रकारिता क्षेत्राच्या माध्यमातून सामाजीक समस्या सोडवणाऱ्या शेख याहीया यांनी आता त्यांची पत्नी रुकसाना बेगम यांच्या माध्यमातून निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली आहे. प्रभाग क्रमांक १२ उमर कॉलनी मधून ते अपक्ष निवडणूक लढवीत असून त्यांना ऑटो रिक्षा ही निशाणी मिळालेली आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या समाजहीनाच्या कामाचे फळ त्यांना या निवडणुकीत मिळणार अशी अपेक्षा व्यक्त होत असुन विकासाचा ऑटोरिक्षा या प्रभागातून नेहमीच धावणार असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. सध्याची परिस्थिती पाहता अनेक पक्ष राजकीय फायद्यासाठी तडजोडी करत असून जनतेची कामे करण्यासाठी आता अपक्ष उमेदवारच हवा त्यामुळे जनता नक्कीच साथ देईल असा विश्वास पत्रकार शेख याहीया यांनी व्यक्त केला.

# अटीतटी नाहीच! प्रभाग २ मधून काँग्रेसचे उमेदवार भरघोस मतांनी विजयी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ३ जानेवारी-**

नुकत्याच पार पडलेल्या हदगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रभाग २ मध्ये उमेदवार असलेले ( माजी नगरसेवक )शेख कलीम शेख चांद व ( माजी नगरसेवक )फिरोज पठाण यांच्या आई रुकसानाबी अहमद खान पठाण यांनी ही निवडणूक अत्यंत सूक्ष्म नियोजनाने, शेकडो कार्यकर्त्यांची असलेल्या फौज वरती व मतदारांच्या मतरुपी आशीर्वाद वरती भरघोस मतांनी ही निवडणूक जिंकली असून त्यांच्या या विजयामुळे निवडणुकीच्या वेळेस दिलेला विकास कामांच्या बाबतीत प्रत्येक शब्द पूर्ण तत्वाकडे नेण्याचे आमचे ध्येय असणार असल्याचे आमच्या प्रतिनिधी बोलताना सांगितले असून माजी आ. जवळगावकर यांनी टाकलेला विश्वास व प्रभागातील नागरिकांच्या सुविधा बाबत कोणतीही तडजोड भविष्यात राहणार नसल्याचे देखील अधोरेखित केले.



नगरपालिकेची निवडणूक जाहीर होताच उमेदवारांची घोषणा तदनंतर प्रचाराची धुरा फिरोज पठाण यांच्या युवा कार्यकर्ते, मित्रमंडळी, ज्येष्ठ मार्गदर्शक यांनी आपल्या खांद्यावर घेत अगदी सूक्ष्म नियोजन लावत ही निवडणूक लढवुन यात एकतर्फी विजय प्राप्त केला. याच प्रभागात ओबीसी पुरुष या जागेवरती काँग्रेस पक्षाकडून शेख कलीम शेख चांद यांना उमेदवारी भेटल्यानंतर त्यांनी पण अगदी सूक्ष्म नियोजन लावत कोणत्याही प्रकारची कसर या प्रचार मोहिमेत न ठेवता प्रचार मोहिमेत जोरदार मुसंडी मारली होती त्यास फिरोज पठाण यांची साथ पूर्ण विश्वासाने लाभल्याने या दोन्ही उमेदवारांनी या प्रभागात विजय खेचून आणला. शेख कलीम हे यापूर्वी सुद्धा नगरसेवक राहिलेले आहेत त्यांचा पूर्वीचा अनुभव लक्षात घेता त्यांना व फिरोज पठाण हे सुद्धा यापूर्वी नगरसेवक राहिलेले असता त्यांचाही अनुभव लक्षात घेता या जोडीस प्रभागातील जनतेने मतदान रुपी भरपूर आशीर्वाद दिले त्यामुळेच ही निवडणूक अटीतटीची न होता एकतर्फी झाल्याची चर्चा असून त्यांनी ही निवडणूक भरघोस मतांनी जिंकली असेच म्हणावे लागेल. या प्रभागावर प्रत्येक पक्षाचे प्रमुख यांनी विशेष लक्ष दिले होते पण त्यास सुरुंग लावण्याची यशस्वी खेळी माजी आमदार जवळगावकर यांनी खेळली असून दोन्हीही विजयी उमेदवार रुकसाना बी अहमद खान व शेख कलीम शेख चांद यांचे प्रत्यक्ष मतदारांपर्यंत भेट देण्यावर जोर होता हे त्यांचे विजयाचे गुपित म्हणावे लागेल तरी या विजयामुळे विरोधकांना मात्र चांगलेच तोंडघशी पडल्याचे चित्र दिसत आहे.

# मुकादम व चिखलीकर कुटुंबाचे जिव्हाळ्याचे नाते : आ. प्रतापराव पाटील

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ३ जानेवारी-**

लोहा कंधार तालुक्यातील ग्रामीण विकासात कंधार व लोहा पंचायत समितीचे सभापती कै व्यंकटराव मुकदम याचे योगदान आहे .माजी नगराध्यक्षा जिजाबाई मुकदम यांच्या काळात शहरात अनेक कामे झाली नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली शहरात चांगले कामे होतील असा विश्वास व्यक्त करत मुकदम व चिखलीकर कुटुंबात अनेक पिढ्या पासून कुटुंबिक व जिव्हाळ्याचे नाते राहिले आहे

लोह्याच्या थेट जनतेतून निवडून आलेल्या पहिल्या नगराध्यक्षा जिजाबाई मुकदम याच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आ प्रतापराव पाटील चिखलीकर बोलत होते व्यासपीठावर माजी आ. मोहन अण्णा हंबर्डे, राष्ट्रवादी चे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, ॲड मुक्तेश्वर धोंडगे, नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार, आयोजक माणिकराव मुकदम, सचिन पाटील चिखलीकर , केशवराव मुकदम, गटनेते भास्कर पवार , माजी उपनगराध्यक्ष मन्नान चौधरी, नारायराव चव्हाण, माधवराव चव्हाण, सचीन मुकदम, डॉ दिनेश चव्हाण , प्रा डॉ डी एम पवार, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, सुधाकर पवार नामदेव पाटील पवार आत्माराम मुकदम सतीश मूक्कदम ,शिवराज मुकदम, आप्पाराव पवार, बिपिन मूक्कदम, चव्हाण मुकदम परिवार डॉ संजय गुंडावार, यासह सर्व नगरसेवक उपस्थिती होत.



आ चिखलीकर यांनी मुकदम परिवाराच्या सोबत चिखलीकर कुटुंबाचे अनेक पिढयांचे असलेले जिव्हाळ्याचे संबंध आहेत नगराध्यक्षा स्व जिजाबाई मुकदम याच्या काळात शहरात अनेक कामे झाली आता उर्वरित कामे होतील असा विश्वास व्यक्त करत त्यांनी दोन्ही परिवाराच्या नात्यांना उजाळा दिला.यावेळी माणिकराव मुकदम यांनी प्रास्ताविक केले तर नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पवार यांनी विचार मांडले कोटलवार परिवाराच्या वतीने आ चिखलीकर याचा सत्कार करण्यात आला आभार बिपीन चव्हाण यांनी केले

# नांदेड दक्षिण मतदार संघात राष्ट्रवादी- शिवसेनेची युती

## आ.हेमंत पाटील व आ.प्रताप पाटील यांची संयुक्त पत्रकार परीषदेत माहिती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३ जानेवारी-**

नांदेड महापालिका निवडणुकीची लढाई आता सुरु झाली असतानाच दक्षिण मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गटांमध्ये युती झाली असल्याची माहिती आमदार हेमंत पाटील व आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी संयुक्त पत्रकार परीषदेत दिली.

भाजपा इंदोर पॅटर्न नांदेडात राबविण्याचा विश्वास जनतेला देत आहे. परंतु नुकतेच वर्तमानपत्रातील बातमीनुसार त्या दूषित पाण्यामुळे १४ लोकांचे जीव गेले. त्यामुळे हा पॅटर्न वापरून भारतीय जनता पार्टी नांदेडकरांचा जीव घेणार आहे काय असा सवाल उपस्थित करत पक्षापेक्षा नांदेड शहर महत्त्वाचे असून नांदेड शहराला वाचवण्यासाठी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादीची युती केली असल्याची माहिती आमदार हेमंत पाटील यांनी दिली. तर भारतीय जनता पार्टी इंदोर पॅटर्न सांगत आहे नागपूर पॅटर्नचे त्यांना वावडे आहे काय असा प्रश्न उपस्थित करत शहरातील आठवडी बाजार, पार्किंग व्यवस्था, रस्ते आदी सर्व प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रवादी व शिवसेना शिंदे गटाची युती करण्यात आली असल्याची माहिती आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी दिली. नांदेड दक्षिण मतदार संघात शिवसेना शिंदे १६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस १७ जागेवर निवडणूक लढणार आहे. तर अन्य प्रभागात मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. दरम्यान नांदेड उत्तर मतदारसंघात आमदार बालाजी कल्याणकर यांनी स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला असला तरी शिवसेना उमेदवाराच्या प्रचारासाठी आमदार कल्याणकरांनी आमंत्रण दिल्यास प्रचार देखील करू असाही विश्वास आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी व्यक्त केला. या पत्रकार परिषदेस राष्ट्रवादीचे नेते माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, आमदार आनंद बोंढारकर, माजी आमदार सुभाष साबणे, माजी आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, विनय गिरडे, शिवराज घोटाळकर, माधव पावडे, बाळासाहेब रावणगावकर आदींची उपस्थिती होती.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तुळजाभवानी मंदिरात भाविक महिलेचे दागिने चोरीस

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

दि.२ जानेवारी २०२६ रोजी पहाटे १.३० वाजण्याच्या सुमारास तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या एका वृद्ध महिलेच्या दागिन्यांची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी पार्वती गणपत देशमाने (वय ६५, रा. तुळजापूर खुर्द, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) या दर्शनासाठी गर्दीत उभ्या असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या कानातील सोन्याची कर्णफुले व मणीमंगळसूत्र, अंदाजे २० ग्रॅम वजनाचे, एकूण सुमारे १ लाख २० हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेले.



या प्रकरणी पार्वती देशमाने यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### व्ही.पी.एज्युकेशनल कॅम्पसमध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

व्ही.पी. एज्युकेशनल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथे डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्री शिक्षणाचा पाया रचणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त कॅम्पसमधील विविध शैक्षणिक विभागांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर आधारित विचारमंथन, मार्गदर्शनपर कार्यक्रम तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास कॅम्पसचे प्रशासकीय अधिकारी व एसबीएनएम फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, एस.पी. पॉलिटेक्निकचे प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, आर.पी. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गाझी शेख, बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य ऋषिकेश लोमटे, नीलकंठेश्वर डेअरीचे प्राचार्य बालाजी वाघमारे, वेलनेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या प्राचार्य डॉ. पूजा आचार्य, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, आयटीआयचे व्यवस्थापक प्रा. दत्तात्रय घावटे, कॅम्पसचे लेखापाल योगेश मंडलिक यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### जयप्रकाश विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व इंदिरा गांधी प्राथमिक शाळा, रूईभर यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाष कोळगे यांच्या हस्ते क्रांतिज्योति सावित्रीबाई फूले यांच्या प्रतिमेस हार व श्रीफल अर्पण करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सुरेश रायजादे यांनी मानले.

### जि.प. व पं.स. निवडणूक अनुषंगाने परंडा येथे भाजपाची आज बैठक

**परंडा, दि.३ जानेवारी -**

जि.प. व पं.स. निवडणुकीच्या अनुषंगाने विचार विनिमय करण्यासाठी भाजपा परंडा तालुक्याची बैठक रविवार दि.४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे. परंडा येथे कल्याणसागर माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात ४ जानेवारी रोजी रविवारी दुपारी १२.३० वा. होणाऱ्या या बैठकीस भाजपा नेते सुजितसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी हे उपस्थित राहणार आहेत. बैठकीस तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी, सर्व लोकप्रतिनिधी, बुथ अध्यक्ष, आघाडी व मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे व परंडा शहराध्यक्ष उमाकांत गोरे यांनी केले आहे.

# शाकंभरी नवरात्रोत्सवात आकाशात अवतरली भवानी माता

## ३०० ड्रोनने साकारला भक्तीचा अद्भुत सोहळा






**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ जानेवारी -**

श्री तुळजाभवानी देवींच्या शाकंभरी नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेला भव्य आणि अत्याधुनिक ड्रोन शो आज मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. धाराशिव जिल्ह्यात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या ड्रोन शोने भाविकांचे लक्ष वेधून घेतले असून, आधुनिक तंत्रज्ञान आणि धार्मिक परंपरेचा सुंदर संगम यानिमित्ताने अनुभवता आला.

या कार्यक्रमाची सुरुवात जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते श्री तुळजाभवानी देवींचे पूजन करून करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे, नगराध्यक्ष तथा विश्वस्त विनोद गंगणे, सौमय्याश्री पुजार, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे, तेरखेडा फटाका असोसिएशनचे अध्यक्ष फरीद पठाण, अलियाज दारूवाले, तय्यब हुसेन दारूवाले, मंदिर संस्थानचे पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी, तसेच मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

यापूर्वी श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सव २०२५ अंतर्गत २९ सप्टेंबर रोजी हा ड्रोन शो आयोजित करण्यात आला होता. मात्र, सततचा पाऊस व ढगाळ वातावरणामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव तो स्थगित करावा लागला होता. अखेर शाकंभरी नवरात्रोत्सवाचे औचित्य साधत आज श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाच्या मैदानावर हा ड्रोन शो यशस्वीपणे पार पडला.

या भव्य ड्रोन शोमध्ये तब्बल ३०० ड्रोनच्या सहाय्याने आकाशात विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक प्रतिकृती साकारण्यात आल्या. यामध्ये श्री तुळजाभवानी मंदिराची प्रतिकृती, श्री तुळजाभवानी देवींची दिव्य प्रतिकृती, तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह इतर आकर्षक प्रतिकृतीचा समावेश होता. विशेषतः आकाशात साकारलेल्या श्री तुळजाभवानी देवींच्या तेजस्वी प्रतिकृतीने भारावून टाकले. देवीच्या प्रतिकृतीसोबत प्रकाशयोजना आणि संगीतमय पार्श्वभूमीमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हालेला दिसून आला. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिकृती आकाशात साकारताच उपस्थित भाविकांमधून 'जय भवानी, जय शिवाजी' चा जयघोष करण्यात आला.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नियोजित प्रकाशयोजना आणि संगीताच्या सुसंवादामुळे हा ड्रोन शो भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला. देवीच्या दर्शनासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव घेण्याची संधी यानिमित्ताने भाविकांना मिळाली. धाराशिव जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारचा ड्रोन शो आयोजित करण्यात आल्यामुळे नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता होती. अनेक भाविकांनी हा सोहळा आपल्या मोबाईलमध्ये कैद करत आठवणी जपल्या.

ड्रोन शोच्या सादरीकरणानंतर तेरखेडा फटाका असोसिएशनच्या वतीने आकाशात नेत्रदीपक फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. फटाक्याच्या रंगीबेरंगी रोषणाईमुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला आणि शाकंभरी नवरात्रोत्सवाच्या उत्सवात अधिकच भर पडली.

एकूणच, श्री तुळजाभवानी देवींच्या शाकंभरी नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित हा ड्रोन शो भक्ती, परंपरा आणि आधुनिकतेचा अद्भुत संगम ठरला असून, भाविकांच्या स्मरणात दीर्घकाळ राहणारा सोहळा ठरला आहे.

# २५ वर्षे सत्ता भोगली; मतदारसंघ मात्र तसाच : सावंतांची विरोधकांवर टीका



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील इंदापूर येथील नरसिंह साखर कारखाना परिसरात शिंदे गटाच्यावतीने शनिवार (दि. ३ जानेवारी) रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती विजयी संकल्प मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्यास माजी मंत्री व विद्यमान आमदार तानाजी सावंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

मेळाव्यात बोलताना सावंत यांनी मतदारसंघात गेल्या पंचवीस वर्षांपासून सत्तेत असलेल्या विरोधकांवर थेट व आक्रमक शब्दांत टीका केली. पंचवीस वर्षे सत्ता हातात असूनही मतदारसंघात मूलभूत विकास झाला नाही. रस्त्यांवर मुरूम टाकला नाही, पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईन अपूर्ण राहिल्या, स्वतःच्या गावात साधी स्मशानभूमीही करता आली नाही. मग पंचवीस वर्षांत नेमकं काय केलं? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सावंत पुढे म्हणाले की, मी मंत्री असताना या मतदारसंघासाठी इतर मतदारसंघांच्या तुलनेत अधिक निधी आणला. तरीही लोकांनी मला केवळ हजार-दीड हजार मतांनी निवडून दिले. पूर्वी मला ३३ हजार मतांची आघाडी मिळायची. जर लोकांना माझी गरज नसेल, तर क्षणाचाही विलंब न करता मी राजीनामा देईन. भारत माझा देश आहे; मी कुठेही जाऊन काम करू शकतो. कार्यकर्त्यांमध्ये जोश भरताना सावंत म्हणाले, धाराशिवमध्ये 'एकला चलो'चा नारा मी दिला नव्हता, त्यांनी दिला होता. आम्ही शिवसैनिक आहोत आणि गरज पडली तर जीवाचं रान करायला तयार आहोत, हे लक्षात ठेवा. नगरपालिका व नगरपरिषद निवडणुकांचा संदर्भ देत त्यांनी विरोधकांवर नाव न घेता टोला लगावला. निवडणुकीत काही प्रभावशाली नेते आमच्या विरोधात उभे राहिले; पण मतदारसंघातील जनतेने कुणाच्या बाजूने कौल दिला, हे निकालातून स्पष्ट झाले, असे ते म्हणाले. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सावंत यांनी कार्यकर्त्यांना गावोगावी जाऊन मतदारांशी संपर्क साधण्याच्या, विकासकामांचा आढावा मांडण्याच्या व संघटनात्मक ताकद वाढवण्याच्या सूचना दिल्या.

मेळाव्यास जिल्हा प्रमुख दत्ता साळुंखे, शिवसेना नेते बिभीषण खामकर, केशव सावंत, बाबुराव घुले, झाकीर सौदागर, संजय गाढवे, विकी चव्हाण, सत्यवान गपाट, उद्धव साळवी, विकास तळेकर, शिवाहर स्वामी, बाळासाहेब मांगले यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### विकी चव्हाण यांचे दमदार शक्तीप्रदर्शन...

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका जवळ आल्याने वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील शिवसेनेचे युवा नेते विकी चव्हाण यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केले. शिंदे गटाच्या विजयी संकल्प मेळाव्यासाठी पाचशे दुचाकी व पन्नास चारचाकी वाहनांचा भव्य ताफा काढण्यात आला. या शक्तीप्रदर्शनामुळे तेरखेडा गटातील राजकीय समीकरणे बदलू लागली असून, विकी चव्हाण उमेदवारीचे प्रमुख दावेदार ठरत असल्याची चर्चा आहे.

### सावंतांचा 'विजयी संकल्प मेळावा' उत्साहात संपन्न...

## फोटो ऑफ द डे : सावित्रीच्या लेकी आम्ही...



**अणदूर :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अणदूर येथील श्री श्री गुरुकुल येथे विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा परिधान करून सर्वांचे लक्ष वेधले.

## नुतन नगराध्यक्ष किरण गायकवाड यांचा उमरग्यात सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

उमरगा येथील श्री चांडेश्वरी देवस्थान पंच कमिटी व लिंगायत हटकार गोष्टी समाजाच्या वतीने उमरगा शहराचे नवनियुक्त नगराध्यक्ष किरण गायकवाड, नगरसेवक धनंजय मुसांडे, सचिन जाधव, अश्विनी सोनकांबळे, स्वाती स्वामी, यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी परमेश्वर टोपगे, इराण्णा बसगुंडे, सुनील बटगिरे, मारुती कोडते, श्रीशैल कडगंचे, मिलन बुक्का, नागेश बडगिरे, संतोष टोपगे, शशिकांत कडगंचे, रमेश बस गुंडे, प्रकाश टोपगे तसेच अन्नपूर्णा बटगिरे, मीना कोडते, सुजाता बस गुंडे, सुनीता बुक्का, लक्ष्मी पुरंत, महादेवी कडगंचे, मंगल टोपगे, सुशीला टोपगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# येळकोट, येळकोट जय मल्हारच्या जयघोषाने दुमदुमले श्रीक्षेत्र मैलारपुर





## मैलारपूर येथे श्री खंडोबा यात्रेचा भक्तीमय उत्सव... लाखो भाविकांची उपस्थिती... नंदीध्वजांचा गजर...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ जानेवारी -**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या मल्हारी मार्तंड श्री खंडोबा देवाची यात्रा नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपूर येथे दि. ३ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न होत आहे. दुपारी २ वाजेपर्यंत ५०० ते ६०० नंदीध्वजांसह लाखो भाविक मंदिर परिसरात दाखल झाले होते. यावेळी भंडारा व खोबऱ्याची मुक्तपणे उधळण सुरू होती.

श्री खंडोबा व माता बाणाई यांच्या विवाहाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र मैलारपूर येथील ही यात्रा दि.२ जानेवारीपासून सुरू झाली असून मुख्य दिवस दि.३ जानेवारी होता. या दिवशी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगणा राज्यांतून लाखो भाविक दर्शनासाठी आले. येळकोट येळकोट जय मल्हारच्या जयघोषाने, हलगीच्या तालावर बेभान होऊन नाचणाऱ्या वारूंनी, तसेच वाघ्या-मुरळींच्या बहारदार गाण्यांनी मंदिर परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. दि.३ जानेवारी रोजी रात्री १२.०५ वाजता काकडा आरती, पहाटे २ वा. महापूजा व अभिषेक करण्यात आला. त्यानंतर भाविकांसाठी दर्शन खुले करण्यात आले. बोरी घाटावर स्नान करून भाविक दर्शन रांगेत सहभागी होत होते. पहाटेपासूनच दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. दिवसभर नैवेद्य, लंगर तोडणे, तळी उचलणे, दंडवत, जावळ काढणे, नवस फेडणे असे धार्मिक विधी सुरू होते.

मानाचे नंदीध्वज दाखल झाल्यानंतर वाजत-गाजत जुन्या मंदिराला वळसा घालून नवीन मंदिरात दर्शन घेतले जात होते. भगवे व पिवळे झेंडे आणि नंदीध्वजांमुळे परिसर फुलून गेला होता. सायंकाळी ५ पर्यंत सुमारे ५ ते ६ लाख भाविक येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. यात्रेचे नियोजन लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे व नगरसेवकांच्या टीमने उत्तम प्रकारे केले. यात्रेकरूंकरिता पिण्याचे पाणी, फिरती स्वच्छतागृहे, स्वच्छता व्यवस्था, अग्निशमन वाहन, माहिती फलक आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. मुख्याधिकारी रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. आरोग्य विभागातर्फे प्राथमिक उपचार केंद्र सुरू होते. महावितरण कर्मचाऱ्यांनी वीजपुरवठा सुरळीत ठेवला, तर एसटी महामंडळाच्या अतिरिक्त बससेवेमुळे भाविकांना ये-जा सुलभ झाली.

नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. देवस्थान ट्रस्टतर्फे दर्शन रांगा, सीसीटीव्ही व्यवस्था व सुरक्षिततेची योग्य काळजी घेण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग बायपास रोडच्या दोन्ही बाजूंना वाहनतळाची सोय करण्यात आली होती. यात्रेत आनंदनगरी, पाळणाघर, मौत का कुंआ, जादूचे प्रयोग, सर्कस तसेच विविध दुकाने थाटण्यात आली होती.

आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नांतून श्रीक्षेत्र मैलारपूर व परिसरात दर्जेदार व रुंद सिमेंट रस्ते व नाल्यांची कामे झाल्याने यंदाची यात्रा वाहतूक कोंडीविना सुरळीत पार पडली. नगरपालिकेच्या चांगल्या नियोजनामुळे यात्रा यशस्वी झाली. नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणावर काऊटआउट्सही लावण्यात आले होते.